गुरुवार, 23- डिसेंबर- 2021

लोक बिरादरी प्रकल्प
हेमलकसा

वर्धापन दिन
विशेषांक

समर्पित बिरादरी

“

झेपावणाऱ्या पंखांना क्षितिजं नसतात,
त्यांना झेपेच्या कवेत येणारे आकाश असते.
सृजनशील साहसांना सीमा नसतात,
त्यांना मातीच्या स्पर्शाची अट असते.
अशी सृजनशील साहसे हवी आहेत,
जी बीजे पेरून बाट पाहू शकतील,
जी भाग ठेऊन भविष्य आखतील,
अन् बेभान होऊन वर्तमान घडवतील.....

--बाबा आमटे. ”

लोक बिरादरी प्रकल्प , हेमलकसा
तालुका - भामरागड , जिल्हा- गडचिरोली , ४४२७१०
magazinelbp@gmail.com

दिनांक 18 नोव्हेंबर रोजी बाल दिनाचे औचित्य साधून TOUCH या समाजसेवी संस्थेकडून घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत लोक बिरादरी आश्रम शाळेतील विद्यार्थिनी कु.अक्षता मडावी व कु. बाली मडावी यांनी अनुक्रमे 2 रा व 4 था क्रमांक मिळवला. यासाठी कला शिक्षिका शिल्पा मोहिते यांनी मेहनत घेतली.

समर्पित बिरादरी

संपादक - अनिकेत आमटे
प्रकाशनाची तारीख - 23 - डिसेंबर- 2021
वर्ष/ अंक - 2/2
मुखपृष्ठ मांडणी- दिपक सुतार
व्यवस्थापक, अक्षररचना - कांचन गाडगीळ
लेख संकलन व निवड - अमित कोहली
लीलाधर कसारे
गिरीश कुलकर्णी
खुशाल पवार
तुषार कापगते

'समर्पित बिरादरी' हा वार्षिक विशेषांक, लोक बिरादरी प्रकल्पाच्या 48व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला.

लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा ता.भामरागड, जि. गडचिरोली
www.lokbiradariprakalp.org
magazinelbp@gmail.com
सचिन - +91-7588772858 (**प्रकल्प भेटीकरिता**) । **केतन**- +91-7588772857(**देणगीकरिता**)

संपादकीय

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकासासाठी कार्य करणाऱ्या हेमलकसा येथील लोक बिरादरी प्रकल्पाचा हा दुसरा वर्धापनदिन विशेषांक. 23 डिसेंबर 2021 रोजी प्रकल्पाला 48 वर्ष पूर्ण झाली. आत्तापासूनच आम्हा सर्व कार्यकर्त्यांना सुवर्ण महोत्सवी वर्षाचे वेध लागले आहेत. प्रकल्पाला 50 वर्ष पूर्ण होतील तेव्हा काय काय करायचे याचे विचारचक्र सर्वांच्याच डोक्यात भिरभिरताहेत.

यावर्षी कोविड 19 ने मार्च, एप्रिल व मे मध्ये देशात धुमाकूळ घातला. अपुऱ्या आरोग्य सुविधेमुळे अनेकांना आपल्या प्राणांना मुकावे लागले. त्याचा फटका आमच्या प्रकल्पातील 40-50 लोकांना पण बसला. सुदैवाने प्रकल्पात जीवितहानी झाली नाही. जानेवारी 2021 ते मार्च 2021 पर्यन्त 6 वी ते 12 वी चे वर्ग आम्ही चालवले. पण दुसऱ्या लाटेत एप्रिल 2021 ला बंद करावे लागले. दुसरी लाट ओसरत आल्यावर जुलै मध्ये परत शाळा सुरू केली. शाळा बंद असताना नुसत्या मोठ्याला शाळेच्या इमारती व रिकामे वसतिगृह बघणे फार वेदनादायक होते. दिवाळी 2021 नंतर लोक बिरादरी आश्रमशाळेतील 1 ली ते 12 वी पर्यंतचे सर्व वर्ग सुरू झाले आहेत. साधना विद्यालय,नेलगुंडा आणि साधना विद्यालय,जिंजगाव या शाळा पण पूर्ण क्षमतेने सुरू झाल्या आहेत. 2021 मध्ये आपण 11 वी आणि 12 वी विज्ञान शाखा तसेच मेडिकल प्रवेश परीक्षेसाठी घेण्यात येणारी नीट परीक्षा प्रशिक्षण केंद्र लिफ्ट फॉर अपलिफ्टमेंट, पुणे यांच्या सहकार्याने सुरू केले.

शाळा आणि शाळेची इमारत जितके दिवस लॉकडाउन मध्ये बंद होती, तितके दिवस आमच्या तिन्ही शाळेचे शिक्षक, कार्यकर्ते रोज विविध गावात मोटर सायकलवर जाऊन 32 सेंटर झाडाखाली चालवत होते. दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांचे नुकसान कमीतकमी व्हावे आणि शिक्षणाशी नाळ तुटू नये हा त्या मागचा उद्देश होता. मोबाइल, मोबाइल नेटवर्क, ऑनलाइन शिक्षण, तसेच लाइट नसतांना त्यांच्या दारापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा आमच्या सर्व शिक्षकांनी पुरेपूर प्रयत्न केला.

सध्यातरी सर्व विद्यार्थी शाळेत परतले आहेत. त्यामुळे परिसर बाळ गोपाळांनी व विद्यार्थ्यांनी गजबजलेला आहे. पुढे लॉकडाउन होऊ नये आणि कोरोना हद्दपार व्हावा हीच प्रार्थना सर्व जग करीत आहे. प्रकल्पातील 18 वर्षांच्यावरील सर्वांचे कोविड लसीचे दोन्ही डोस घेऊन झाले आहेत.

लोक आग्रहास्तव 2021 मध्ये मे आणि जून या दोन महिन्यात आम्ही अहेरी तालुक्यातील 2 गावात व भामरागड तालुक्यातील 2 गावात तलाव खोलीकरणाची कामे केली. आत्ता ती सर्व तळी तुडुंब भरली आहेत. त्यात आम्ही मत्स्यबीज पण आणून टाकले आहेत. त्याचा फायदा गावांना नक्की होईल.

लोक बिरादरी दवाखान्याचे कार्य हे 1973 पासून कधीच बंद पडलेले नाही. उपेक्षित, गरीब, आदिवासी व इतर सर्वांना अविरत आरोग्य सुविधा नियमित देणे सुरू आहे. प्रशासनाला मदत म्हणून कोविड लसीकरण मध्ये दवाखान्यातील कार्यकर्त्यांनी भामरागड तालुक्यातील अनेक गावात जाऊन लसीकरण केले.

या वर्धापनदिन विशेषांकात महाराष्ट्रातील जनतेने लेख, कविता, कथा, चित्र असे साहित्य पाठवावे म्हणून आम्ही विविध माध्यमातून त्याची जाहिरात केली होती. बऱ्यापैकी साहित्य ईमेल मार्फत आम्हाला प्राप्त झाले. त्यातील निवडक आम्ही प्रकाशित करीत आहोत. निवड समितीने त्यावर भरपूर मेहनत घेतली आणि अंक वेळेवर प्रकाशित झाला. साहित्य पाठविणाऱ्या सर्व जनतेचे आणि संपादकीय मंडळाचे खूप खूप आभार. अंकात वापरण्यात आलेले इतर साहित्य (फोटो, चित्र) ज्यांच्या वैयक्तिक मालकीचे असेल त्यांचे आभार.

अंक वाचल्यावर आपणा सर्वांचा प्रतिसाद मिळाला तर यातील उणीवा पुढील वेळी दूर करू. प्रतिसाद मिळाला की उत्साह वाढेल आमच्या टीमचा. हा अंक फक्त डिजिटल स्वरूपातच प्रकाशित होत आहे व लोक बिरादरी प्रकल्पाची अधिकृत वेबसाईट www.lokbiradariprakalp.org येथे उपलब्ध आहे याची नोंद घ्यावी.

अनिकेत आमटे
संचालक
लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा
aniketamte@gmail.com

अंकातील लेखात/कवितेत व्यक्त केलेले विचार किंवा मत लेखकाची वैयक्तिक मतं आहेत. त्यांच्याशी संपादक व संपादकीय मंडळ सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

शब्दसाठवण

- आई .... मोक्षदा मनोहर- नाईक 08
- आक्रोश रावणाचा .... अरुण जाधव 11
- Travel Diaries of A Nomadic Family .... उर्मी कपाडिया 13
- स्व-मग्नतेच्या जगात .... अंबिका टाकळकर 16
- तरुणाई आणि वेगळेपणाची मानसिकता............ शालिनी वाघ 24
- भामरागडातील लोकवस्ती बाबांची कृपा - मुलाखत......... 26
- रिॲलिटी शो .... गौरव नायगावकर 30
- सद्भावना यात्रा............ भूषण देशमुख 32
- महोत्सव............ वैशाली सुळे 40
- चेहरा हरवलेल्या माणसातील आग शोधणारा चित्रकार....... किरण डोंगरदिवे 42
- हेमलकसाची आपुलकी .... वैभव प्रभुदेसाई 48
- मनस्वी नाटककार- बाबा डीके .... अरुण डीके 51
- गोष्ट बोडंगे गावाची - मुलाखत 56
- माझे 'वन' डे .... डॉ. अ. द. खोलकुटे 57
- कोरोनाचा फायदा .... डॉ. मालिनी नाडकर्णी 61
- लोक बिरादरी आश्रम शाळेतील माझे अनुभव .... योगेश पवार 65
- हरिश्चंद्र गडाकडे जाणारी माणुसकीची वाट .... गौरव पाटील 67
- लोकबिरादरी प्रकल्पामुळे मिळाले नवजीवन - मुलाखत 73

काव्यसुमन

- जिद्द .... नीला पाटणकर 78
- जोहार............ प्रणव तडवळकर 79
- कोरोना योद्धा .... डॉ. संतोष डाखरे 80
- राहून गेलं ?............ प्रशांत केळकर 81
- प्रकाशपुष्प .... अमित भांडे 82
- स्त्रीवाद .... मयुर माने 83
- दे मला .... संगीता शेंबेकर 84
- वात्सल्य झरा .... अश्लेष माडे 85
- समाजसेवक .... मोनिका बदकु 86

Department wise Annual Report

- Health Care 88
- Education 91
- Social and Rural Development 93

शब्दसाठवण



आई...

कोणताही पुरस्कार हा एखाद्या व्यक्तीच्या सेवेचा सन्मान असतो, गौरव असतो. आजवर त्यांनी केलेल्या कष्टाची मेहनतीची, सेवाभावाची ती पावती असते. 15 नोव्हेंबरला आईला मातृसेवासंघाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. मातृसेवा संघाचा 2021 चा सेवाव्रती पुरस्कार हा खऱ्या अर्थाने आईच्या आजवरच्या सेवेचाच सन्मान आहे, हे मात्र नक्की.

माझी आई म्हणजे सौ.रेणुका विलास मनोहर. जन्मापासूनच आनंदवनच्या कुशीत वाढलेली व पूर्वाश्रमीची कु.रेणुका मुरलीधर आमटे या नावाने ओळखली जाणारी. आईवर मोठे बाबा व आजीच्या(श्रद्धेय बाबा आमटे व साधना ताई) संस्काराचा अमीट ठसा उमटलेला आहे. 'श्रम हाच श्रीराम' हा वेदमंत्र जपणाऱ्या वातावरणात बालपण गेल्यामुळे दुसऱ्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठी सर्व तऱ्हेने प्रयत्न करणे व सतत कार्यमग्न राहणे हा आईचा पिंडच बनला.

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील लोकमान्य विद्यालयात अकरावी पर्यंतचे शिक्षण आईने घेतले, नंतर वर्धा व त्यांनतर मातृसेवासंघ नागपूर येथे नर्सिंगचा कोर्स तिने केला. आईने शालेय जीवन एक निपुण खेळाडू म्हणून गाजवले. शालेय जीवनात ती थ्रो-बॉल, खो-खोची स्टेट लेव्हलची खेळाडू होती. याशिवाय एक उत्तम धावपटू म्हणूनही तिचा नावलौकिक होता. आनंदवनात राहत असताना रोग्यांची शुश्रूषा करण्याचे काम आई आनंदाने करत असे. तिच्यातील या उपजत सेवावृत्तीला ओळखून पुढे मोठे बाबांनी हेमलकसा प्रकल्पात काम करायला जाणाऱ्या पहिल्या निवडक तुकडीत प्रकाश मामा व मंदा मामी (डॉ.प्रकाश व डॉ. मंदा आमटे) यांच्यासोबत आईची निवड केली. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेल्या या प्रकल्पाच्या जडणघडणीत आईचा मोठा वाटा आहे हे कुणीही नाकबूल करणार नाही. प्रकल्पाच्या सुरुवातीच्या बिकट काळात सर्व अभावांशी झुंज देताना प्रकाश मामा - मंदा मामी व इतर कार्यकर्त्यांना आईची साथ सदैव मोलाची ठरली.

सुरवातीला लोकबिरादरी प्रकल्पात आईने दवाखान्यात काम केले. 1976 साली प्रकल्पाने आश्रम शाळा सुरू केली. तेंव्हापासून ते आजतागायत आईने स्वतःला विद्यादानाला वाहून घेतले. शिक्षण अथवा शाळा या गोष्टींचा गंधही नसलेल्या आदिवासी पालकांना मुलांना शाळेत पाठवण्यासाठी प्रवृत्त करणे व आपली मुले सुखरूप राहतील असा विश्वास त्यांच्यात निर्माण करणे, मुलांना जिव्हाळा वाटेल असे वातावरण निर्माण करणे, त्यासाठी त्यांची भाषा, त्यांचे खेळ, त्यांचे नाच - गाणी व त्यांचे जीवनमान यात रंगून जाणे या गोष्टींमध्ये ती तरबेज झाली. अगदी सेवानिवृत्त होईपर्यंत तिने दरवर्षी या शाळेतील पहिलीचाच वर्ग सांभाळला. कारण नवीनच आलेल्या आदिवासी मुलांना घरची आठवण होऊ नये, त्यांची स्वच्छता, त्यांचे आजारपण, त्यांच्यात अभ्यासाची गोडी लागावी यासाठी काय प्रयत्न केले पाहिजे हे इतक्या वर्षांच्या अनुभवातुन तिच्या लक्षात आले होते. ज्यावेळी पाठयपुस्तकात परिसर अभ्यास समाविष्ट झाला नव्हता त्यावेळीही आई मुलांना परिसर अभ्यासाचे धडे देत होती.

आजही या प्रकल्पातील शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुली दिवसाचे चोवीस तास आईच्या सहवासात असतात. आईने खूप वर्षं मुलींचे वसतीगृह सांभाळले. स्वच्छता, नीटनेटकं राहणे, वक्तशीरपणा व आत्मविश्वासाने परिपूर्ण असलेल्या या आदिवासी मुली जेव्हा आपल्याशी बोलतात तेव्हा त्यांच्या एकूण जीवनावर पडलेली आईच्या व्यक्तिमत्त्वाची छाप लगेच जाणवते. विकासाची पुसटशी चाहूल न लागलेल्या आदिवासी बांधवांना समर्थ, सशक्त व जबाबदार पिढी बहाल करण्याचे कार्य आजही ती करत आहे. मुळात स्वतः एक उत्कृष्ट खेळाडू असल्यामुळे शिक्षणासोबतच अनेक उत्तम खेळाडू ही तिने या शाळेतून घडवले. बोलण्यापेक्षा कामावर भर असणाऱ्या आईचा संपूर्ण दिवस हा प्रकल्पाच्या व्यवस्थापनात जात असतो. आदिवासी मुलं-मुली असो की प्रकल्पात नव्याने काम करायला आलेले कार्यकर्ते असो, सगळयांची काळजी घेणे, त्यांचं हवं नको ते बघणे ह्या गोष्टी ती अगदी मनापासून करत असते. मग ती कधी रेणुका ताई असते तर कधी कोणाची काकू, मावशी तर कोणाची रेणुका आत्या होते. हेमलकसा प्रकल्पात असणाऱ्या प्राण्यांची पण ती तितकीच काळजी घेते. घरासमोर असणाऱ्या हरणांना चारा मिळायला उशीर झाला की अस्वस्थ होताना मी स्वतः तिला अनेक वेळा पाहिले आहे. आमच्या घरी जेवढे ही प्राणी आम्ही सांभाळले त्या सगळयांना आई खूप हवी असायची.

प्रकल्पातील मेस साठी लागणाऱ्या भाजीपाल्याची, प्रकल्पाने आदिवासी गावात सुरू केलेल्या शाळेच्या रेशनची व्यवस्था तर ती अतिशय उत्तमरीत्या सांभाळते. आजही ती शाळेतून निवृत्त झाली असली तरी आपल्या परीने मुलांना शिकवत असतेच. नोकरीत असतानाही तिने कायम संस्थेच्या मानधनाइतकीच रक्कम स्वीकारून बाकी रक्कम संस्थेला मदत म्हणून दान केली.

आमच्या शिक्षणाच्या बाबतीत ही आई खूप आग्रही होती. आम्हांला एक आई म्हणून आणि एक सच्ची कार्यकर्ती म्हणून तिचा कायमच अभिमान वाटत आलेला आहे. बाबाचा (विलास मनोहर) तिला कायमच पाठिंबा असतो. पुण्याच्या आजीला (शांताबाई मनोहर) तर आईच्या कामाचे खुप कौतुक होते. या सगळया तिच्या कामात आमटे परिवाराची, मनोहर कुटुंबियांची, सगळया कार्यकर्त्यांची तिला कायमच साथ आहे.

चंद्रपूर येथील लोकसेवा व विकास या संस्थेने दर वर्षी एका महिला कार्यकर्त्याचा पुरस्कार देऊन गौरव करण्याचे ठरवले. कस्तुरबा गांधी स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचा सर्वप्रथम मान आईला 22 फेब्रुवारी 1996 ला मिळाला होता. 9 मार्च 1997 तिला यंग मेन्स गांधी असोसिएशन राजकोटचा

नारीसमाजसेवेचा ही पुरस्कार मिळाला होता आणि काल म्हणजे 15 नोव्हेंबर 2021ला तिला मातृसेवासंघाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. आईने पहिल्यांदा उत्स्फूर्तपणे भाषण केले. खूप छान बोलली ती. आई यावळेस बोलताना म्हणाली की, "आज मला अनेकजण विचारतात की तू स्वतःचे घर बांधले की नाहीस? त्यावेळेला मी हसून नाही म्हणते, कारण मी घरं नाही बांधले पण अनेक गावं मी बांधली आहेत. भामरागड तालुक्यातील अनेक गावांमधे माझे विद्यार्थी आहेत आणि त्या प्रत्येकाच्या घरी माझे अगदी आईप्रमाणे स्वागत होते." आणि ही गोष्ट अगदी खरी आहे. कुठल्याही गावात आम्ही कधी गेलो की ही मुलं ताई.... म्हणत आईला चिकटतात. अगदी सुरवातीपासूनच आईसाठी हेमलकसा हेच विश्व होते, आज ही आहे आणि पुढे ही राहणार. आदिवासी मुलं, त्यांचे शिक्षण, त्यांचे खेळ हा तिचा विकपॉइंट आहे. त्यांच्यातच ती खुश असते. या पुरस्काराच्या निमित्ताने तिच्या या सगळया कामाची दखल घेतली गेली याचा आम्हाला आनंद आहे, अभिमान आहे.

मिळालेल्या पुरस्काराचा तिलाही आनंद झाला. तो सगळा आनंद, ती ऊर्जा घेऊन रोजच्याप्रमाणे ती आज कामालाही लागली असेल यातही काही शंका नाही. या पुरस्काराच्या निमित्ताने हे लिहावेसे वाटले इतकंच....

खूप खूप प्रेम आई!

तुझीच मोक्षदा!

(ह्यातील काही संदर्भ डॉ.जया द्वादेशीवार यांनी आईवर लिहलेल्या लेखातल्या व बाकी माझ्या भावना आहेत)

मोक्षदा मनोहर-नाईक
91-9421878193
mokshadamanohar77@gmail.com

“दुसऱ्याच्या सावलीत तुम्ही स्वतःची सावली कधीच बनवू शकत नाही, त्यासाठी एकट्याला उन्हात उभा रहाव लागत.”

- डॉ. प्रकाश आमटे

आक्रोश रावणाचा

दसऱ्याच्या सांजपर्वी धगधगत्या रावणाचा आक्रोश कानी पडत होता, प्रभू श्रीराम असल्याच्या अविर्भावात गर्दीतील प्रत्येक जण रावणाच्या दहनाने विजयश्री अंगात संचारल्यागत उल्हसित होता. विजयाचा अदृश्य मुकूट प्रत्येकाच्या माथी सजला होता. पदोपदी 'सीतेची' अब्रु पायदळी तुडविणारे तथाकथित' राम' दशाननाच्या जळण्याने मनोमन सुखावले होते. मैदानी धगधगणाऱ्या रावणाकडे बघून गर्दीच्या गर्भात दडून बसलेला रावण मात्र, दुसऱ्याचे कुसळ बघून स्वतःच्या मुसळाकडे दुर्लक्ष करणाऱ्या मानवी प्रवृत्तीवर नर्मविनोद करत हसत होता.

विजय रथावर आरूढ झालेल्या दहनकरी मंडळींमध्ये रावणाची भेदक आणि शोधक नजर गरागरा घिरट्या घालत होती. एरवी सिंहासनारूढ असलेल्या लंकाधिशाला आज विस्तवाच्या चटक्यापेक्षाही काही प्रश्न अधिक जाळत होते, क्षिप्त – विक्षिप्त प्रश्नांची सरबत्ती त्याच्या दहाही मेंदुत अगदी गजकर्णासारखी भळभळत होती. कारण एकच, विराट गर्दीत त्याला एकाही रामाचं दर्शन होत नव्हतं.

धगधगत्या प्रत्येक ज्वाळातून त्याचा आक्रोश निनादत होता. 'मी रोज जळायला तयार आहे मात्र येणारा बाण रामाचा असावा. प्रत्येक ज्वाळेसह प्रश्नांचा धूर बाहेर पडत होता –

प्र.१ वयात येताच पित्याचा उपमर्द करणाऱ्या, पित्याला शिवीगाळ करणाऱ्या, प्रसंगी हातही उगारणाऱ्या पिढीमध्ये पित्याच्या आदेशाने साऱ्या साम्राज्याचा त्याग करून पित्याने वनावासात पाठवले असे न म्हणता 'पिता देही मोहे कानन राजू' (पित्याने मला जंगलाचा राजा बनविला) म्हणणारा दशरथपुत्र राम कुठे आहे?

प्र.२. नवमासी गर्भात वास करूनही मुखी अमृततुल्य नवनाडीचं क्षीर प्राशन करूनही गरज सरताच निराधार मातेला गर्भगळीत करणाऱ्या पुत्रामध्ये कौसल्या, केकयी, सुमित्रेला समदर्जा देणारा कौसल्यानंदन कुठे आहे ?

प्र.३. जमिनीच्या अल्पशा तुकड्यासाठी, बहिणीशी जन्माचे नाते तोडणारा, राखीचा अनादर करणाऱ्या धनचूंबक भावामध्ये खुद्द पित्याने अवहेरूनही बहिणीला परत अयोध्येला आणणारा शांताअनुज कुठे आहे?

प्र.४. रक्ताचं, दुधाचं सख्ख नातं असूनही विविध कारणासाठी फुट पडणाऱ्या भावांमध्ये, सावत्र आई आणि बंधूसाठी संपूर्ण सिंहासनाचा, साम्राज्याचा त्याग करणारा भरताग्रज कुठे आहे?

प्र.५. क्षणिक सुखाच्या बळी जाऊन, हुंडा, चारित्र्यसंदेह, परस्त्री मोहाला बळी पडणाऱ्या पुरुषांमध्ये तद्‌आयुष्य एकपत्नीव्रत धारण करणारा सियाराम कुठे आहे?

प्र.६. खुर्चीसाठी परस्परांच्या तंगड्या ओढणाऱ्या आणि प्रसंगी तोडणाऱ्या राज्यकर्त्यांमध्ये, जनतेच्या इच्छेखातर स्वतःच्या सर्वात जिवलग पत्नीचा त्याग करणारा आदर्श अयोध्यानरेश राम कोठे आहे?

प्र.७. एकतर्फी प्रेमातून पावलोपावली स्त्रीयांची अवहेलना करणाऱ्या तरुणांमध्ये अहिल्येची वेदना जाणून तिला पिडामुक्त करणारा स्त्रीहितेषी राम कुठे आहे?

प्र.८. दुसऱ्याच्या धनावर सुक्ष्म कुदृष्टी ठेवाणाऱ्या दुष्ट योद्ध्यांमध्ये बालीचा वध करूनही सुग्रीवाला गादी देऊन त्याचा ताराशी विवाह लावणारा न्यायाभिमुख राम कुठे आहे?

प्र.९. दुरदेशी राहून स्वतःच्या मातापित्याच्या अंत्ययात्रेला उपस्थित न राहणाऱ्या कपूतांमध्ये स्वतःच्या पित्याचा दर्जा देऊन जटायूचा विधिवत अंत्यविधी करणारा सपूत राम कुठाय?

प्र.१०. आणि काम, क्रोध, मद, मोह, ईर्षा, लोभ या षडरीपूनी युक्त या गर्दीमध्ये एखादा तरी या दुर्गूणांवर विजय मिळविलेला पुरुषोत्तम प्रभू श्रीराम कुठे आहे?

प्र.११. जनसागराच्या अफाट गर्दीत बऱ्याच सान-थोर 'सीतामैय्यांच्या' नेत्रातही माझ्या दहनक्रियेच्या धुरांनी आनंदाश्रू तरळत होते. मात्र त्यांत मातापित्याच्या मान मर्यादेचं पालन न करता त्यांच्या अब्रूची लक्तरे करणाऱ्या मुग्धांमध्ये स्वचरीत्र हितेषी जनकनंदीनी कुठेच दिसत नव्हती.

प्र.१२. स्वमर्जीने भावनाविवश होऊन नको त्या पुरुषांशी परिणीत होऊन संबंध आयुष्य परीताप करणाऱ्या स्वार्थी कन्यांमध्ये केवळ पित्याच्या मर्जीने स्वयंवर करणारी मैथिली कुठेच दिसत नव्हती.

प्र.१३. घायाळ करणाऱ्या नजरा, बिभत्स, अश्लील अंगविक्षेप आणि निरंकुश अंगप्रदर्शन करणाऱ्या उच्चभ्रू 'स्त्रियां'मध्ये आपल्या नितळ कायेला अलवार वस्त्र आणि लज्जेचं पांघरुण घालणारी सुलक्षणापुत्री कुठेच नव्हती.

प्र.१४. पावलोपावली सासू-सासऱ्यांवर तोंडसुख घेणाऱ्या स्नुषांमध्ये अविरत सासु सासऱ्यांची सुश्रुषा करणारी कुलवधू वैदेही कुठेच दिसत नव्हती.

प्र.१५. व्हॉट्सअप, फेसबुकच्या नादात संतती संस्कारांकडे दुर्लक्ष कुरणाऱ्या कुमातांमध्ये पित्याचे छत्र हरवूनही लवकुशांचे राघवी संस्कार प्रवाही ठेवणारी मातासीता कुठेच दिसत नव्हती .

प्र.१६. सौंदर्य आणि शरीराचे भांडवल करून पत, प्रतिष्ठेला पायदळी तुडविणाऱ्या पत्नींमध्ये माझ्यासारख्या बाहूबलीच्या वासनांध वास्तव्यात स्वतःला निष्कलंक ठेवणारी रामदुल्हारी कुठेच नव्हती .

सोळा नव्हे सोळाशे प्रश्न रावणाच्या मनमस्तिष्कात धुमाकूळ घालत होते. मात्र, मात्र, मात्र, केवळ आणि केवळ दुर्देवं लंकाधिशाच्या एकाही प्रश्नाचे उत्तर गर्दीतील एकाही 'सज्जनाकडे' नव्हते.

अरुण मांगिलाल जाधव,
भांबोरा (रामटेक)
arunjadhao377@gmail.com
+91- 8668269463

Travel Diaries of a Nomadic Family

'*Travel is the best teacher*' – this mantra was taught to me as a child among many other things. The other things I have forgotten over the years but this has stayed with me.

In 2017 my husband Marzban and I decided to leave our urban life of consumption and competition behind and lead an alternate life of simplicity and consciousness. Easier said than done – what does it mean to live simply and consciously? To seek answer to this question we decided to take up a journey through the country on roads less travelled, through smaller towns and villages, seeing how others living. We wanted this to be a slow journey and not a destination-to-destination travel. As Milan Kundera beautifully says, "There is a secret bond between slowness and memory, between speed and forgetting."

The journey was going to be unplanned. We decided to leave in 2020 after completing our projects on hand (we are architects by profession). We stopped formal education for our 8-year-old son Arzaan and decided to unschool him through the journey. Unfortunately, in March 2020 lockdown was announced. We spent two months cooped up in our pigeon hole apartment at Mumbai. Got a chance leave in June 2020 with the first relaxation of travel rules. We loaded up our pick-up truck which was to be our home for the next few years and headed out of Mumbai.

We drove down the west coast, zigzagging up the Western ghats, down the Deccan Plateau and back on the coast. Along the way we would stop for a week or a month up to four months volunteering at various organic farms, learning how to live with the land. We spent a month at a potter's studio and tried to learn processes of terracotta pottery. The biggest challenge was to slow down our pace of life and become sensitive to the cycles of nature which we had neglected staying in a city. Waking up with the sun and sleeping with the sun was an alien concept. Electricity and water supply was taken for granted without much reverence for natural resources. Contributing physical labour in growing food made us look at each morsel of food with a renewed respect. Wasting a grain of rice on the plate felt painful.

After reaching Kanyakumari at the southern tip, we came up the east coast to the centre of the country. We arrived in Hemalkasa after having been on the road for more than a year in August 2021. We had heard about Baba Amte and Prakash Amte's life journey, but wanted to experience the place for ourselves. We came to Hemalkasa from Wardha via Chandrapur. After Ballarpur the road rarely went through any towns and the landscape changed from fields to dense forest and homes dispersed. The shades of green multiplied as we came closer to Hemalkasa and the remoteness of the place became clearer.

Arriving at Lok Biradari Prakalp, Hemalkasa campus we were shocked to see the level of infrastructure that had been established at such a remote location. The campus truly stands testimony to the years of hard struggle that the entire core team of LBP would have gone through. Sachin made us feel welcome and introduced us to the whole campus.

Samiksha tai met us and her enthusiastic bubbly nature combined with her humble grounded attitude inspired us to stay and volunteer for a month. We felt at home in no time.

Over the coming week we came to love many aspects of LBP. The mess where everyone, from the founder to the worker ate together the same food, Vijaybhai, Kishorbhau and team who cooked and fed us like their own family and even cooked non-spicy food for Arzaan. Exercising, walking, cycling twice a day was a routine for all aged people of the prakalp – this inspired us to follow the suite. The resident students took pride and ownership of the campus and practice *shramdaan* in keeping up the campus clean and beautiful.

We made some great friends during our stay. Kanchan and Bhushan became our family away from home. Renuka Aatya and Aatoba went out of their way to make us feel comfortable and welcome. It was fascinating to see them active throughout the day even at this age. Equally fascinating was to see Dr. Prakash Amte meeting each and every visitor that came to the campus and spend quality time with them in spite of his recent surgery and continuous pain. Kids were the life of the campus. Arzaan never felt lonely throughout our stay. He had his own independent family with the kids. We were fortunate to work with the kids, experimenting with different coloured mud plaster and painting on walls. The schools started by LBP in the surrounding villages are worth mentioning.

Our journey to Nelgunda changed our perception about level of dedication that people can have towards education. Geographically Nelgunda is only 23 km away from LBP but we took an hour and a half to reach there. Accessible only on a two wheeler during monsoons, it has no discernible road. You zig-zag through the forest, cross multiple streams that engulf the path, slip, fall and scrape yourself multiple times and reach this beautiful region which is completely cut off from any form of communication. No electricity, no cell phone coverage, no land-line and not even a post office. The kids walk from 2 to 10 km everyday to reach the school and teachers make the journey that we made, everyday from Hemalkasa. This kind of dedication is unheard of.

There were many more experiences at LBP that would not fit in this article but it suffices to say that seeing the third generation of the Amte family and the LBP team pouring themselves into the work for the development of the region and its people in the true sense is very heart warming. We will carry this experience of living sensitively and consciously through our journey and hope many people experience this for themselves – it definitely is the need of the hour!

Oormi Kapadia
oormi@mnopl.com
+91 98333 82215

स्वमग्नतेच्या जगात

दोन वर्षाचे मूल, शारीरिकदृष्ट्या काहीच वैगुण्य नाही, पण बोलणे कमी, एकटेच राहणे, फार मऊ किंवा फार खडबडीत स्पर्श नकोसा वाटणे, शून्यात नजर लावून बसणे, चिडचिड करणे, उगीचच रडणे अशी लक्षणं दिसली की बहुदा पालक आपलं बाळ मुडी आहे किंवा हट्टी आहे असे समजून त्याकडे दुर्लक्ष करतात. स्वमग्न बालकात शारीरिक व्यंग नसल्याने या मुलांच्या बोलण्या-वागण्यातूनच पालकांना लक्षणे ओळखावी लागतात. त्यामुळे अनेकदा हे अपंगत्व उशिरा लक्षात येतो आणि तेव्हा नाइलाजाने आपल्या मुलांना मतिमंद बालकांच्या शाळेत दाखल करावे लागते.

खुपदा स्वमग्न मुलांबाबत काही गैरसमज आहेत ते म्हणजे, स्वमग्न मुल होणं म्हणजे पूर्वजन्मीचे पाप आहे, एखाद्या देवाचा कोप आहे, दिसायला सर्व ठीक ठाक तर दिसतोय पण मुद्दाम करतोय, सगळ समजत पण आम्हाला त्रास द्यायचा म्हणून असा वागतो, समाजामध्ये मिसळण मुद्दाम टाळतात, अति लाडाचे परिणाम म्हणजे स्वमग्नता,चुकीचे पालकत्व किंवा एकल पालकत्व ह्यामुळे मुलं स्वमग्न होतात, पालकांचे दुर्लक्ष किंवा अतिलाड ह्यामुळे स्वमग्नता येते, छोट्या कुटुंब पद्धतीमुळे मुलांसोबत कोणी बोलत नाही म्हणून स्वमग्न होणं, हा मानसिक आजार आहे, हा मतीमंद असून त्यालाच स्वमग्न म्हणतात,हा आजार असून तो फक्त श्रीमंतातच होतो, आज नाही उद्या बोलेल, थोडा त्रास देतोय पण मोठा झाला कि होईल सगळे ठीक, आज कालच्या राहणीमानामुळे हा असा झाला, आई-बाबा दोघेही नोकरी करतात त्यामुळे मुल असे झाले, बुवा-गंडे दोरे, देव-दैव, उपास तापास, अंगारे धुपारे, ताईत दोरे, ताबीज ह्यातल्या कुठल्या तरी प्रकारामुळे मुल बरे होईल, इत्यादी. पण ह्या सगळ्या भ्रामक कल्पना आहेत खर तर स्वमग्नता म्हणजे नक्की काय? हे आपण समजावून घेवू.

<u>स्वमग्नता म्हणजे काय?</u>

संपूर्ण महाराष्ट्रात स्वमग्नता काय आहे ते ब-याच जणांना माहीत नाही. इंडियन स्केल असेसमेंट ऑफ ऑटिझमच्या सर्वेक्षणानुसार भारतात २० लाख मुले ऑटिस्टीक आहेत. स्वत:च्याच विश्वात, विचारात रमणे म्हणजे स्वमग्नता. ही स्वमग्न मुले नेहमी समाजापासून, अवतीभवतीच्या वातावरणापासून अलिप्त राहतात. नातेवाईक, मित्र-मैत्रिणी आजूबाजूचे लोक यांच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नसतं. स्वमग्नता हा आजार नुसून ती एक स्थिती आहे.

स्वमग्न मुलांमध्ये प्रामुख्याने जाणवणारी समस्या म्हणजे भाषा संप्रेषणाची, वैचारिक देवाण-घेवाणीची. सोप्या शब्दात समजावयाचं म्हणजे, जर आपल्याला एखाद्या अनोळखी प्रदेशात, अनोळखी लोकात एकटे नेऊन सोडले तर? आपण गोंधळून जाऊ, आपल्याला त्या लोकांची भाषा समजणार नाही वा आपली त्यांना! अशावेळी आपली जी स्थिती होईल नेमकी तशीच स्थिती या स्वमग्न मुलांची असते. म्हणूनच ही मुलं परिसराशी संपर्क नसल्यासारखी वागतात. बाह्य जगाशी यांचा काहीही संबंध नसतो. आपले बोलणे त्यांना ऐकू जाते व बरेचदा ती त्याप्रमाणे वागतात देखील, पण त्यांचे डोळे आपल्याकडे बघत नाहीत.

नजरेला नजर देत नाहीत. त्यांच्याकडून शाब्दिक प्रतिसाद फार क्वचित मिळतो. त्यामुळे कित्येकदा या मुलांवर मतिमंदत्वाचा शिक्का मारला जातो. पण यापैकी बरीचशी मुलं ही मतिमंद नसतात.

या मुलांना तात्पुरत्या स्वरूपाचे संबंध वा व्यवहार जमत नाहीत. त्यामुळेच तर ती स्वत:मध्ये मशगुल असतात. हि समस्या मुलांमध्ये जास्त तर मुलीमध्ये कमी असते. त्याचे प्रमाण ४:१ ह्या प्रमाणत असते.

स्वमग्न (ऑटिस्टिक) मुलांची लक्षणे

१. स्वमग्न असणे.
२. सतत एकच वर्तन करणे, म्हणजे उगीचच हात हलवणे, उड्या मारणे, गोल फिरणे वगैरे.
३. सतत रडणे वा हसणे किंवा क्षणात हसणे वा रडणे.
४. एखादा शब्द किंवा वाक्य सतत बोलत राहाणे तसेच आपण म्हटलेला शब्द किंवा वाक्य परत परत उच्चारणे. (ह्याला इकोलेलेरीया म्हणतात)
५. स्पेशल स्किल्स नसणे.
६. वास्तवातील गोष्टींची कल्पना करू न शकणे, पण कल्पनाशक्ती अफाट असणे.
७. अति ॲस्पर्नजर सिंड्रोम मुले काही कलांमध्ये निपुण असतात. उदा. गाणी, चित्रकला, कोडी, आकडेवारी, मोठी आकडेमोड तसेच वर्षानुवर्षांची कॅलेंडरची तारीख, वार, महिना किंवा रेल्वेचे वेळापत्रक पाठ करण्याची ताकद या मुलांकडे असू शकते. अल्बर्ट आइन्स्टाइनसुद्धा ऑटिस्टिक होता असे म्हणतात.
८. या मुलांना सेंसरी डिफेन्सिव्हनेस असू शकतो. म्हणजे वास, चव, आवाज, स्पर्श आणि दृश्य यांच्यापैकी कशाच्या तरी बाबतीत आवडी-निवडी टोकाच्या असतात. त्याचा त्रास त्यांना असहाय्य होतो.
९. ही मुलं रात्र रात्र भर झोपत नाहीत.

अशी काही महत्वाची लक्षण आहेत ज्याद्वारे मुलामधील स्वमग्नता ओळखता येते यामधील काही जरी लक्षणे असतील तर मुलांमध्ये काहीतरी गडबड आहे हे समजावे आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

स्वमग्न मुलांना नुसतेच शाळेत घालून उपयोग नसतो तर वेगवेगळया उपचार पद्धतीचा अवलंब करावा लागतो. या शाळामध्ये प्रत्येक मुलाची क्षमता लक्षात घेवून त्याप्रमाणे आय.इ.पी.(Individual Education Program) तयार करण्यात येतो. त्यांनतर प्रायमरी गोल ठरवून त्यावर काम करावे लागते. विशेष शिक्षण, स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, फिजिओथेरपी, म्युझिक थेरपी, डान्स थेरपी, तसेच ड्रामा थेरपी नुसार मुलांना शिकवावे लागते. स्वमग्न मुलांना शिकवण्यासाठी वेगवेगळया थेरपी बरोबर वेगवेगळया शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा लागतो. त्यामध्ये structure teaching, चित्रबोली(PECS), भाषाविकास पद्धती, शैक्षणिक विकास पद्धती, तसेच विविध कल्पकतेचा वापर करून शिकवावे लागते. ह्या सगळया गोष्टींचा उपयोग मुलांची अतिचंचलता कमी करण्यास तसेच त्यांची शिक्षणासाठी क्षमता वाढवण्यास मदत करते. आठवड्यातून दोन दिवस संगीत उपचार पद्धती, दोन दिवस ऑक्युपेशनल थेरपी, दोन दिवस फिजिओथेरपी ह्या पद्धतीने व वर्तन समस्यावर एकास एक पद्धतीने काम करून स्वमग्न मुलांना प्रशिक्षित करता येते.

दुर्दैवाने अनेक शहरात या मुलांना वरीलपैकी कोणत्याही प्रकारची थेरपी उपलब्ध नसते. त्यांना शिकवण्यासाठी विशिष्ट प्रकारची खेळणी उपलब्ध नसतात. या विशेष बालकांना शिकवण्यास खास

प्रशिक्षित शिक्षक नसतात. अश्या असंख्य समस्यांना पालकांना तोंड द्यावे लागते. पुण्या-मुंबईसारख्या शहरात थोड्या प्रमाणावर काही संस्था आहेत. पण औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, नागपूर शहरात अत्यल्प आहे.

औरंगाबाद शहरातील मुलांसाठी गेले दहा वर्ष झाले **'आरंभ'** नावाची संस्था काम करत आहे. त्यामुळे आता या शहरातील व मराठवाड्यातील मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यात येते. शहरातील स्वमग्न मुलासाठी व त्यांच्या पालकांसाठी वर्कशॉप आयोजित केले जातात. स्वमग्न मुलांना व्यायसायिक शिक्षण देवून त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली जाते. स्वमग्न मुल जसे जसे मोठे होत जाते, तसे तसे अनेक समस्यांना पालकांना आणि संस्थाना सामोरे जावे लागते. त्यातील एक समस्या म्हणजे वाढत्या वयातील मुलांच्या समस्या!

<u>वयात येतांनाच्या समस्या</u>

मुल सर्व साधारण असो वा विशेष, त्याच्या वाढीचा प्रत्येक टप्पा सारखा असतो. मानसिक जडण घडणी मध्ये जरी काहि कमी जास्त असले तरी शारीरीक जडण घडण मात्र सारखीच असते. सर्व साधारण मुलांला आपण कळत न कळत वयाच्या तिसऱ्या वर्षापासुन सेक्स(इथे फक्त मेल कि फिमेल अर्थात स्त्री किवां पुरूष असा होतो) शिकवत असतो. पण विशेष मुलांच्या बाबतीत मात्र आपण त्यांना सर्व सामान्य वर्तवणुक न देता अतिकाळजी घेतो आणि इथुन आपल्या वागण्यात कळत न कळत चुकत जातो.

प्रत्येक पालकाचा स्वतःच्या मुलाला स्विकारण्याचा कालावधी अन् तीव्रता वेगवेगळी असते, पण एकदा का मुलाचा स्वीकार झाला की खरी जबाबदारी सुरू होते ती आयुष्यभर. आज जर मुल चार वर्षाच असेल तर दहा वर्षा नंतर काय? हा प्रश्न प्रत्येक बाबतीत जर विचारत गेलो तर आपल्या पाल्यास नुसते भावनिक नाहीतर तांत्रिक दृष्टिकोनातुन सुद्धा परिपुर्ण बनवता येईल. उदा. खुपदा आपण अस बघतो कि चौदा पंधरा वर्षाचा विशेष मुलगा सरळ हॉल मध्येच पॅन्ट काढुन बाथरूम किवां टॉयलेट मध्ये जातो. पालकास लाजीरवाणे वाटते अन् त्यातल्या त्यात घरी कुणी आलेल असेल किवां आपण कुणाकडे गेलेलो असु अथवा शाळेतुन अशा प्रकारची तक्रार येते तेव्हा. पण ही समस्या येऊ नये म्हणुन आपण मुल अगदी लहान असतांना पासुन काळजी घेतली पाहिजे. सुरवातीपासुनच जर मुलाला बाथरूम जवळ जाऊनच पॅन्ट काढायची हे शिकवल पाहिजे. सुरवातीस त्रास होईल पण एकदा लागलेली सवय पुढे नेहमीसाठी कामी देईल. स्वमग्न मुलांना तर ह्या गोष्टी एकदा रूटिन मध्ये शिकवल्या तर ते आयुष्यभर लक्षात ठेवतात.

अश्याच छोट्या छोट्या गोष्टीतुन आपण त्यांना शिकवु शकतो. सुरवातीस मेल, फिमेल, मम्मी, पप्पा, भाऊ बहिण हे प्रत्यक्षात, फ्लॅश कार्ड आणि छोट्या छोट्या सोशल स्टोरिज मधुन सांगाव. त्यानंतर मुख्य भाग म्हणजे शारीरीक अवयवांची ओळख, आपण फक्त कान, नाक, तोंड, हात, पाय अशी जुजबी ओळख शिकवतो अन् नंतर सोडुन देतो. ह्या प्राथमिक अवयवानंतर हळु हळु शरीराच्या सर्व भागांची ओळख तसेच त्याच कार्य काय हे सारख सारख समजावुन सांगितल पाहीजे. (मान्य आहे हे अवघड आहे आणि प्रत्येक मुलाच्या बाबतीत वेगळे निकष आहेत)

खुप सारे पालक आणखीन एक समस्या घेऊन येतात ते म्हणजे मुल साधारणत किशोरवयात आल्या नंतर स्वतःच्या गुप्त भागाला सारख सारख हात लावतात.बरेचदा अस आढळुन येत की आपल्या गुप्त अंगाची स्वच्छता व्यवस्थित न ठेवल्यामुळे बऱ्याच समस्या निर्माण होतात. खर तर अश्या वेळी वडिलांनी मुलाला आंघोळ घालतांना शिकवल पाहिजे, स्वच्छता व काळजी कशी घ्यायची ते.

मुलींना वयात आल्यानंतर आईने अगदी न चिडता तिला ह्या सगळया गोष्टी समजावु सांगणे तसेच त्या चार दिवसात कशी काळजी घ्यायची तसेच शरीराच्या कुठल्या भागाला कुणालाही हात लावु द्यायचा नाही अन् कुणी लावलाच तर कसा प्रतिकार करायचा हे प्रात्यक्षिक करून समजावुन दिल पाहिजे.स्पर्श कसे

असायला हवेत, कसे नकोत, ह्याची जाणीव हळू हळू करून द्यायला हवी. दरवाजा लावून कपडे बदलणे, बाथरूम मधून कपडे घालून येणे, बाहेर वावरताना कशी काळजी घेतली पाहिजे ह्या सगळ्या गोष्टी शिकवता येतात.

मुलांच्या भावनिक किंवा लैगिग समस्या तर आपण थांबवू शकत नाही पण ते अयोग्य हातात जाणार नाहीत ह्याची काळजी नक्की घेवू शकतो. आपल्या मुलाला/ मुलीला आपण कुणाजवळ सोडत आहोत, कुठल्या शाळेत जात आहे, तिथले शिक्षक कसे आहेत किंवा ज्या बस मधून जात आहे ती सुरक्षित आहे का? घराजवळ कोण शेजारी आहेत, बाहेर जाताना आपण आपल्या पाल्यास योग्य व्यक्ती जवळ सोडून जात आहोत का? असे एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे आपणास आपल्या पाल्यास सुरक्षा देण्यास जास्त उपयोगी ठरतात. ह्या शिवाय डॉक्टरशी कन्सल्ट करून योग्य ती उपाय योजना करू शकतो.

स्वमग्न मुलांना बदल पटकन मान्य नसतो त्यामुळे स्वमग्न मुलगी असेल तर तिला साधारणता दहा वर्षापासून पुढे येणारी मासिक पाळी आणि त्यात घ्यावयाची काळजी हे शिकवलं पाहिजे त्याविषयी बोलल गेल पाहिजे. स्वमग्न मुलांत किशोर अवस्थेत भावनिक आणि शारीरिक बदल होत असतात. खुपदा किशोर वयातील मुलांचे पालक नेहमी समस्या घेवून येतात कि पहिले खूप छान होता पण आता खूपच ऑटीस्टीक झालाय किंवा त्याचे प्रॉब्लेम्स खूपच वाढलेत. खर तर मुल ह्या वयात खुपश्या भावनिक मनस्थितीतून जात असतात. त्यांना ह्यावेळेस खूप साऱ्या प्रेमाची आणि मायेची गरज असते. प्रेम मिळाल कि मग बघा आपले हे जमिनीवरील स्वमग्न तारे कसे प्रकाशमान होऊन त्याचं आणि आपल जीवन उजळून टाकतील.
वाढत्या वयातील मुलांच्या समस्या व्यवस्थित हाताळल्या तर मुल चांगल्या प्रकारे विकसित होतात. मुल थोडे मोठे झाल्यानंतर त्या पुढचा टप्पा येतो तो म्हणजे त्यांच्या करियरचा. त्यासाठी अगदी लहानपणापासून काम केले तर मुलांचे करियर घडते.

<u>स्वमग्न मुलांचे करीयर</u>
सुमारे तीन एक वर्षांपूर्वीचा एक प्रसंग. बेंगलोर येथे ग्लोबल ऑटिझम कॉन्फरन्ससाठी गेले होते. त्याठिकाणी त्या कॉन्फरन्सच्या अनुषंगानेच एक चित्रप्रदर्शन भरले होते. प्रदर्शनात फिरताना एक गोष्ट जाणवत होती की चित्रकाराला रंगांची खुप जाण होती. खुपच समर्पक अशी रंगसंगती होती प्रत्येक चित्रात. अचानक एका ठिकाणी पाय थबकले आणि जे दिसले त्यावर डोळ्यांचा विश्वासच बसला नाही. वीसएक वर्षांचा तरुण मुलगा बसुन पेंटिग काढत होता. आजुबाजुच्या गर्दीचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नव्हता. स्वतःमध्येच तल्लीन होऊन तो चित्र रंगवत होता. बाजुलाच बसलेल्या त्याच्या आईकडे चौकशी केली तेव्हा कळले की तो मुलगा ऑटिस्टीक म्हणजे स्वमग्न आहे. पण लहान असल्यापासुन त्याला चित्रांची, रंगांची जी आवड होती आज तीच आवड त्याला इथपर्यंत घेऊन आली आहे आणि तीच आवड त्याचे भविष्य पण घडवेल यात काहीच शंका नव्हती.
आज माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अनेक कवाडे खुलली आहेत.विकासाच्या नवनवीन वाटा निर्माण होत आहेत.

दहावी-बारावीत असलेल्या विद्यार्थांना करीअरची नवीन क्षितीजे खुणावत आहेत. ऑटिस्टीक मुलांसाठी पण अनेक संधींचा उदय होतो आहे. त्यांच्यात असलेल्या कला कौशल्याची ओळख करुन घेऊन त्यांना वाव मिळवुन देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अशाच काही संधींची आपण आज या ठिकाणी ओळख करुन घेणार आहोत.

स्वमग्नता म्हणजे स्वःतमध्येच दंग असणे. या मुलांना सभोवतालच्या वातावरणाचे परिसराचे काहीच भान नसते. त्यांना बदल मान्य नसतो. एखादी गोष्ट परत परत करण्याकडे त्यांचा कल असतो. सर्वसामान्य बुध्दीमत्तेच्या निकषांवर ही मुले जरी इतरांपेक्षा मागे असली तरी काही बाबतीत ही मुले पराकोटीची पुढे असतात. कुणाला संगीताची तर कुणाला रंगांची असामान्य समज असते. कुणी अतिशय उंचावर सहजगत्या वावरते तर कुणी क्लिष्ट गणिते चुटकीसरशी सोडवते. स्वमग्न मुलांच्या या कौशल्यांना वाव देऊन त्यांना समाजात मानाने ओळख मिळवुन देणे आज गरजेचे आहे आणि हे करताना आज जी नवनवीन क्षेत्रे उपलब्ध होत आहेत त्यांचा विचार करणे सुध्दा तितकेच गरजेचे आहे. कारण बऱ्याचदा अशा मुलांना मार्गदर्शन करताना फक्त छोट्या हस्तव्यवसायांचाच सल्ला दिला जातो. वर लिहिल्याप्रमाणे आज स्वमग्न मुलांसाठी पण काही क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध आहेत. जसे की ही मुले एखादी गोष्ट परत परत करण्यास कंटाळत नाहीत जिथे सामान्य मुले एका कालावधीनंतर कंटाळतात. त्यामुळे या मुलांना संशोधन करणे किंवा एखाद्या संशोधकाकडे सहाय्यक म्हणुन काम करणे लीलया जमु शकते. महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आइस्टाइन हे सुध्दा ऑटिस्टीकच होते हे खुप कमी लोकांना माहित आहे. आज पाश्चिमात्य देशांतुन अनेक स्वमग्न मुले योग्य प्रशिक्षण घेऊन वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये कार्य करीत आहेत.

जर एखाद्याने संगणकामध्ये विशेष प्राविण्य मिळवले तर तो प्रोग्रॅमर किंवा संगणकतज्ञ म्हणुन ही काम करु शकतो. तासनतास संगणकाच्या क्लिष्ट प्रणालीशी दोन हात करण्यासाठी आवश्यक असलेली चिकाटी नक्कीच या मुलांपाशी असते किंवा संगीताची आवड असलेला एखादा तासनतास रियाज करुन त्यावर प्रभुत्व मिळवु शकतो. गायन जरी या मुलांसाठी कठीण असले तरी एखादे वाद्य वाजविण्यात पारंगत होणे यांच्यासाठी मुळीच अवघड नाही. बेंगलोर येथील सॅमी मार्केस नामक एक स्वमग्न तरुण पाश्चात्य संगीतात डॉक्टरेट करुन आज विद्यापीठात मुलांना शिकवतो आहे. आपल्या पैकी अनेकांना उंचीची भिती वाटते. खुप उंचीवर गेल्यानंतर काम करणे तर दुर तिथे उभे रहाणे पण कष्ट्प्रद होते. स्वमग्न मुलांमध्ये दोन टोकाच्या गोष्टी आढळतात. बरीच मुले स्वतःचा तोल सांभाळु शकत नाहीत तर काही एखाद्या जिमनॅस्ट प्रमाणे उंचीवर कसरत करु शकतात आणि तोल सांभाळु शकतात. अशी मुले जिमनॅस्टीक सारख्या खेळात किंवा गिर्यारोहणाच्या क्षेत्रात नक्कीच नाव कमवु शकतात.

आजच्या जगात असंख्य घडामोडी, घटना सभोवताली घडत असतात. त्या घटनांचे संकलन करुन ती बातमी लोकांपर्यंत पोचविण्यासाठी पत्रकार महत्वाची भूमिका बजावीत असतो. अशा वेळी गरज असते ती निर्भिडपणे आणि तटस्थपणे ती बातमी तयार करण्याची आणि वृत्तपत्रापर्यंत पोचविण्याची. स्वमग्न मुलांसाठी करीयरचा हा सुध्दा एक चांगला पर्याय बनु शकतो. उत्पादन क्षेत्रामध्ये जिथे तासनतास एकच काम न कंटाळता करणाऱ्या लोकांची गरज असते तिथे सुध्दा स्वमग्न तरुण चांगले योगदान देऊ शकतात आणि स्वावलंबी जीवन नक्कीच जगु शकतात.

प्रेमाची भाषा ही जशी माणसांना समजते तशीच ती पशुपक्ष्यांना सुध्दा समजते. अनेकदा असे आढळुन आले आहे की स्वमग्न मुलांना इतरांशी संवाद साधायला जरी त्रास होत असला तरी पाळीव पशुपक्ष्यांशी त्यांचे नाते पटकन जुळते. यामुळे प्राण्यांशी संबंधित अशा काही क्षेत्रांमध्ये सुध्दा करीयरची संधी उपलब्ध होऊ शकते. जसे की जातीवंत प्राण्यांची पैदास, निगा, हाताळणी व तत्सम किंवा शेतीशी संबधित गोष्टी.फोटोग्राफी हा सुध्दा एक समर्थ पर्याय म्हणुन निवडता येऊ शकतो. यश मोहिरे या स्वमग्न मुलाने काढलेल्या फोटोला २०११ मध्ये झालेल्या राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. याव्यतिरिक्त ब्लॉकप्रिंटीग, दिवाळीसाठी शोभेचे दिवे बनविणे, आरास बनविणे, पेपर नॅपकिन, पाकिटे बनविणे, यासारखे अनेक छोटे-छोटे लघुउद्योग या स्वमग्न मुलांच्या स्वावलंबनासाठी कित्येक वर्षांपासुन चालविले जात आहेतच. या व अशा अनेक क्षेत्रांमध्ये आज स्वमग्न मुलांसाठी करीअरच्या संधी उपलब्ध होत आहेत. पाश्चिमात्य देशात या मुलांसाठी विशेष प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळवुन दिल्या जातात. डेन्मार्क येथील एक प्रसिध्द उद्योगपती थोर्किल सोने यांचा मुलगा ऑटिस्टीक आहे त्यांनी आपल्या आयटी कंपनीत अनेक ऑटिस्टीक तरुणांना नोकरी दिली आहे आणि हे सर्व तरुण आपल्या जबाबदाऱ्या लीलया पेलतात हे विशेष.

अशी अनेक उदाहरणे अमेरीकेत व युरोपातील देशांतुन सापडतात. अमेरीकेतील एका स्वमग्न चित्रकाराने फक्त वीस मिनिटे न्युयार्क शहराची हवाई पहाणी करुन संपूर्ण शहराचे हवाई दृश्य रेखाटले होते. दुर्दैवाने आपल्या भारतात मात्र तितकी जनजागृती न झाल्यामुळे अजुन खुप कार्य होणे बाकी आहे. पुण्यात एका कारखानदाराने आपल्या कंपनीत काही मतिमंद मुलांना नोकरी देऊन एक आदर्श निर्माण केला आहे. पण अजुन खुप मोठा पल्ला गाठायचा आहे.

आरंभ ऑटिझम सेंटर सुरु करण्याचा मुळ उद्देशच हा होता की स्वमग्न मुलांना जीवनात स्वावलंबी बनवणे आणि त्यासाठी त्यांच्यासोबत विशिष्ट पध्दतीने काम करण्याची गरज होती. कारण सर्वसामान्य मुलांसारखा अभ्यासक्रम, परिक्षा या मुलांसोबत शक्य नाही. आधी या मुलांना स्वतःची कामे स्वःत करणे जे सर्वसामान्य मुल अडीच-तीन वर्षात स्वतः करु शकते ते शिकवण्यापासुन सुरवात करावी लागते. यासाठी खुपच चिकाटीची गरज लागते. पण हळुहळु ही मुले एक एक गोष्टी शिकु लागतात. त्यानंतर विविध चाचण्यांद्वारे त्यांच्या क्षमता ओळखाव्या लागतात आणि खुप विचारपूर्वक त्यांच्यावर काम सुरु करावे लागते. किरण जोशी आमच्याकडे आला तेंव्हा त्याचे वय आठ वर्ष होते आणि त्याला फक्त अ आ इ असे प्राथमिक मुळाक्षरे लिहिता येत होती. त्याच्या क्षमतेनुसार शिकवले असता आज तो दहावी पास झाला असून 'पेस प्रशिक्षण' पूर्ण करून त्याच्या घरच्या मेडिकल स्टोर मध्ये काम करत आहे. यापेक्षा अजून काय हवे.

आरंभमध्ये स्वमग्न मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण सुरु केले आहे. मागील आठ वर्षापासून दिवाळीला आम्ही डिझाइनच्या पणत्या बनवतो. अंदाजे दोन हजार पणत्या दरवर्षी मुले बनवतात आणि समाजातून खुप चांगला प्रतिसादही मिळतोच व हातोहात साऱ्या पणत्या विकल्या जातात. ब्लॉक प्रिंटीग पण प्रायोगिक तत्वावर सुरु केले आहे. आरंभचा सर्वात महत्वाचा प्रोजेक्ट म्हणजे आरंभमध्ये स्वमग्न मुलांसाठी व्यावसायिक संगणक प्रशिक्षण. ज्यामध्ये डाटा एन्ट्री, टॅली, यमएस ऑफ़िस, प्रोग्रमिंग व अशा इतरही प्रकारचे शिक्षण देऊन या मुलांना त्यांच्या पायावर उभे करण्यास मदत होइल.

आरंभ संस्थेमध्ये आम्ही गेल्या दहा वर्षात पंधरा मुलांना स्वयंरोजगार देत त्यांना उत्पन्नाचे साधन देत आहोत. श्रीहरी हा आमचा विद्यार्थी, आमच्याकडे आला तेंव्हा त्याला मणी चांगल्या प्रकारे ओवता येत होते आणि त्याला रंगसंगतीची जाण होती असे लक्षात आले असता त्याला एकास एक शिकवले असता,आज तो उत्तम तोरण बनवतो. विक्रम तोमर हा पणत्या रंगवण्यात कुशल झाला असून तो आजमितीला तो दिवसाला ५० पणत्या रंगवतो. स्वराज हा मुलगा आमच्याकडे आला तेंव्हा तो सारखे गुणगुणत असे आणि तो पेन्सीलने वेगवेगळे आकार काढत असे, त्याला गाण्याची हळू हळू सवय लावली आणि चित्रकला शिकवली असता आज तो उत्तम गातो तसेच चित्रही काढतो. नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय गायन स्पर्धेत तो महाराष्ट्रातून शेवटच्या दहा स्पर्धकांमध्ये निवडला गेला आणि पुणे येथे त्याने अवधूत गुप्ते आणि वैशाली सामंत ह्यांच्या समोर गाणे सादर केले. त्याच्या चित्रांचे प्रदर्शन मालती आर्ट गॅलरी औरंगाबाद येथे भरवले असता त्याची १८ चित्रे विकली गेली. तसेच महाराष्ट्रामधील पहिला स्वमग्न चित्रकार म्हणून मान सन्मान मिळाला हे वेगळे नको सांगायला. मुलांचे स्वावलंबन टप्पा पार पाडल्यानंतर अजून एक प्रश्न समोर असतो तो म्हणजे त्यांच्या पुनर्वसनचा, त्यांच्या स्वतंत्रपणे आयुष्य जगण्याचा.

<u>आमच्या नंतर काय?</u>

मराठवाड्यातील नांदेड जिल्हातील एका छोट्याश्या तालुक्यातील एक पालक 32 वर्षाच्या ऑटिस्टिक

मुलाला घेऊन माझ्याकडे आलेले. ते स्वत: सत्तरीकडे झुकलेले, पत्नी दोन -तीन वर्षांनी लहान, बाकी दुसरी दोन्ही मुल नॉर्मल होती. त्यांची लग्न होऊन मुलगा बंगलोरला तर मुलगी अमेरीकेत सेटल झालेली. वार्धक्याकडे झुकलेल हे जोडपं, बत्तीस वर्षाच्या मुलाला घेऊन राहतातं. कुठेही जायच असल की ते त्याला घेऊन जातात. सर्व परिस्थिती ऐकल्यानंतर त्यानां मी विचारल, "मग पुढे काय? तुमच्यानंतर ह्या मुलाचं काय?" हा प्रश्न ऐकुन दोघही भांबावले. खर तर त्यांची घालमेल तीच होती पण ते ऊच्चारायला घाबरत होते इतकचं.

प्रत्येक दिव्यांग मुलाच्या पालकांना सतावणारा, भडांवून सोडणारा प्रश्न म्हणजे, आमच्या नंतर आमच्या मुलाचं काय? ह्याच प्रश्नाच उत्तर शोधण्याचा केलेला प्रयत्न आरंभ स्वमग्न व गतिमंद मुलांची संस्था, औरंगाबाद करत आहे. त्याचसाठी औरंगाबाद शहरालगत दोन एकर जागा संस्थेने घेतली असून तिथे स्वमग्न मुलांना त्यांचे हक्काचे घर देण्याचा मानस आहे.

स्वमग्न मुलांमध्ये लपलेल्या क्षमतांना ओळखुन त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण देण्याची आणि त्यांच्यात असलेल्या कर्तृत्वाच्या पंखाना आभाळ देणे ही आजच्या काळाची गरज आहे. दैदिप्यमान यशाच्या क्षितिजाला गवसणी घालण्याच्या अधिकार त्यांना ही आहे. समाजाच्या हितासाठी या मुलांना त्यांचे आभाळ मिळवुन देण्याची जबाबदारी आपली सर्वांचीच आहे हे आता नाकारुन चालणार नाही. त्यासाठी आपल्या हजारोंच्या हातांची आणि मदतीची आवश्यकता आहे.

अंबिका टाकळकर
संस्थापिका व संचालिका
आरंभ स्वमग्न व गतिमंद मुलांची शाळा व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद
ambikanidhu@gmail.com
+91-8275284178

"The future belongs to the common man with uncommon determination..."
-Baba Amte

तरुणाई व वेगळेपणाची मानसिकता

प्रस्तावना- *आजकालची तरुणाई आणि अनुभवी लोकांमधील वैचारिक पातळी भरून काढण्यासाठी, स्वभाव, सत्य परिस्थितीचे वर्णन करून योग्य जाणीव व्हावी, वेगळेपणाची मानसिकता मानवाच्या जीवनाला एक वेगळेपण निर्माण करून देते यासाठी पोषक विचार सांगितले आहेत. विचार, कृती आणि मानवी स्वभावाचे महत्त्व सांगण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. खालील लेख सर्व तरुणाईला समर्पित......*

'एक दिन बिक जायेगा माटी के मोल

जग मे रह जायेंगे प्यारे तेरे बोल'...

रोजचा दिवस जगताना त्या दिवसात विशेष काय करतो या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला तर प्रगती आणि अधोगती यामागील कारणे नक्कीच लक्षात येतात. आपला स्वभाव म्हणजे मनस्थिती किती मजबूत यावरून पुढील जीवनाच्या ध्येयाची पायरी मोजू शकतो. काय असतं माहिताय का मित्रांनो! आपल्या विचारांच्या साथीने आपली वाटचाल होत असते आणि या वाटेवर पावलांना योग्य दिशा गवसली की जीवनाचं सार्थक होतं. त्यावर कृती करणं ही तेवढंच महत्त्वाचं बर का........

येणारा दिवस येतो, जाणारा जातो; पण त्यात आपण काय शिकलो याकडे लक्ष द्यायला हवे. सगळेच धावतात त्या शर्यतीत सहभागी झालो तर तिथे स्पर्धा जास्त असते. प्रवाहाच्या वेगळ्या दिशेने जाण्याची हिंमत कोणीही ठेवत नाही. जर ती हिम्मत ठेवली तर एक वेगळेपणाची मानसिकता निर्माण होते. नक्कीच त्यासाठी उरात हिंमत आणि यथायोग्य नियोजन असायला हवे.

रोजच्या जीवनातल्या प्रसंगांना एक निराळेपण लाभले तर त्यात आनंद गवसू लागतो. तोच आनंद सुखी जीवनाला एक वेगळा आकार देतो. पाठीवर शाबासकीची थाप पडली की, मनात आनंदाची बेरीज, गुणाकार द्विगुणित होते.भले वेगळं पाऊल उचलताना आपल्या सोबत शंभरातून दहाजण सोबत असतील, त्यात खचुन न जाता येणा-या प्रश्नांना सामोरे जाण्याची शक्ती हवी. भावनिक आणि वास्तविक या मनाच्या दोन भागाचे शुद्ध पद्धतीने नियंत्रण करणे जमायला हवे. त्याने काय होईल तर आपल्या मनातलं वादळ शांत होईल आणि आपल्या कर्मावरील विश्वास अजून दृढ होईल. वाटतं तितकं सोपं नसलं तरी एक पाऊल आपल्या जीवनाला, आपल्यासारख्या इतरांच्या आयुष्याला एक अर्थ प्राप्त करून देणार असेल तर मुळात परंपरा रूढींना लहान लेकरा सारखं कवटाळुन बसणाऱ्या व त्यास संस्कृतीच नाव देणाऱ्या वृत्तीची जपवणूक करण्यात काहीही अर्थ नाही असे मला वाटते. संकुचित वृत्तीचे लोक आपल्या भोवती असतात. त्यांना दुरदृष्टी आणि हेतू यातील अर्थ समजला तर परिवर्तन होऊ शकते. परंतु स्वतःमध्ये परिवर्तन घडविण्यास कोणीही तयार नाही.

इतरांच्या चुकांवर लक्ष न देता आपल्यातील दोषावर मात करता यायला हवी. आपण एक बौद्धिक मनुष्यप्राणी आहोत, याची आपल्याला भूल पडता कामा नये.
काहींचा स्वभाव विचित्र वाटत असतो. त्यांना गप्पा-गोष्टी सारख्या किरकोळ गोष्टीत आनंद नसतो. वैचारिक पगडा त्यांना नेहमीच वेगळे बनवतो. प्रगल्भ विचार असेल तर मित्र-मैत्रिणीही कमी प्रमाणात असल्याचे आढळतात; पण संख्येपेक्षा साथ नेहमीच महत्त्वाची ठरते, होय ना?

जर आपले तसे वेगळेपण असेल तर योग्य उपयोग करून स्वतःसाठी, नंतर सर्वांसाठी त्याचा वापर करायला हवा. शेवटी माणूस म्हणून आपणही या पंचतत्वाचे काही देणे लागतो. मोठे काम करावे असं अजिबात नाही, छोटेच काम सोप्या पद्धतीने करावे असे अब्दुल कलाम सांगतात. अगदी तसंच! कलेचा असो, वैचारिक शक्तीचा वापर असो, अभ्यास करा. झाडे लावा प्रयोग करा, चित्र काढा, प्राण्यांवर प्रेम करा, पुस्तक वाचा, लिहा. खूप काही गोष्टी करता येण्यासारख्या आहेत; फक्त ठाम रहा. नंतर प्रगतीच्या मार्गात यशस्वी व्हाल तेव्हा मिळणार समाधान पहा, खूप अनमोल असणार आहे. त्यावेळी होणारी उन्नती खूप खूप पुढे नेईल. सोबत असणाऱ्या दहा लोकांची संख्या भले एक होऊ देत पण प्रयत्न अविरत चालू ठेवा. दहा वरून एक वर येणारी व्यक्तींची संख्या याची जाणीव करून देईल की सुरवातीला तुच तुझा साथीदार होतास आणि आज तुच तुझ्यासोबत आहे. तात्पर्य,स्वतःसोबत राहणं, स्वतःसोबत, स्वतःची मैत्री असेल तर अशक्य काहीच नाही.

हताश होणे, निराश होणे,नकारात्मकता येणे, भीती वाटणे या नैसर्गिक स्वभावावर मात करता यायला हवी. सकारात्मकता जोपासताना काळाची चाहूल परीक्षा घेते. त्यावेळी पाय रोवून उभे राहता यायला हवं आणि मग यशस्वी झाल्यानंतर खूप चांगले लोक संपर्कातही येतात. मैत्रीपूर्ण संबंध ही तयार होतात. कधी काळी एकटी असणारी व्यक्ती, व्यक्तींच्या घोळक्यात सामावली जाते.जीवन जगण्याच्या प्रवाहाला आपण वेगळी दिशा दिल्याचे समाधान स्वतःच्या मनात हजेरी लावते. आपल्या कामाची दखल घेणारे कोणी असेल किंवा नसेलही परंतु न पुसणारा ठसा पाऊलवाटेवर नक्की उमटतो.

प्रयत्न करताना सामाजिक आणि नैतिक मूल्यांचा स्वीकार करून आपल्यामुळे नैतिक मूल्यांना इजा होणार नाही, या प्रयत्नात नेहमी राहावं. व्यक्तीच्या नजरेत वेगळेपण असावं. व्यक्ती तितक्या प्रकृती खरंच आहे; परंतु सर्वांच्या नजरेत एकाच विचारांची दूरदृष्टी मांडण्याची कला आपल्यात असेल तर हीच वेगळेपणाची मानसिकता इतरांमध्ये रुजवता यायला हवी. उद्याच्या येणाऱ्या पिढीसाठी, भारत भूमीच्या लेकरांसाठी यापेक्षा मौल्यवान आणि रूचकर वैचारिक मेवा दुसरा कोणताही नसेल.
धन्यवाद!

शालिनी जगन्नाथ वाघ
विळद घाट, अहमदनगर
waghshalini27@gmail.com
+91- 8788911255

भामरागडातील लोकवस्ती बाबांची कृपा...

नाव-: आनंदराव महारु कुसराम
वय-:६०वर्ष
गाव-: गोंगवाडा, व्यवसाय-: शेती

प्र.१- तुमच्या लहानपणी भामरागड तालुक्याची किंवा तुमच्या गावाची स्थिती कशी होती?

आनंदराव-: आमच्या लहानपणी परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. खायला अन्न नव्हते. अंगावर कपडे नाही की, राहायला बरोबर घर नव्हते. मोहफुले उकडून खायचे, कक्कू(बांबुचे कोवळे कोंब) याला वास्ते ही म्हणतात. कुहकू(मशरुम), रानातला भाजीपाला, कंदमुळे खाऊन दिवस काढले. कधी-कधी सामुहिक शिकारीला जायचे व शिकार मिळाल्यावर प्राण्यांचे मांस उकडून खायचे. अंगभर कपडे मिळत नव्हते. माणसे लंगोटी व स्त्रियां कमरेभोवती फडके गुंडाळायचे. बरेच अंग उघडे असायचे. तरुणपणापर्यंत मी सुद्धा लंगोटी घालायचा. राहायला गवत-कुडाच्या झोपड्या होत्या. गाव लहान होते, शाळा आणि शिक्षणाचा काहीच संबंध नव्हता. वीज नव्हतीच. शेकोटीच्या प्रकाशात दिवस काढले. जंगली प्राणी, साप, विंचू यांची दहशत होती. आजच्यासारखी शेती नव्हती. रस्तेतर नव्हतेच. त्यामुळे वाहनांचा पत्ताच नव्हता. हाताला काम नाही, त्यामुळे पैसा नाही.पाऊस पडला की, काही लोक धान्य पेरायचे, उगवेल ते खायचे. रोवणी कोणीच करायचे नाही. फक्त अन्नासाठी एक-दुसऱ्याच्या मदतीला जायचे. चोरी हा प्रकारच आमच्यात नाही. घनदाट जंगल होते. जंगली प्राणी यांचा वावर होता. साधी सायकलही कोणाकडे नव्हती. त्यामुळे पायी-पायीच भामरागड व इतर गावांना जायचे.

प्र.२-: तेव्हाच्या स्थितीत व आता काय बदल जाणवतो?

आनंदराव-: शासनाच्या विविध योजनांमुळे आता खुप बदल झाले. कपडे-लत्ते, खाणे-पिणे सारेच बदलले. लोक आता आधुनिक पद्धतीने शेती करत आहेत. ट्रक्टरनी शेती होत आहे. रोवणी करायला लागलेत. स्वस्त धान्य दुकानातून १२० रुपयांत महिनाभर पुरेल इतकं धान्य मिळत. आजघडीला अन्नाचा प्रश्न सुटला आहे. आता कोणीही उघडे-नागडे राहत नाही. प्रत्येकांना अंगभर कपडे मिळतात. शासकीय योजनेतून अनेकांना घरकुल योजनेचे पक्के घर मिळाले आहेत. अन्न, वस्त्र, निवाऱ्याचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटला आहे. वीज गावागावात पोचली आहे. माझ्या गावातही वीजेचे खांब गाडून तार जोडणी झाली, मात्र अजूनपर्यंत त्यातून वीज सोडली नाही.लवकरच वीज सोडणार आहेत,असे सांगितले जाते. वाहनांची संख्याही वाढली. जंगलाची जागा शेतीने घेतली. जंगली जनावरे झपाट्याने कमी झाली आहेत. गावात जिल्हा परिषदेची शाळा झाली. जवळच नेलगुंडा गावी लोकबिरादरी प्रकल्पाने इंग्रजी माध्यमाची शाळा काढली. माझ्या

गावची मुले तिथे शिकायला जातात. मुली-मुले शिकू लागली. मोबाईल फोन आले. असे अनेक बदल झालेत.

प्र.३-तुमच्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग कोणता? सविस्तर सांगा.

आनंदराव-: माझ्या बाबतीत घडलेला असा काही प्रसंग आठवत नाही; परंतु माझ्या समोर घडलेले काही प्रसंग आहेत. त्यापैकी मी तरुण असतानाचा एक प्रसंग असा की,आम्ही गावातील तरुण शिकारीला जंगलात गेलो होतो. एका बाजूस जाळे लावून दुसऱ्या बाजूने प्राणी हाकलत असतांना अचानक एका जंगली डुकराने एका तरुणांकडे आपला मोर्चा वळविला. त्याला जोरात मुसंडी मारली व खाली पाडले. परत-परत त्या तरुणाच्या मांड्यांना धक्के देऊ लागला. तो जीवाच्या आकांताने जोरजोरात ओरडू लागला. आम्ही सर्वजण तिकडे धावलो. ते दृश्य पाहून मी खुप घाबरलो. लाठ्या-काठ्यांनी डुकराला मारु लागलो. त्यामुळे तो पळाला; पण तोपर्यंत आमचा सहकारी कण्हत,रडत होता. डुकराने त्याच्या दोन्ही मांड्या अक्षरशः सुळयांनी फोडून काढल्या होत्या. त्याच अवस्थेत त्याला उचलून गावात आणले. तिथून खाटेवर टाकून लोकबिरादरी प्रकल्पाच्या दवाखान्यात दाखल केले. अतिरक्तस्रावाने तो बेशुध्द झाला होता. डॉ. प्रकाशभाऊंनी त्वरीत उपचार सुरू केले. २० ते २५ दिवसांनी त्याच्या जखमा भरुन निघाल्या व तो घरी आला.

प्र.४-: लोकबिरादरी प्रकल्पाबद्दल आपल्याला काय वाटते?

आनंदराव-: लोकबिरादरी प्रकल्पामुळे आज भामरागड परिसर साबूत आहे, अन्यथा हा परिसर जलमय झाला असता. श्रद्धेय बाबा आमटे यांच्या प्रयत्नामुळे आज येथे लोकवस्ती आहे असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. यांचे कारण १९८० च्या दशकात केंद्र सरकारने सिरोंचाजवळ इंचमपल्ली येथे इंद्रावती नदीवर मोठे धरण बांधायचे ठरवले. वास्तविक या धरणाचे पाणी तत्कालीन आंध्रप्रदेश व आताच्या तेलंगणातील शेतीला मिळणार होते. मात्र आताचा भामरागड तालुका, सिरोंचा तालुक्याचा काही भाग तसेच अहेरी तालुक्यातील बराच परिसर धरणाच्या पाण्यामुळे बुडणार होता. आम्हा आदिवासींना याची काहीच माहिती नव्हती. मात्र बाबा आमटे यांनी या धरणाला विरोध केला. त्यांनी भामरागडला त्रिवेणी संगमाजवळ एक भव्य मेळावा घेतला. परिसरातील हजारों लोक मेळाव्यात हजर होते. मी त्यावेळी तरुण होतो. मीसुद्धा हजर होतो. बाबा आमटेंनी यावेळी धरणाबद्दल माहिती दिली. उपस्थित सर्वांनी धरण बांधू द्यायचे नाही अशी शपथ घेतली. बाबा आमटेंनी लढा तीव्र केला. किती लोकवस्ती व शेती धरणात जावून आदिवासी बेघर होणार हे केंद्र सरकारच्या लक्षात आणून दिले. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी धरण बांधणे रद्द केले. अर्थातच लोकबिरादरी प्रकल्प नसता तर बाबा आमटेंना या धरणाबद्दलची आदीवासींची समस्या कळली नसती. धरण झाले असते व हा परिसर आज जलमय असता.

प्र.५-: लोकबिरादरी प्रकल्प सुरुवातीस कसा सुरु झाला? सुविधा कशा होत्या?

आनंदराव-: प्रकल्प कसा सुरु झाला याबद्दल आठवत नाही. मात्र सुरुवातीला लहान-लहान झोपड्या होत्या. वडाच्या झाडाखाली प्रकाशभाऊ रुग्ण तपासायचे.औषध, गोळया, इंजेक्शन द्यायचे. झोपड्या होत्या पण व्यवस्था उत्तम होती. सुरुवातीला एकही मोठी इमारत नव्हती. आता भव्य इमारती उभ्या आहेत. येथील दवाखान्यातील सुविधा उत्तम आहेत.

प्र.६-: भविष्यात लोकबिरादरी प्रकल्पाकडून काय अपेक्षा आहेत?

आनंदराव-: लोकबिरादरी प्रकल्प भामरागड परिसरातील जनतेसाठी वरदान आहे. येथील दवाखान्यात उत्तम प्रकारचे उपचार केले जातात. सर्व जनता आजही याच दवाखान्यात उपचार घेणे पसंत करतात. येथील आश्रम शाळेतील शिक्षण दर्जेदार आहे. माझ्या गावातील अनेक मुली-मुले येथे शिक्षण घेत आहेत. काही मुले येथे शिकून शासकीय नोकरीत आहेत. खेळात नैपुण्य दाखवित आहेत. लोकबिरादरी प्रकल्पाने माझ्या गावाजवळ नेलगुंडा गावी 'साधना विद्यालय' ही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे. तिथेही माझ्या गावची मुले शिकत आहेत. ती लहान-लहान मुले इंग्रजीत बोलतांना त्यांचे फार कौतुक वाटते. प्रकल्पाने अनेक गावांत तलावांची निर्मिती करुन दिली आहे. आदिवासींचे हित जोपासणारी अनेक कामे लोकबिरादरी प्रकल्पातर्फे केली जात आहेत. हे सर्व सेवाकार्य अविरत सुरू राहावे अशी अपेक्षा आहे.

प्र.७-: प्रकल्पातील विविध सेवांचा तुमच्या व कुटुंबियांच्या जीवनात काय व कसा लाभ झाला?

आनंदराव-: बराच फायदा झाला.आजारी असल्यास आम्ही प्रकल्पाच्या दवाखान्यात उपचारांसाठी दाखल होतो. दरवर्षी जानेवारी महिन्यात मोठ्या शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात येते. तेव्हा अनेक दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णावर प्रकल्पाच्या दवाखान्यात शस्त्रक्रिया केल्या जातात. येथील शाळेत मुले शिकतात. भांडण-तंटे झाल्यास सोडवणूकीसाठी प्रकाशभाऊकडेच जायचे. असे एक ना अनेक फायदे झाले.

प्र.८-: डॉ.प्रकाशभाऊ व डॉ.मंदावहिनी यांचे सोबत कधी बोलले काय?

आनंदराव-: डॉ.प्रकाशभाऊंशी माझे वैयक्तिक बोलणे झाले नाही, मात्र गावकऱ्यांसोबत काही समस्या घेऊन भाऊंकडे जायचे, तेव्हा बोलणे व्हायचे. विषय वादविवाद सोडविण्याचे असायचे किंवा गावाकडच्या काही समस्या असायच्या. मंदावहिनींशी आजारी असताना दवाखान्यात गेल्यावर आजाराविषयी मोजके बोलणे व्हायचे.

प्र.९-: जंगल व जंगली प्राण्यांबद्दल तुम्हाला काय वाटते?

आनंदराव-: पूर्वी जंगल व जंगली प्राणी खुप होते. त्यावेळी आम्ही भरपूर शिकार केली. पण आता जंगल हळूहळू नष्ट होत आहे. जंगलाची जागा शेतीने व्यापली. जंगली प्राणी सुद्धा झपाट्याने नाहीसे झाले.आता तर शिकार करणे बंदच केल्यासारखे आहे. पूर्वी शिकार केली, जंगल व जंगली प्राणी वाचले पाहिजे असे आता मनापासून वाटते.

- मुलाखतकार आणि शब्दांकन
लीलाधर कसारे
liladharmohan@gmail.com
+91- 9421729386

रिऍलिटी शो

"....कट..कट्!" डायरेक्टरने कट म्हणताच शूटिंग थांबलं. एका सिंगिंग कॉम्पिटिशन रिऍलिटी शोचं शूटिंग चालू होतं. सध्या टॉप 12 स्पर्धक राहिले होते. अन स्पर्धेला अधिक रोचक, मनोरंजक बनवण्यासाठी ऊरलेल्या स्पर्धकांच्या घरची परिस्थिती 'कॅश' करून टीआरपी वाढवण्याचं काम ह्या दिगदर्शकाकडे आलं होतं.

आधीच्या दोन स्पर्धकांच्या घराच्या परिस्थितीचं 'विदारक, दाहक, दारिद्र्य, दुःख, संकट' दाखवून झालं होतं. त्याला टीआरपी ही चांगला मिळाला होता आणि ते आता रवीच्या, तिसऱ्या स्पर्धकाच्या घराकडे वळले होते. ह्या घरात तर 'खजिना' होता. दारिद्र्य तर होतंच, पण रवीची मोठी बहीण कॅन्सरच्या आजाराने खंगली होती.

मग काय, मोठ्या जोशाने दिग्दर्शक आणि त्याची टीम तिसऱ्या स्पर्धकाच्या घरी सकाळी सकाळीच पोहोचली होती. त्यांच्या सराईत नजरेने घरातली परिस्थिती नजरेखालून घातली. "इसबार टीआरपी बहोत मिलेगा, सर" असिस्टंट कानात कुजबुजला. लगेच अरेंजमेंटला सुरवात झाली. कोणत्या अँगलने शॉट घ्यायचा, कुठून क्लोजअप, इत्यादी गोष्टी ठरवल्या गेल्या.

घरच्या माणसांनाही सांगितलं गेलं, "तुमच्या घरात जे दुःख आहे, त्याबद्दल सर्वांना कळू द्या. लोकांना समजू दे की तुमच्या बहिणीच्या कॅन्सरने तुम्हाला किती त्रास होतोय, तुम्ही सर्व रात्रंदिवस रडत असता, बहिणीचं पुढे काय होईल ह्या विचाराने..... समजलं?" असिस्टंट घरच्यांना समजावून सांगत होता..

सगळ्यांनी माना डोलावल्या आणि चित्रीकरण सुरू झालं. पण दिग्दर्शकाला स्क्रीनवर कोणीही 'रडकं, दुःखी' दिसेना, ना कोणी दुःखाविषयी बोलेना. घरातले सगळेच आंनदी चेहऱ्याने रवीच्या गाण्याचं कौतुक करत होते. सर्वांच्या चेहऱ्यावर, दिग्दर्शकाला अपेक्षित असणाऱ्या दुःखाऐवजी रवीविषयी असणारं अप्रूप दिसत होतं.

".. कट, कट" दिग्दर्शक ओरडला. "अरे तुने उनको ठीकसे बताया नही क्या? रुक, मै ही समजाता हू इनको......"

असं म्हणून दिग्दर्शक घरातल्यांकडे वळला, "हे पहा, तुम्हाला किती दुःख झालंय, ते लोकांना समजू द्या. डोळयात अश्रू आले तर चांगलंच. म्हणजे आले तर येऊ द्या, असं म्हणायचंय मला. अन ताई, ह्या कॅन्सरमुळे तुम्ही किती हालअपेष्टामधून जाताय, ते समाजाला कळू द्या."

"पण साहेब, हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण आहे. अन आमचं दुःख, आमचा आंनद हिरावून नाही घेऊ शकंत. आम्ही सर्व मुळातच समाधानी, सुखी आहोत. हा कॅन्सर, हे दारिद्र्य आम्ही मुळात जे नाहीतच, ते आमच्यावर लादू नाही शकत. आणि दुःख आणि अश्रुंपेक्षा आंनद, हास्य पसरवणं हेच आयुष्य असायला हवं ना साहेब.."

ह्या घरातलं 'रिऍलिटी शो'चं वास्तव दिग्दर्शकाला 'शूट' करून गेलं होतं.........

गौरव नायगांवकर,
औरंगाबाद.
gau.nai@aol.in
+91-82371 65405

भारत – बांग्लादेश सद्भावना सायकल यात्रा

हा केवळ शंभर गावं, पाच राज्यं,
आणि दोन देशांदरम्यानचा
४२८० किलोमीटरचा
सायकल प्रवास नव्हता…......

ही होती
मनामनांना जोडणारी
मित्रत्वाचं नातं विणणारी
राष्ट्रप्रेमाचं स्फुल्लिंग चेतवत
समृद्ध भवितव्याकडे घेऊन जाणारी
स्नेहमयी सद्भावना यात्रा………

आपला इतिहास, संस्कृती आणि लोकजीवन जाणून घेण्यासाठी सायकलीवरून प्रवास करण्यासारखा दुसरा उत्तम मार्ग नाही. अन्य कुठल्याही वाहनातून होणारा प्रवास इतका वेगवान असतो, की आसपासची माणसं, त्यांचं जगणं समजुन घ्यायला पुरेसा वेळच मिळत नाही. सायकलीवरून आपण शांतपणे परिसर निरखत पुढे जातो, डोळ्यांबरोबर आपलं मनही सगळं काही बारकाईनं टिपत असतं.

महात्मा गांधींनी भारत जाणून घेण्यासाठीचा केलेला देशव्यापी प्रवास, विनोबा भावे यांची 'जय जगत' संकल्पना आणि महामानव बाबा आमटे यांच्या 'भारत जोडो' यात्रेपासून प्रेरणा घेऊन स्नेहालयनं सायकल यात्रेचा उपक्रम सुरू केला. भारत-बांग्लादेश सद्भावना सायकल यात्रेची पूर्वतयारी करताना स्नेहालयनं वर्ष २०११, २०१४, २०१८ आणि २०१९ मध्ये काढलेल्या चार सायकल यात्रांचा अनुभव उपयोगी पडला. महात्मा गांधी यांची १५०वी जयंती, आचार्य विनोबा भावे यांची १२५वी जयंती, तसंच लोकमान्य टिळकांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त २०१९ मध्ये आयोजित गोदे (रायगड)ते सेवाग्राम(वर्धा)या सायकल यात्रेतून खूप काही शिकायला मिळालं.

भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, बांग्लादेशच्या मुक्तीसंग्रामातील भारताच्या अतुलनीय योगदानाचा सुवर्ण महोत्सव आणि बांग्लादेशाचे राष्ट्रपिता शेख मुजीब रहेमान यांच्या जन्मशताब्दीचं औचित्य साधत भारत-बांग्लादेशातील मैत्री वाढवण्यासाठी महात्मा गांधी जयंतीला(२ ऑक्टोबर २०२१)'भारत- बांग्लादेश सद्भावना सायकल यात्रा २०२१' काढण्याचं स्नेहालयनं ठरवलं. महाराष्ट्र, छत्तीसगड, ओरिसा, झारखंड आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांमधून जात बांग्लादेशातील जस्सोर, खुलना, शिरोमणी, गोपाळगंज, तुंगीपाडा, ढाका, सोनारगाव, कुमिल्ला आणि नौखाली असा मार्ग नक्की झाला. स्नेहालयच्या कार्यकर्त्यांबरोबर, राज्याच्या विविध भागातील आणि काही राज्याबाहेरचे शंभरहून अधिकजण या उपक्रमात सहभागी झाले. अनामप्रेमचे दिव्यांग बांधव आणि अहमदनगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचा (एनसीसी)सहभाग उल्लेखनीय ठरला.
डिसेंबर १९७१ मध्ये झालेल्या लढाईत भारतानं पाकिस्तानवर मिळवलेला विजय एतिहासिक होता. अनन्वीत अत्याचारांना बळी पडलेल्या बांग्लादेशातील जनतेला भारतीय लष्करानं मोठा दिलासा देत त्यांचं स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी केलं. त्या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधत भारतात २०२०-२१ मध्ये 'स्वर्णिम विजय वर्ष' साजरं करण्यात आलं. यामध्ये सर्वसामान्यांचा सहभाग असावा, त्यातून दोन्ही देशांतील जनतेमध्ये जवळीक वाढून शांतता आणि सदभाव निर्माण होत विकासाचं नवं पर्व

सुरू व्हावं, या उद्देशानं स्नेहालयचे संस्थापक डॉ.गिरीश कुलकर्णी यांनी भारत-बांग्लादेश सद्भावना सायकल यात्रा काढण्याचं ठरवलं. सायकलींनं प्रवास करणं आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीनं चांगलं, शिवाय आर्थिकदृष्ट्या किफायतशीर. रोज साधारण पन्नास-साठ किलोमीटर प्रवास करत नवं गाव गाठायचं, तिथल्या स्वयंसेवी संस्था, संघटनांना भेट देऊन चेंज मेकर ठरलेल्या कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधायचा. परिसराचा इतिहास, भूगोल, जैवविविधता, संस्कृती आणि सामाजिक प्रश्नांचा अभ्यासही यानिमित्तानं करण्याचं ठरलं.देशासाठी जे लढले, त्यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करत नव्या पिढीत राष्ट्रप्रेम जागवण्याचा संकल्प करण्यात आला.

सद्भावना सायकल यात्रेची तयारी २५ जुलैपासून सुरू झाली. २ ऑगस्टपासून तयारीला वेग आला. अहमदनगर येथील बालिकाश्रम रस्त्यावरील स्नेहालयच्या प्रतिसाद केंद्रात यात्रेचं कार्यालय सुरू झालं. यात्रेची संकल्पना स्पष्ट करणारा भारत आणि बांग्लादेशाचा ध्वज असलेला लोगो, माहितीपत्रक आणि लेटरहेड तयार करून विविध व्यक्तींशी संपर्क आणि बैठकांचा सिलसिला सुरू झाला.श्री.जयप्रकाश संचेती यांनी १९७१च्या युद्धात शौर्य गाजवणारे जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांचा तपशील उपलब्ध करवून दिला. प्रवासाचा मार्ग, त्या भागातील स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्ते, नाष्टा, जेवण आणि मुक्कामाची व्यवस्था, स्वच्छतागृहांची उपलब्धता यांची माहिती घेण्यास सुरूवात झाली. तेजस्विनी आढाव हिनं यात्रेच्या मार्गाचा नकाशा तयार केला. युवा निर्माण प्रकल्पाचा समन्वयक विशाल आहिरे, तुषार काकडे यांच्या नेतृत्वाखालील टीम महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये अजय वाबळे, संतोष धर्माधिकारी, योगेश गवळी यांच्या नेतृत्वाखालील दुसरी टीम ओरिसा, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये रवाना झाली. जेवण व मुक्कामाची व्यवस्था शक्यतो स्वयंसेवी संस्था, मंदिर, मशीद किंवा गुरूद्वारात करता येईल का, हे पाहण्यात आलं. दुसरीकडे गिरीश भरत कुलकर्णी, तेजस्विनी आढाव हे सायकल यात्रींचे पासपोर्ट, व्हीजा तयार करण्याच्या प्रक्रियेमागे लागले. अवतार मेहेरबाबांचे भक्त श्री.नितीन थाडे यांना सायकल यात्रेची माहिती मिळताच त्यांनी उत्साहानं नियोजनात सहभागी होऊन मोलाचं मार्गदर्शन केलं. यात्रेच्या मार्गावरील मेहेरप्रेमींशी, तसंच सरकारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधत त्यांनी जास्तीत जास्त चांगली व्यवस्था कशी उपलब्ध करून देता येईल, यादृष्टीनं मदत केली. ज्या ठिकाणी यापूर्वी ओळख नव्हती, तिथे श्री.थाडे यांच्यामुळे नवे स्नेही जोडता आले.

प्रत्यक्ष सायकल यात्रा सुरू करण्यापूर्वी बांग्लादेशाचा इतिहास, भूगोल, व्यापार, राजकारण, समाजकारण, तसेच मुक्तीलढ्याविषयी सर्वांगीण माहिती व्हावी, यासाठी त्या त्या विषयातील जाणकार, तसेच ज्येष्ठ पत्रकारांची ऑनलाईन व्याख्यानं दररोज संध्याकाळी आयोजित करण्यात आली. सुरूवातीला डॉ.गिरीश कुलकर्णी यांनी यात्रेचं स्वरूप, उद्देश याविषयी सांगितलं. या सत्रांचं सूत्रसंचालन विशाल आहिरे यानं केलं. निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले, बांग्लादेशातील विदुषी खुशी कबीर, आनंदवनचे डॉ.विकास आमटे, माउली सेवा संकल्पचे श्री.नंदू पालवे, प्रश्नचिन्ह संस्थेचे श्री.मतीन भोसले, मुंबईतील ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, जतीन देसाई, नौखालीतील गांधी आश्रम ट्रस्टचे संचालक श्री.राह नबकुमार, ढाका येथील श्री.रवी देशमुख, श्री.दगडू लोमटे, डॉ.मेघना मराठे, ॲड.मेहेरनाथ कलचुरी, श्री.अनिल हेब्बर, श्री.श्रीकांत परांजपे, श्री.विनोद शिरसाठ, श्री.शशिकांत पित्रे, श्री.नितीन शास्त्री आदींची व्याख्यानं फारच उद्‌बोधक ठरली.

बांग्लादेशाचा व्हीजा मिळवणं, हे मोठं आव्हान होतं.कोरोना आणि सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा असल्यानं व्हीजा मिळण्यात अडचणी येत होत्या. त्यासाठी दोन्ही देशांची मंत्रालये आणि दूतावासांशी डॉ. गिरीश कुलकर्णी यांचा पत्रव्यवहार सुरू होता. मुंबईतील बांग्लादेशचे उप उच्चायुक्त मोहमंद लुतफोर रहेमान यांची दोनदा भेट घेण्यात आली. दरम्यान बांग्लादेशातील नौखाली येथील गांधी आश्रम ट्रस्टचे संचालक श्री.राह नबकुमार आणि ढाका येथील श्री.रवी देशमुख यांच्याकडून निमंत्रणपत्र मिळाल्यानं प्रारंभी सातजणांना व्हीजा मिळाला. बांग्लादेशात जाऊन तेथील उच्च पदस्थांची भेट घेण्याबरोबर तेथील रस्ते, मुक्कामाची ठिकाणं आदी माहिती घेण्यासाठी डॉ.गिरीश कुलकर्णी आणि भूषण देशमुख यांनी ढाकावारी केली. बांग्लादेश सरकारमधील मुक्तीसंग्राम विभागाचे मंत्री मुज्जमल हक, परराष्ट्रमंत्री ए के अब्दुल मोमेन, तसेच खासदार आरोमा दत्त, खुशी कबीर, रोटरीचे माजी गव्हर्नर सॅम शौकत हुसेन, श्री.राह नबकुमार यांची भेट मोलाची ठरली. या सर्वांनीच सायकल यात्रेच्या संकल्पनेचं स्वागत केलं. तथापि, भारत सरकारचं अनुमती पत्र आवश्यक असल्यानं पुढचे सगळे सोपस्कार अडले होते.

या सायकल यात्रेचा प्रारंभ अहमदनगरच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यापासून करावा, अशी सगळयांची इच्छा होती. तथापि, हा किल्ला लष्कराच्या ताब्यात असल्यानं आणि कोविडमुळं अनेक बंधनं होती.

परवानगी मिळणं सोपं नव्हतं. अखेर किल्ल्याच्या खंदकाशेजारी जिथं १०५ फूट उंचीचा ध्वजस्तंभ नव्यानं उभारण्यात आला आहे, त्या परिसरात कार्यक्रम घेण्यास मोठ्या पाठपुराव्यानंतर परवानगी मिळाली. अतिशय कमी वेळात तेथील समारंभाची व्यवस्था करण्याची जबाबदारी चाईल्डलाईन टीमने उचलली. सायकल यात्रा सुरू होण्याच्या आदल्या दिवशी केडगाव येथील स्नेहांकूर प्रकल्पात सहभागी होणाऱ्यांची नोंदणी, सायकली, हेल्मेट, टीशर्ट आणि कॅप्सचं वाटप करत आवश्यक सूचना देण्यात आल्या. भाईजी डॉ.एस.एन.सुब्बाराव, श्री. अनिल हेब्बर, राष्ट्रीय छात्र सेनेचे कर्नल पंकज सहानी यांनी सत्रात केलेलं मार्गदर्शन बहुमोल ठरलं. स्नेहालयचे अध्यक्ष संजय गुगळे, सचिव राजीव गुजर आणि अन्य सर्वांच्या शुभेच्छा आमच्याबरोबर होत्याच.

२ ऑक्टोबर महात्मा गांधीजींची जयंती. आदल्या रात्री धो धो पाऊस कोसळत होता. पहाटे पावसानं विश्रांती घेतली आणि आम्ही सुटकेचा निश्वास सोडला. पाऊस कोसळत राहिला असता, तर उघड्यावर कार्यक्रम घेणं शक्यच नव्हतं. सुदैवानं छान ऊन पडलं आणि कार्यक्रम निर्विघ्न पार पडला. विशाल आकारातला भारताचा तिरंगा मोठ्या डौलानं फडकत होता. दोन्ही बाजूला भारत आणि बांग्लादेशाचे राष्ट्रध्वज लावलेले. एका बाजूला सुलताना चांदबिबीच्या पराक्रमाची गाथा सांगणारी किल्ल्याची दगडी तटबंदी आणि पाण्याने भरलेला खंदक, तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रप्रेमानं भारलेली तरूणाई. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, गांधी विचारांचे पाईक डॉ.एस.एन.सुब्बाराव ऊर्फ भाईजी, हिवरे बाजारचे पद्मश्री पोपटराव पवार, कोटक बँकेचे अध्यक्ष प्रकाश आपटे, रोटरी क्लबचे प्रांतपाल ओम मोतीपवळे, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे अॅड. मेहेरनाथ कलचुरी, श्री.नितीन थाडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शहिदांच्या कुटुंबीयांचा आणि निवृत्त सैनिकांचा सन्मान करण्यात आला. कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी यांच्या वीरपत्नी रेवाताईंनी व्यक्त केलेलं प्रातिनिधीक मनोगत सर्वांच्या काळजाला भिडणारं होतं. शेजारी असलेला १९७१च्या बांग्ला युद्धातील विजयाची आठवण जपणारं 'स्पिरीट ऑफ आर्मर' पार्क, तिथे आयोजित केलेलं परमवीर चक्र विजेत्यांच्या प्रतिमांचं चित्रकार वृषाल एकबोटे यांनी आयोजित केलेलं संगीताच्या सुरेल साथीसह प्रदर्शन, दीपक काळे यांच्या नेतृत्वाखाली स्नेहालय व अनामप्रेमच्या मुला-मुलींनी सादर केलेली देशभक्तिपर गाणी आणि भारत व बांग्लादेशाची राष्ट्रगीतं यामुळे वातावरण उत्साही, उत्सवी बनलं होतं. अण्णा हजारे यांनी हिरवा झेंडा दाखवताच शंभराहून अधिक तरूण-तरूणीं सायकलीवरून श्रीदत्तक्षेत्र देवगडच्या दिशेनं रवाना झाल्या. त्यात दहा-अकरा वर्षांचा ऋग्वेद कुलकर्णी आणि सिद्धार्थ आवारे आघाडीवर होते.

दररोज चाळीस-पन्नास किलोमीटरचा प्रवास, दुपारी जेवणासाठी एखाद्या ठिकाणी थांबायचं, सूर्यास्तापर्यंत मुक्कामाच्या गावाला पोहोचून तिथे गावकऱ्यांशी संवाद साधत प्रार्थना, पथनाट्य किंवा सांस्कृतिक कार्यक्रम. नंतर भोजन आणि विश्रांती असा साधारण कार्यक्रम ठरला होता. मार्गात असलेल्या पथदर्शी संस्था आणि तिथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भेट महत्त्वाची. एरवी जी नावं केवळ ऐकली, वाचली होती, त्या संस्था प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. डॉ.पालवे दाम्पत्याची बुलढाणा येथील माऊली सेवा संकल्प संस्था, श्री. मतीन भोसले यांचा मंगरूळ येथील प्रश्नचिन्ह प्रकल्प, सेवाश्रम, वर्धा येथील सेवाग्राम, महामानव बाबा आमटे यांचं आनंदवन, हावडा येथील श्री.मामून अख्तर यांचा समरितन सेवा प्रकल्प, आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी बोनोग्राम, २४ परगणा येथे श्री. विनायक लोहाणी यांनी उभी केलेली परिवार संस्था, नौखालीत १९४६ मध्ये सुरू झालेला गांधी आश्रम अशा संस्था म्हणजे समाजाला विधायक दिशा दाखवणारे दीपस्तंभच आहेत. त्यांचं काम पाहून आपणही असं काहीतरी चांगलं काम हाती घ्यायला हवं, असं प्रत्येकाच्या मनात आलं. समाजकारणाचं आणि सदभावनेचं महत्त्व जाणणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट मोलाची ठरली.

सायकल यात्रेदरम्यान शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांसारख्या ज्ञानमंदिरांबरोबर सगळया धर्मांच्या प्रार्थनास्थळांना आम्ही भेट दिली. मंदिरं, मशिदी, चर्च, गुरूद्वारा, बौद्ध मॉनेस्ट्री, तसंच विविध समाजांनी बांधलेल्या वास्तूंमध्ये वास्तव्य करताना माणुसकी हाच सगळयांत मोठा धर्म असल्याची जाणीव झाली. ठिकठिकाणचे मेहेरप्रेमी, मारवाडी, गुजराथी, अग्रसेन, पद्मशाली, संथाल, तसेच मुस्लिम, शीख, जैन, ख्रिश्चन समाजबांधवांनी सायकल यात्रींच्या नाष्टा, जेवण आणि निवासाची व्यवस्था केली. एवढ्या मोठ्या प्रवासात केवळ दोनदा आम्हाला नगरहून बरोबर नेलेला शिधा स्वतः शिजवून भोजन करण्याची वेळ आली. प्रवासात काही अ़डचणी आल्या, तेव्हा निर्व्याज मनानं अनेकांनी मदतीचा हात पुढे केला. एकदा अंतर जास्त असल्यानं सायकली ट्रकमध्ये टाकून नेण्याची वेळ आली, तेव्हा त्या भल्या चालकांनं पैशांसाठी अडवणूक केली नाही. मिदनापूर येथील एका दुकानदाराने सौजन्य दाखवत सगळया सायकलींची दुरूस्ती, देखभाल मानवतेच्या भावनेतून करून दिली. गोपाळगंज येथील छोट्या दुकानदारानंही सायकल दुरूस्त करून दिल्यावर पैसे घेतले नाहीत.

या प्रवासात अनेक सुखद अनुभव आले, माणसांतल्या देवत्वाचं दर्शन घडलं. अनेक गावांमधील नागरिक स्वागतासाठी ढोल-ताशे आणि रथ घेऊन आले होते. काही ठिकाणी मिरवणुका निघाल्या. व्हीआयपींसारख्या पुढे-मागे पोलिसांच्या गाड्या. आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांचं स्वागत करताना काही कमी पडता कामा नये, असे या मंडळींना वाटत होतं. झारखंडमध्ये पारंपरिक पोषाख करत संथाल बंधु-भगिनींनी आम्हाला ओवाळलं. त्यांच्या आदिवासी नृत्यात आम्हाला सहभागी करून घेतलं.

बांग्लादेशमधल्या श्री.पापा राय चौधरी नावाच्या भल्या माणसानं कोणतीही ओळख नसताना आम्हा सगळयांच्या राहण्याची, जेवणाची सोय त्यांच्या शाही गेस्टहाऊसमध्ये केली. श्री.राजीवकुमार सिंग यांच्या कोलकात्यातील श्री.मनीष भरतिया या शाळासोबत्यानं क्रूझवर गाण्यांची मैफल आणि मेजवानी आयोजित करत हुगळी नदीत जलपर्यटन घडवलं. पश्चिम बंगाल सरकारमध्ये प्रिन्सिपल सेक्रेटरी असलेले श्री.संजयजी थाडे यांच्या चोख नियोजनाचा प्रत्यय आम्हाला वेळोवेळी आला. आमची निवास व्यवस्था जगातील सगळयात मोठ्या असलेल्या 'सॉल्ट लेक फुटबॉल' स्टेडियमच्या इमारतीतील यूथ होस्टेलमध्ये त्यांनी केली होती. उद्यान आणि शिल्पांनी सजवलेल्या आवारात विविध खेळांची अद्ययावत मैदानं होती. मेहेरप्रेमी, रोटरी, तसेच इस्कॉनतर्फे भोजन देण्यात आलं.

काही ठिकाणच्या भेटींचं नियोजन आम्ही आधी केलं नव्हतं. मदर तेरेसा यांनी स्थापन केलेल्या 'मिशनरीज ऑफ चॅरिटी' आश्रमात त्यांच्या उत्तराधिकारी सिस्टर निर्मला यांची भेट म्हणजे सर्वांसाठी सुखद धक्का होता.

भारत आणि बांग्लादेशच्या सरहद्दीवर पेट्रापोल येथे 'मेन्स लँड'वर झालेलं सायकल यात्रेचं स्वागत, तिथं म्हटलेल्या प्रार्थना, संत तुकडोजीं महाराजांचं भजन, मुलांनी सादर केलेलं पथनाट्य हे सगळं स्वप्नवत होतं. बॉर्डरवर तैनात दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांसोबत रंगलेला हा पहिलाच सोहळा असेल.दोन देशांमधील मालाची ने-आण करणारं तिथलं लँड पोर्ट दाखवण्यात आलं. शंभरपैकी केवळ अकराजणांनाच व्हीजा मिळाल्यानं इतरांना निरोप देण्यात आला. त्यांच्यासाठी हा यात्रेचा समारोप ठरला.

डॉ.गिरीश कुलकर्णी, अॅड.श्याम आसावा, भूषण देशमुख, डॉ.मनीषा लढ्ढा, प्रा.डॉ.अंकुश आवारे, अजय वाबळे, फारूख बेग, विशाल अहिरे, संतोष धर्माधिकारी, गिरीश भरत कुलकर्णी, योगेश गवळी अशा अकराजणांची टिम सायकलींसह बांग्लादेशात दाखल झाली. स्वागतासाठी रवी देशमुख, शाहिमा अख्तर आणि तिथे आमचं सारथ्य करणारा ज्वेल ही मंडळी बेनापोल इथं आमची वाट पहात होते.रवी देशमुख तर सायकल चालवत आमच्याही पुढे गेले. रस्ते नवे आहेत, माणसं आणि गावं अपरिचित होती, असं प्रारंभी काही क्षण वाटलं, पण ठिकठिकाणी भेटणाऱ्या मंडळींनी हात हलवून, चहासाठी थांबवून विचारपूस करत परकेपणा घालवला. वातावरण असुरक्षित असल्यानं सायकलीवरून प्रवास करू नका, महिलांना तर अजिबात बरोबर नेऊ नका, असा सल्ला आधी अनेकांनी दिला होता, पण बांग्लादेशातील दहा-अकरा दिवसांच्या वास्तव्यात कुठंही अप्रिय घटना घडली नाही. एका ठिकाणी पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा एकू आल्या, पण त्यांना चोख प्रत्युत्तर देत अॅड.आसावा यांनी गप्प केलं.

रस्त्याच्या दुतर्फा गर्द हिरवी झाडं, पाण्यानं तुडूंब भरलेले तलाव, त्यात फुललेली कमळाची फुलं, मासे पकडण्यासाठी सुरू असलेली लगबग, केळी आणि नारळाच्या बागा, भातशेती....... जणू काही कोकणात आहोत, असा भास बांग्लादेशात फिरताना येत होता. घरं पत्र्याची असली, तरी नक्षी काढून सजवलेली.

९०% रस्ते आपल्यापेक्षा सुबक, खड्डे नसलेले. फार कुठे चढ-उतार नसल्यानं सायकल चालवण्याचा आनंद पुरेपूर घेता येत होता. अनेक वर्षांनंतर सायकल चालवताना कुणाचे पाय दुखले नाहीत, की पाठ धरली नाही. एकदा-दोनदा तर एका दिवसात शंभर किलोमीटरपेक्षा जास्त अंतर पार करण्यात आलं.
बांग्लादेशातील बहुतांशी माणसांचं राहणीमान साधं आहे. भात हे त्यांचं प्रमुख अन्न. चवीला डाळ, एखादा माशाचा किंवा मटनाचा तुकडा त्यांना पुरेसा असतो. कुठेही दारूचं दुकान दिसलं नाही की अवैध मार्गानं दारू मिळवून झिंगून पडलेला दारुड्या आढळला नाही. दारू पिणाऱ्याला कडक शिक्षा केली जाते, असं समजलं.
शिक्षणाचं महत्त्व बांग्लादेशनं आपल्यापेक्षा जास्त ओळखलेलं दिसलं. शाळेच्या इमारती उत्तम आहेत. कोरोनाचा बागलबुवा करून शाळा बंद केलेल्या आढळल्या नाहीत. मुलंही स्मार्ट वाटली. भारतीय चित्रपट पाहून अनेकजण आता हिंदीतही संवाद साधू शकतात. बहुतेक जिल्ह्यांच्या ठिकाणी सरकारी विद्यापीठ सुरू झाली आहेत. जमीन, निधीची कमतरता नाही. खासगी विद्यापीठांची संख्याही मोठी आहे. आपल्याकडे कुलगुरूंची भेट मिळणं दुरापास्त असतं. आम्ही आधी अपॉईंटमेंट न घेता कुमिल्ला विद्यापीठातील कुलगुरूंना भेटू शकलो. त्यांनी आदरातिथ्य करत छान गप्पा मारल्या. अनेक वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी सहजगत्या भेटले. आपल्याकडे असं सौजन्य अभावानंच आढळतं.

ढाका ही बांग्लादेशाची राजधानी. तिथल्या गुरूद्वारा नानकशाहीमध्ये आमचा मुक्काम होता. शेजारीच ढाका युनिर्व्हसिटी. बांग्लादेशातल्या सगळ्या आंदोलनांची सुरूवात तिथून झालेली. अनेकांनी त्यासाठी आपले प्राण दिले. या परिसरात अनेक शहिद स्मारकं आहेत. बांग्लादेशाचे राष्ट्रीय कवी काझी नझरूल इस्लाम यांचा मकबरा, पाकिस्तानी सैन्यानं बुद्धिवाद्यांची अमानुष हत्या केलेलं ठिकाण पाहताना या देशातील लोकांनी भाषेच्या, प्रदेशाच्या अस्मितेसाठी किती सहन केलं, याची कल्पना आली. बांग्लादेशात अतिशय उत्तम म्युझियम आहेत. नॅशनल म्युझियम, लिबरेशन वॉर म्युझियम, लालबाग किल्ल्यातील संग्रहालय आणि ढाक्यापासून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या सोनारगाव(सुवर्णग्राम)येथील आदिवासी कला संग्रहालयात भारताच्या प्राचीन संस्कृतीचंही दर्शन घडतं.पाचशे वर्षांपूर्वीच्या 'पनामनगरी'तील काही वास्तू सोनारगावात रस्त्यासह जशाच्या तशा जतन करण्यात आल्या आहेत. १९४७ पूर्वी बांग्लादेश हा भारताचाच एक भाग होता. त्यामुळं दोन्ही देशांची पाळंमुळं एकच आहेत, हे कुमिल्लामधील बौद्ध मॉनेस्ट्रीच्या उत्खनन केलेल्या परिसरात फिरताना जाणवत होतं. दुसऱ्या महायुद्धात बर्मा बॉर्डरवर लढताना जायबंदी होऊन मरण पावलेल्या विविध देशांमधील सैनिकांच्या कबरी असलेली 'मायनामती वॉर सिमेट्री'लाही आम्ही भेट दिली. कृतज्ञता व्यक्त करत इतिहास कसा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवावा, याचा वस्तुपाठ आम्हाला बांग्लादेशात मिळाला.

बांग्लादेशचे राष्ट्रपिता शेख मुजीबुर रहमान(बंगबंधु)यांची १५ ऑगस्ट १९७५ रोजी घरात असलेल्या सर्व मंडळींसह निर्घृण हत्या करण्यात आली. हे निवासस्थान आता त्यांचं स्मारक बनलं आहे. रक्ताने माखलेले कपडे, बंदुकीच्या गोळयांच्या खुणा अजून तिथं पहायला मिळतात. त्यांचा मकबरा तुंगीपारा इथं आहे. तिथं त्यांचं घर, आजोळची वास्तू आणि त्यांची कन्या विद्यमान पंतप्रधान शेख हसीन यांचा नवा बंगला पाहिला. तिथल्या संग्रहालयात बंगबंधुची शवपेटी पहायला मिळाली.

१९४६ मध्ये उसळलेल्या दंगली शमवण्यासाठी ७८ वर्षांचे महात्मा गांधी नौखालीला धावले होते.अहिंसेचा मंत्र जपत त्यांनी भडकलेली माथी शांत केली.सुमारे चार महिने गांधीजी या भागात फिरत होते.त्यांच्या पाऊलखुणा शोधण्यासाठी आम्ही सायकल यात्री नौखालीतील गांधी आश्रमात पोहोचलो. संचालक राह नबकुमार आणि अन्य मंडळी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आमचं स्वागत केलं. इस्लामी देशात गांधीजींना मानणारी माणसं आहेत, हे पाहून खूप बरं वाटलं. या आश्रमात गांधीजींच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग दाखवणारं संग्रहालय आहे, उत्तम ग्रंथालय, शाळा आणि वसतिगृह आहे. गांधीजींना

आवडणारा चरखा, खादी तयार करणारे हातमागही तिथं पहायला मिळाले. 'खोखेनदा' नावाचा बांग्ला मित्र आम्हाला तिथं मिळाला.

गांधीजी रामगंजमधील ज्या शाळेच्या मैदानावर दररोज प्रार्थना सभा घेत, तिथं बसून आम्ही भजनं म्हटली. ज्या घरात गांधीजी राहिले, ते आम्ही पाहिलं. गांधीजी लहान मुलांना गोळया वाटत असत. तेव्हा लहान असलेले आणि आता नव्वदी ओलांडलेल्या अबुल कलाम भुईया यांच्याशी संवाद साधण्याची संधी आम्हाला मिळाली.

बांग्लादेशात ९२ टक्के मुस्लिम आहेत. हिंदू आणि अन्य धर्मियांची संख्या केवळ ८ टक्के आहे. काही राजकीय मंडळींचा विद्वेष सोडला, तर इतरांमध्ये जातीय किंवा धार्मिक तेढ जाणवली नाही. दुर्गा उत्सवात झालेल्या दंगली काही राजकीय गटांनीच घडवल्याचं स्पष्ट झालं आहे. बांग्लादेशात अतिशय जुनी आणि उत्तम अवस्थेत असलेली मंदिरं आम्ही पाहिली. ढाका शहरात बाराव्या शतकात बांधलेलं श्रीढाकेश्वरी मंदिर आता बांग्लादेशचं राष्ट्रीय मंदिर बनलं आहे. नक्षीकाम केलेल्या टेराकोटा विटांचा अतिशय कलात्मक वापर करून साकारलेली मंदिरं हा बांग्लादेशचा मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. नवे मित्र जोडत, सद्भावना निर्माण करत या सायकल यात्रेचा समारोप २५ नोव्हेंबर २०२१ रोजी नौखाली(बांग्लादेश)येथील गांधी आश्रमात गाणी म्हणत कँप फायरनं झाला. सायकल यात्रेत सहभागी झालेले अल्बर्ट यांचं हृदयविकारानं निधन आणि टिम लिडर विशाल आहिरे याचा झालेला अपघाती मृत्यू अतीव दु:ख देऊन गेला.

बांग्लादेश हा आपला सख्खा शेजारी आहे. भारताच्या पाच राज्यांची सीमा बांग्लादेशला लागून असल्यानं भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक, आर्थिक, कृषी, सुरक्षा, जैवविविधता आणि पर्यावरणाच्या दृष्टीनं दोन देशांमधील संबंध अधिकाधिक चांगले होणं ही फार मोठी गरज आहे. सदभावनेच्या भावनेतून लोकांची मन जोडता आली, तर दोन्ही देशांच्या भविष्यातील वाटचालीचा मार्ग अधिक सुकर होऊ शकेल.

आम्ही ज्यावरून गेलो, ते केवळ रस्ते नव्हते...
आम्ही जिथं गेलो, ती केवळ गावं नव्हती...
आम्ही ज्यांना भेटलो, ती केवळ माणसं नव्हती
समाजमन सांधणारे,
नवनिर्माणाची दिशा दाखवणारे
अखंड तेवत राहणारे
दीपस्तंभ होते ते....

भूषण देशमुख,
अहमदनगर
bhushandeshmukh0007@gmail.com
9881337775

महोत्सव

व्हाट्सअ‍ॅप चाळत होते परवा सहजच. खरं तर, सोशल मिडियाच्या अतिरेकामुळे मनाच्या रेनकोट वरून किती तरी फॉरवर्डस, कोट्सचे थेंब ओघळून जातात सरळ तसेच. पण 'ते' वाक्य या रेनकोटची तटबंदी भेदून झिरपलं पार आत. परत परत त्याचे प्रतिध्वनी उमटत राहिले मनाच्या गाभाऱ्यात. 'जगतात तर सगळेच, जीवनाचा महोत्सव करता आला पाहिजे' हेच ते वाक्य! 'जीवनाचा महोत्सव', मनाच्या पेननं अधोरेखित केले ते शब्द. नुकताच गौरी गणपती उत्सव पार पडला. दैनंदिन व्यवहार पूर्वपदावर येत आहेत. संपूर्ण वर्षभरातून केवळ दीड दिवसासाठी येणाऱा गणपती आणि तीन दिवसासाठी येणाऱ्या गौरी. पण सगळे कसे आनंदाने, उत्साहाने उजळून निघाले होते. गौरी गणपतीच्या आगमनापूर्वीची लगबग, तयारी, खरेदी, आरास, प्रत्यक्ष स्थापना झाल्यानंतर पूजा, नैवेद्य, नातेवाईकांच्या गाठीभेटी, दूर असणाऱ्या आप्तेष्टांना फोटो शेअर करून त्यांचे फोटो बघणं, कसा नुसता आनंदीआनंद होता सगळा. दोन-तीन दिवसांचा महोत्सव आपल्याला इतका आनंद, ऊर्जा देऊन जातो. मग आपलं सगळं जगणंच एक मोठा उत्सव- महोत्सव झालं तर?

हर दिन, हर क्षण आनंद, उत्साह, चैतन्य आणि ऊर्जा. अर्थातच, या सगळया गोष्टी संसर्गजन्य असतात. एकदा या सगळयांची लागण तुम्हाला झाली की तुमच्या भोवताली संसर्ग पसरलाच समजा. काय म्हणताय? सांगणे सोपे आहे हो खूप. इथे आमचं जगणं म्हणजे रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग. अशात कसला उत्सव अन् काय. हो, अगदी खरं आहे तुमचं म्हणणं. कठीण आहे प्रत्येक क्षण आनंदाने जगुन जीवनाचा महोत्सव करणं. पण अशक्य नाही ना! तसंही, आयुष्यात विनासायास कुठली गोष्ट साध्य झाली आहे? जन्माला आल्यानंतर चालणं, बोलणं, लिहिणं प्रयत्नांनीच साध्य झालं ना? कुठल्याही चांगल्या सवयी ह्या मुद्दाम लावून घ्याव्या लागतात. एकदा त्या अंगी बाणल्या की जसा फुलापासून सुगंध वेगळा करता येत नाही तश्या त्या सवयी पण चिकटून राहतील आपल्याला. आता पटतंय ना जरा!

चला तर मग, बघुया जीवन एक महोत्सव या शिखरावर पोहोचण्यासाठी, रोज कसं चालायचं? या प्रवासात दोन गोष्टी लक्षात ठेवायच्या. पहिली म्हणजे रोजच्या तेच तेच या रहाटगाडग्यात वेगळेपण, अगदी छोट्या छोट्या गोष्टींतही कसं आणता येईल, याचा प्रयत्न करायचा. तेच ते पण कंटाळा आणतं, आयुष्य नीरस बनवतं. वेगळेपणा बदल, आनंद देतो. सकाळी उठल्यापासून आपल्या सगळयांचा नित्यक्रम साधारण सारखाच असतो. रोजच गृहिणी चहा स्वयंपाक सगळं करते. कधीतरी या कामांची अदलाबदल करून बघा. घरातील रचना बदला. कपड्यांची पद्धत, केसांची पद्धत बदला. जेवणाच्या पद्धती, पदार्थ

बनवण्याच्या पद्धतींमध्ये बदल करून बघा. नक्कीच खूप आनंद मिळेल. दुसरी गोष्ट म्हणजे या प्रवासात एक रिकामी झोळी आणि डस्टबिन सोबत असू द्या. झोळी मध्ये आपल्याला भरायचे आहेत क्षण. रोजच्या जीवनात जिथे जिथे काही चांगलं आनंददायी दिसेल, वाटेल ते पटकन उचलून झोळीत टाकायचं. यात तुम्हाला कुणी दिलेली छानशी कॉम्प्लिमेंट असु दे की तुम्ही केलेलं एखादं छोटसं सत्कृत्य असू दे, एखादी छानशी कलाकृती असु दे की भावलेली एखादी कविता किंवा सुरेल गाणं असु दे. कुणाचाही सद्गुण, एखादी चांगली सवय दिसताच ती पटकन आपल्या झोळीत शिरायलाच हवी. आणि हो, हे सगळं दिसायला डोळ्यांचा टिपकागद व्हायला हवा. आपल्या आजूबाजूलाच त्यांचे सद्गुण सहज टिपता येतील अशी अनेक माणसं वावरत असतात. काही उदाहरण सांगते. माझी शेजारीण रोज दुपारी गरम चहा सोसायटीचा वॉचमन काकांना नेऊन देते. भाऊ दर उन्हाळ्यात पाणपोई टाकतो. एक मैत्रीण, खूप व्यस्त असते पण प्रत्येकाच्या वाढदिवसाला नुसत्या शुभेच्छांचा संदेश न देता फोन करून मनमोकळ्या गप्पा मारते. कोरड्या संदेशांच्या गर्दीमध्ये तिच्या गप्पा मनाला खूप गारवा देतात. या आणि अशा माणसांना मोबदल्यात भरपूर आनंद मिळत असतो. अशाच आनंद क्षणांचे कण वेचून आपली झोळी भरायची. आपणही तसंच अनुकरण करायचं.

आता डस्टबिन कशासाठी? तर रोजच्या जीवनात येणारे कटू क्षण, अनुभव, राग, द्वेष, मत्सर या प्रवासाला बाधा येईल असं सगळं त्यात भरायचं. नियमितपणे हा डस्टबिन रिकामा करायची. झोळी जितकी भरलेली आणि डस्टबिन जितका रिकामी तितका हा प्रवास सहज, सुकर होऊन 'जगणं एक महोत्सव' च्या शिखरावर तुम्ही अलगद पोहोचाल. तिथे गेल्यावर तुमचा एक हात कायम पुढे असु दे, मागून येणाऱ्यांना हात देण्यासाठी. जगात 'देणं' याहून दुसरी सुंदर गोष्ट असूच शकत नाही. सगळ्यांना भरभरून प्रेम, प्रोत्साहन, प्रेरणा, उमेद, आनंद द्या. बदल्यात समाधानानं तुमची ओंजळ भरून जाईल. ही समाधानाची श्रीमंती अगदी उघडपणे मिरवा. कारण तिला कसलेच भय नाही.

वैशाली प्रसन्न सुळे
वडोदरा, गुजरात
vaishali29sule@gmail.com
+91-9662666228

चेहरा हरवलेल्या माणसातील आग शोधणारा चित्रकार

वऱ्हाडच्या भूमीने आपल्या सृजनशील कुशीमधून वेगवेगळ्या प्रतिभांची निसर्गदत्त आरास जगभर उधळून दिलेली आहे. साधारणपणे 1953 किंवा 1954 मध्ये एके दिवशी राष्ट्रसंत गाडगेबाबा ह्यांच्या स्वच्छता अभियाना अंतर्गत एके दिवशी त्यांची गाडी अकोला जिल्ह्यातील चिखलगाव या गावी येऊन थांबली. गाडगेबाबा गावामध्ये आले म्हणजे ग्रामस्वच्छतेचे काम आपोआप सुरू होत असे. सर्व गावकरी हातामध्ये खराटे झाडू घेऊन साफसफाई करत होते. अश्यावेळी विश्वाचे राजे असल्याप्रमाणे दोन उघडी-नागडी मुले फुफाट्यात पांढरेशुभ्र होऊन बसलेले होते. ते दोघेही अगदी स्वतःच्या विश्वात रममाण होते. अशात तेथे तो स्वच्छता क्रांतीचा दूत प्रत्यक्ष अवतरला आणि त्या साधारणपणे 4 ते 5 वर्षाच्या गरीब मुलांच्या डोक्यावर हात ठेवून "काय बे पोट्टे हो काय करून राहिले राजावाणी?" असे म्हणून निघूनही गेला. सर्व गावकरी आणि बायाबापड्या लेकराला गाडगेबाबांनी आशीर्वाद दिला म्हणून कौतुक करू लागल्या. त्या गावकुसाबाहेरील वस्तीतल्या गरीब नागड्या लेकरातील एक लेकरू पुढे रंग रेषांचा राजा होऊन जागतिक दर्जाचा चित्रकार म्हणून प्रसिद्ध होईल असे कुणालाही त्यावेळी वाटणे शक्य नव्हते, पण तसे घडले.

दिनांक 23 व 24 फेब्रुवारी 2019ला झालेल्या पहिल्या दलित चित्रपट व सांस्कृतिक महोत्सवात येथील वऱ्हाडी मातीत जन्मलेले एक संवेदनशील चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या निवडक तीस चित्रांचा समावेश प्रदर्शनासाठी करण्यात आला होता. न्यूयॉर्क येथील बर्नार्ड कॉलेज कोलंबिया विद्यापीठ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल मिशन, आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका, बोस्टन स्टडी ग्रुप, आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर व आंबेडकर बुद्धिस्ट असोसिएशन यांच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. निर्माता, दिग्दशर्क पी. रंजित, नागराज मंजुळे, अभिनेत्री निहारिका सिंग, डॉ. डेव्हिड ब्लाँडेल, बोमकु मुरली, जयंत चेरीयन, सुबोध नागदिवे, रामपिला राव यांच्यासह चित्रपट व इतर माध्यमातील जाणकारांच्या उपस्थितमध्ये हा महोत्सव लक्षवेधी ठरला. त्यात श्रीधर अंभोरे ह्यांची चित्रे गौरविली गेली. चित्रकार श्रीधर अंभोरे हे सामाजिक आशयाच्या चित्रांची निर्मिती आजही करत आहेत. महाराष्ट्रातील अनेक दलित, आदिवासी साहित्य संमेलने, मुस्लिम मराठी साहित्य संमेलने, अस्मितादर्श साहित्य संमेलन, विद्रोही साहित्य संमेलने, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या प्रतिकात्मक विचारपीठांची त्यांनी कल्पक सजावट केली आहे.

2004 मध्ये अहमदनगर येथे भरलेल्या अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या तीन फोल्डर असलेल्या पत्रिकेत कसलीही पारंपरिक प्रतीके न वापरता श्रीधर अंभोरे ह्यांनी रंगमंचासाठी जीवनभर कष्ट करणाऱ्या आणि ज्यांची दखल कुणी घेत नाही अश्या नाट्य कामगारांच (स्पॉटबॉयच) रेखाटन केलं. त्यावर नाट्यपरिषदेचे अध्यक्ष अभिनेते मच्छिंद्र कांबळी ह्यांनी सदाशिव अमरापूरकर ह्यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. त्यावर सदाशिव अमरापूरकर ह्यांनी फोन लावून त्याबाबत श्रीधर अंभोरे ह्यांना हे असे का केले असे विचारले, त्यावेळी मच्छिंद्र कांबळी सारख्या अभिनेत्याला, "ज्या नाट्य कामगारांच्या जीवावर नाट्य कलावंत श्रीमंत होत आहे आणि ज्या कामगारांची कुणी दखल घेत नाही त्यांना मी रेखांकित केले आहे." असे सडेतोड उत्तर श्रीधर अंभोरे सारखे निस्सीम कलानिष्ठ व्यक्तीच देऊ शकतात, हे सर्वांना कळून चुकले. त्यानंतर जेंव्हा मच्छिंद्र कांबळी आणि सदाशिव अमरापूरकर अहमदनगरला पोहचले तेंव्हा त्यांनी सर्वप्रथम ते अंभोरे कोठे आहेत असे विचारून श्रीधर अंभोरे ह्यांची भेट घेतली आणि मच्छिंद्र कांबळी ह्यांनी कडाडून मिठी मारत, "मित्रा तू आमचे डोळे उघडलेस" असे भावपूर्ण उदगार काढले. नाट्यसंमेलन संपल्यावर अनपेक्षितपणे श्रीधर अंभोरे ह्यांना अगदी 25 हजाराचा मानधन चेक सुद्धा त्यावेळी देण्यात आला. ह्या रकमेपेक्षाही आपण उपेक्षित कामगारांची दखल घेतली हे समाधान त्यांना जास्त होत. ही सर्व रेषेची आणि रंगाची किमया. जर रंग आणि रेषा उपेक्षितांच्या साठी लढायला लागल्या तर उपेक्षितांना न्याय तर मिळतोच आणि इतरांची दृष्टिसुद्धा बदलून जाते.

विषयानुरूप मुखपृष्ठ निर्मिती करणे हे त्यांचे वेगळे वैशिष्ट्य आहे. झाडे, प्राणी, पशू, पक्षी, दगड असे फॉर्म वापरून स्वत:ची स्वतंत्र चित्रशैली त्यांनी निर्माण केली आहे. मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील आदिवासीच चित्रकूळ हे आपल्या चित्राशी जुळणारे नाते प्रतिबिंबित करते असे त्यांना आवर्जून वाटते. अकोल्याला अलायन्स चर्चच्या लायब्ररीत इंग्लिश जनरलच्या अंकातून चित्र चाळत असताना, तुझे चित्र

पिकासो सारखे आहेत असे कुणी म्हंटल्याच त्यांना आठवतं पण त्यावेळी पिकासो समजून घ्यावा असे त्यांचे वय नव्हते हेही खरे. भीमबेटकातील चित्रशैलीशी त्यांच्या चित्राचे नाते आहे असे त्यांची चित्र पाहिल्यावर आपल्यालाही जाणवते. आपल्या विविध चित्रातून मानवी स्वभाव, विकृती, दुर्गुण तसेच पीडित व शोषित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, शोषित माणसांचे चेहरे त्यांनी रेखाटले आहेत. शेतमालकाच्या सांगण्यावरून आपण काढलेल्या चित्रातील सुंदर तरुणीचा मालक गैरफायदा घेतो हे कळल्यावर जीवनातील कुरूपता लक्षात घेऊन काढलेले सुंदर चित्रे फाडणाऱ्या ह्या संवेदनशील चित्रकाराला अनेक संस्थांनी विविध पुरस्कार देऊन त्यांच्या चित्रकृतीचा गौरव केला आहे.

श्रीधर अंभोरे ह्यांचा जन्म दिनांक 21 मार्च 1947 रोजी झाला. चित्रांमध्ये काळया रंगाचा अधिकांश वापर आणि फक्त रेषांनी व्यक्त होणे ह्या त्यांच्या निर्मितीची बीजे त्यांच्या बालपणात सापडतात. इयत्ता 2 री किंवा 3 री मध्ये असताना अस्पृश्याची ही लेकरे शाळेत इतर मुलापासून तीन चार हात लांब बसलेली असत. शाळेच्या कुडाच्या आत एकाच वेळी एक कुत्री आणि डुकरीणीने पिल्लांना जन्म दिला. पुढे डुकरीण पिलांस सोडून निघून गेली. इतर पिलांना कुत्र्यांनी मारून खाल्ले, पण एका राहिलेल्या पिलाला लहानग्या श्रीधरने कुत्रीच्या स्तनाला लावले आणि दहा दिवस कुत्रीने त्या पिलास पाजले. एके दिवशी दुसऱ्या कुत्राने त्या पिलाला मारले. त्या दुखा:पोटी लहानग्या श्रीधरने पाटीवर डुकराच्या पिलांचे चित्र रेखाटले, त्यावेळी शाळेतील मास्तरने अंगावर वळ येईपर्यंत त्याला बदडले. मास्तरने मारणे, समाज व्यवस्थेने जातीवरून आपल्याला नाकारणे, मात्र कुत्र्याने डुकराच्या पिलास जगवणे ह्या सर्वांचे पडसाद त्या संवेदनशील मनावर पडत होतेच. अश्यातच सहावी- सातवीत असताना मारूतीच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी जीवनात पहिल्यांदा मन प्रसन्न होईल असा सोन्याच्या अलंकाराने कपाळावर झालेला चंदन स्पर्श आणि शुद्ध तुपातल्या जिलेबीचा पहिला घास घेण्याआधी त्या पत्रावळीसह त्यांना बाहेर फेकून देणाऱ्या व्यक्तीमुळे तर माणसाचा भेसूर चेहरा स्वीकारणे त्यांना कठीण झाले. म्हणून त्यांच्या चित्रांना आजही चेहरा असत नाही. चित्राला चेहरा काढत नाहीस म्हणून ज्याला चित्रकलेच्या एलिमेंटरीच्या परीक्षेला त्यांच्या शिक्षकांनी बसू दिले नाही, आज ते जगविख्यात चित्रकार आहेत ह्यापेक्षा त्यांनी तरी काय सिद्धता द्यावी? कुरूप व्यवस्थेत सुंदरता कुरूप असते असा विचार करून त्यांच्या चित्रातील चेहरा आजही हरवलेलाच आहे.

1980 मध्ये सुरु झालेल्या आदीम ह्या लक्षवेधी नियतकालिकाचे श्रीधर अंभोरे हे संपादक आणि रेखाचित्रकार होते. सिनेकलावंत सदाशिव अमरापूरकर हे त्यांचे आदिम नियतकालिकाच्या संपादन मंडळातील मित्र होते. आदिमचे जवळपास 33 अंक निघाले. कादंबरीकर भालचंद्र नेमाडे हे आदिमचे पहिले वर्गणीदार होते, ते फक्त श्रीधर अंभोरे ह्यांच्या रेखाचित्रांनी प्रभावित होऊन.

ह्यातच आदिमचे महत्व तर अधोरेखित होतेच शिवाय श्रीधर अंभोरे ह्यांच्यातील चित्रकाराचे महत्त्व अधोरेखित होते. 1982 मध्ये आदिम बंद पडले. मात्र आदिममुळे सामाजिक बांधिलकीचा विचार आणि परिवर्तनाच्या शिलेदारांना दिलासा देण्याचे महत्वाचे काम झाले.



श्रीधर अंभोरे ह्यांना 1983 मध्ये 'फाय फांउडेशन' पुरस्काराने सुद्धा सन्मानित करण्यात आलेले आहे. भारतभरातून फक्त 14 वेगवेगळया लोकांना पुरस्कार देताना श्रीधर अंभोरे हे फाय पुरस्कार मिळणारे पाहिले चित्रकार होते हे विशेष. त्यांच्या सोबत आर. के. लक्ष्मण, जी. ए. कुलकर्णी, जयंत नारळीकर आणि खाशाबा जाधव आदी मान्यवर त्या वर्षी पुरस्कार प्राप्त होते. त्या शिवाय श्रीधर अंभोरे ह्यांना 'साहित्य-माणिक उत्कृष्ठ मुखपृष्ठकार पुरस्कार' (वर्ष 2009), 'पद्मश्री विखे पाटील फौंडेशन पुरस्कार'(वर्ष 2009), 'अजिंठा पुरस्कार' (वर्ष 2012), 'पद्मश्री दया पवार पुरस्कार' (वर्ष 2013), अ.भा. मायबोली मराठी साहित्य संघाचा 'विदर्भ भूषण' पुरस्कार 2013, 'रूपाली दुदगावकर स्मृति पुरस्कार' 2015 असे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. ते मराठीतील अग्रगण्य मुख्यपृष्ठकार आहेत. आजवर त्यांनी मराठीतील प्रसिद्ध अशा साहित्यिकांच्या 400 पेक्षा जास्त साहित्यकृतींचे मुखपृष्ठ रेखाटलेले आहेत. दिवाळी अंक, पुस्तके यासाठी ते मोफत रेखाटन करून देतात. त्यांनी आपल्या रेखाटनांची खास अशी स्वत:ची शैली निर्माण केली आहे.

श्रीधर अंभोरे ह्यांचे प्राथमिक शिक्षण चिखलगाव येथे झाले. पुढे अकोला येथे माध्यमिक शिक्षण झाल्यानंतर ते अहमदनगर येथे टपाल खात्यात नोकरीला लागले. आता ते अहमदनगर येथेच स्थायिक झालेले आहेत. पण लग्न न करणाऱ्या ह्या अवलिया कलावंतास चित्रकलेच्या तपस्येत आजही जंगल, गाववस्त्या, नद्या, नाले डोंगर, फक्त महाराष्ट्रच नव्हे तर जगभर फिरण्याच्या ध्यास आहे. मध्यप्रदेशातील नर्मदा नदीच्या पात्रात आठ-दहा दिवस भटकत असताना सृष्टीचे विलोभनीय रूप आणि जगण्याचे सत्य आपल्या कलेत

उतरण्यासाठी आणि व्यक्त करण्यासाठी त्यांच्या रंगरेषा कार्यान्वित झाल्या असे म्हणता येईल. सुरुवातीला महाराष्ट्र भूषण पु.ल देशपांडे आणि त्याच्या पत्नी सौ. सुनीता देशपांडे महाराष्ट्रभर बा.सी. मर्ढेकर आणि आरती प्रभू ह्यांच्या कविता सादरीकरणाचे कार्यक्रम घेत. त्यावेळी एकदा नगर येथे त्यांच्या कार्यक्रमाची पत्रिका श्रीधर अंभोरे ह्यांनी तयार केली. कार्यक्रम सुरू होण्याआधी पु. ल बोलले, "कार्यक्रम पत्रिका इतकी सुंदर झाली आहे की त्या पत्रिकेच्या उंचीचा कार्यक्रम आम्ही सादर करू शकतो की नाही ह्याबाबत मी साशंक आहे" ही खूप मोठी पावती एका श्रेष्ठ साहित्यिकांने एका श्रेष्ठ चित्रकाराला दिली होती असे मला वाटते. पुढे नगरचे कुणी पु.ल देशपांडे ह्यांना भेटले की ते श्रीधर अंभोरेला ओळखता का असा प्रश्न करायचे. 1983 मध्ये दूरदर्शन दिंडी नावाची मराठी मालिका असे, यामध्ये जेष्ठ नाटककार विजय तेंडूलकर हे मराठीतील ख्यातनाम व्यक्तीमत्वांची मुलाखत घेत असतं.

या मालिकेच्या दुस-या भागात विजय तेंडुलकर यांनी अंभोरे यांची चित्रकार म्हणून मुलाखत घेतली होती. त्यावेळी ती प्रसारित झाली. वडिलांच्या कडून कबीराच्या समतेची शिकवण मिळालेले श्रीधर अंभोरे ह्यांच्या चित्रात परिवर्तन, समाज व्यवस्थेला गेलेला तडा आणि मानवता वादाची वैचारिक बैठक असल्याचे दिसून येते. त्यांनी जितकी माणसं वाचली तितकी त्यांची बिना चेहऱ्याची चित्रकला बहरली असे म्हणावे लागते. 1998 ला नगरला झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे विचारपीठ सजविण्याचे मोठे काम श्रीधर अंभोरे ह्यांनी पूर्ण केले. त्यावेळी विचारपीठावरील कमानीवर पिंपळ पानामूळे वादाचा प्रसंग निर्माण होऊ लागला त्यावेळी पिंपळ पान हे फक्त तथागत बुद्ध ह्यांच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे असे नाही तर संत ज्ञानेश्वर ह्यांच्याशी सुद्धा पिंपळ पान जोडलेले आहे, हे सप्रमाण समजावून सांगताना आळंदीला असलेल्या पिंपळाच्या झाडाचा दाखलाही त्यांनी दिला. सर्वात महत्वाचे म्हणजे पिंपळाचे झाड म्हणजे निसर्ग आहे आणि उर्जेच प्रतीक आहे असे स्पष्टपणे सांगितले. आपल्या चित्रातून जाती भेद, धर्म भेद ह्या पलीकडचा विचार करत समानता साधण्याचा श्रीधर अंभोरे ह्यांचा विचार फार महत्वाचा आहे. चित्रकार सर्व धर्मचा अभ्यासक असावा असा विचार करत कुराण, बायबल शिकून घेत प्रसंगी जैन धर्मगुरूंच्या सानिध्यातही श्रीधर अंभोरे राहिले हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. निर्गुण निराकार ज्ञानेश्वर काढताना ज्ञानेश्वराचे चित्रही बिना चेहऱ्याचे काढणाऱ्या ह्या चित्रकाराचा व्यासंग आणि अभ्यास किती दांडगा असेल ह्याची कल्पनाही करणे कठीण आहे. तो व्यासंग आणि साहित्याची जाण ह्यामुळेच 1980-82 च्या काळात ग्रेस ह्यांच्या तरुण भारत मध्ये प्रकाशित होणाऱ्या मितवा ह्या ललित बंधाला चित्रातून प्रतिबिंबित करणारी लक्षवेधी रेखाटनेही श्रीधर अंभोरे देऊ शकले. चित्रकाराला माणसाची पारख कशी असावी हेही श्रीधर अंभोरे ह्यांच्या कडून शिकण्या सारखे आहे.

आदरणीय गंगाधर पानतावणे ह्यांनी अस्मितादर्शच्या मुखपृष्ठावर कायमच महापुरुषांना किंवा अस्मितादर्शच्या संमेलनाध्यक्ष ह्यांनाच स्थान दिले मात्र नागराज मंजुळेच्या फँड्री चित्रपटानंतर त्याचे चित्र अस्मितादर्शच्या मुखपृष्ठावर घेण्याची विनंती श्रीधर अंभोरे ह्यांनी केली आणि पानतावणे सरांनी ती मान्य केली. एका अर्थाने नागराज मंजुळे ह्यांना वंचित उपेक्षित समाजाचा प्रातिनिधिक चेहरा म्हणून मान्यता

मिळाली असे म्हणायला हरकत नाही. त्यानंतर नांदेडला अस्मितादर्श संमेलनाचे अध्यक्ष म्हणूनही श्रीधर अंभोरे ह्यांनी नागराज मंजुळे ह्यांचे नाव सुचवले आणि मराठीतील ख्यातनाम दिग्दर्शक, नट हा प्रभावी साहित्यिक असल्याचे ह्या महाराष्ट्राला समजले. एखादया चित्रकारावर उर्मी ह्या साहित्यिक नियतकालिकाचा विशेषांक यावा हा गौरव कलेची, रंग रेषांची साधना केल्याशिवाय प्राप्त होत नाही. कोणत्याही मोठया व्यक्तित्वाशी सलगी न साधता बाभळीच्या झाडाला आपल्या गुरू स्थानी मानून चित्रशैलीच्या बाबतीतदेखील आपल्या उपेक्षित जगण्यातील जागांना प्रभावशील बनवून त्यांच्या कुंचल्यानं बाभळीसारख्या काटेरी झाडाला त्यांनी मोरपिसाचं वैभव प्राप्त करून दिलं. बाभळीच्या बोरुने आपले चित्र रेखाटणारे आणि आपल्या रंग रेषात माणसाचा गंध शोधणारे निस्सीम कलावंत म्हणजे चित्रकार श्रीधर अंभोरे हे आपल्या वऱ्हाड मातीचे वैभव आहे. आम्हाला ह्या वऱ्हाड पुत्राचा अभिमान आहे असे नमूद करावेच वाटते. त्यांच्याच एका कवितेच्या ओळीसह त्यांना सलाम करताना म्हणावे वाटते, "रेषमयी मी झाले, तो रेषांचा राजा झाला" रंग, रेषा चित्रातील संजीवता आणि जीवनातील सत्याचा शोध घेणाऱ्या ह्या मनस्वी चित्रकाराला मानाचा मुजरा.

किरण शिवहर डोंगरदिवे
ता मेहकर जि बुलडाणा
kdongardive@gmail.com
+91-7588565576

"ताकदीची गरज तेंव्हा लागते जेंव्हा काही वाईट करायचे असते..नाहीतर.. दुनियेत सर्व काही मिळवण्यासाठी प्रेमच पुरेस आहे ."

- डॉ. प्रकाश आमटे

हेमलकसाची आपुलकी

वटवृक्षाचं बीज मोहरीपेक्षाही लहान असतं असं म्हणतात. १९७३ साली बाबांनी महाराष्ट्राच्या अगदी एका कोपऱ्यात, भामरागडच्या जंगलामध्ये रुजवलेला हा हेमलकसाचा लोक बिरादरी प्रकल्पही आता एखाद्या वटवृक्षासारखाच बहरला आहे, सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करतो आहे.

हेमलकसा आणि डॉ. प्रकाश आमटे हे दोन्ही तसे समानार्थी शब्दच वाटावेत. प्रकाश काका आणि मंदा काकू हेमलकसाच्या त्या निबिड जंगलात, बाबांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी पाय रोवून उभे राहिले. मागास माडीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणतानाच, दवाखान्याबरोबर माडिया मुलांसाठी शाळा आणि वन्य प्राण्यांचं अनाथालयही उभं राहिलं. सोबतीला विलास मनोहर, गोपाळ फडणीस, मनोहर येम्पलवार, बबन पांचाळ, जगन मचकले यांच्यासारखे अनेक जिवाभावाचे कार्यकर्ते खांद्याला खांदा लावून साथीला राहिले. ह्या साऱ्यांच्या अथक परिश्रमांमुळे हेमलकसाचा लोकबिरादरी प्रकल्प मजबूतपणे उभा राहिला, वाढला.

साधारण 2009 पासून दरवर्षी मी उन्नयन टूर्सच्या सहलींच्या निमित्ताने, अगदी नित्यनेमाने हेमलकसाला जातो आहे. गेल्या काही वर्षांत प्रकल्पावर झालेल्या अनेक बदलांचासुद्धा मी एक साक्षीदार आहे. आलेल्या पाहुण्यांना बघून, लाजून दूर पळून जाणारी इथल्या शाळेतली मुलं आता चांगलीच धीट झाली आहेत. सकाळी स्वतःहून सगळ्यांना गुड मॉर्निंग करू लागली आहेत. जुन्या बैठ्या दवाखान्याच्या जागी आता सुसज्ज असं नवीन हॉस्पिटल उभं राहिलं आहे. जेवणासाठी नवी मेस झाली, येणाऱ्या पाहुण्यांसाठी सर्व सुखसोयींनी सज्ज अशी नवी घरं तयार झाली. ओबडधोबड रस्ते चकचकीत झाले. पण एवढे बदल होऊनही इथले सर्व कार्यकर्ते मात्र जराही बदलले नाहीत. ते अजूनही पूर्वीसारखेच आहेत. अगदी अंगावरच्या कपड्यांसह. तसेच प्रेमळ, कधीही गेलं तरी आपुलकीने चौकशी करत पुन्हा आपल्या कामात बुडून जाणारे. खरंतर हे सगळेच जण वयाने, अनुभवाने आणि त्यांच्या कामाने माझ्यापेक्षा कितीतरी मोठे पण हे अंतर त्यांच्यापैकी कुणीच कधीही जाणवू दिलं नाही. ह्या जुन्या पिढीच्या तालमीत तयार झालेल्या सचिन, केतनसारख्या कार्यकर्त्यांच्या पुढच्या पिढीनेही हे गुण अगदी तंतोतंत उचलले आहेत. प्रकल्पावर पाहुण्यांसोबत फिरत असताना कुठेही भेटले तरी क्षणभर थांबून, अगत्याने चौकशी करत पुन्हा आपल्या कामात मग्न होणारे हे सगळेजण.

हेमलकसाच्या एका सहलीदरम्यान मी अनुभवलेली आणि माझ्या कायमची स्मरणात राहिलेली इथल्या कार्यकर्त्यांच्या आपुलकीची एक हकीगत सांगतो. एकदा हेमलकसाच्या वाटेवर असताना चंद्रपूरजवळ आमची गाडी अचानक बिघडली आणि गाडीच्या दुरुस्तीमध्ये आमचे जवळपास पाच तास वाया गेले. अर्थातच आम्हाला हेमलकसाला पोहोचायला आता खूपच उशीर होणार होता. आमचं रात्रीचं जेवण हेमलकसाला करायचं हे आधीच ठरलेलं होतं. एकदा चंद्रपूर मागे सोडलं कि हेमलकसाकडे जाणारा पुढचा बराचसा रस्ता जंगलातूनच जातो. आलापल्लीच्या पुढे शेवटचा दीड तास तर अगदी कीर्र जंगल आहे. त्यामुळे हेमलकसाला पोहोचल्याशिवाय वाटेत जेवणाची दुसरी कुठेच सोय होऊ शकत नाही. हेमलकसाला रात्रीची जेवणं मुंबई-पुण्याच्या मानाने जरा लवकरच आटोपतात. साडेसात - आठला प्रकल्पावर आलेल्या पाहुण्यांची जेवणं झाली कि आवराआवर करून रात्री मेसला कुलूप लावलं जातं. आम्हाला आता पोहोचायला उशीर होणार असल्याने "उशीर होत असला तरी आम्ही जेवायला येतो आहोत, आमचं जेवण मेसमध्येच ठेऊन द्या आणि मेसला बाहेरून नुसतीच कडी लावून ठेवा. आम्ही आल्यावर आमचं जेवण वाढून घेऊ" असं हेमलकसाला कळवून ठेवलं.

रात्री उशिरा पोहोचल्यावर शोधाशोध नको म्हणून हेमलकसाला आलेल्या पाहुण्यांची सोय बघणाऱ्या सचिनकडून आमच्यासाठी कुठल्या खोल्या राखून ठेवल्या आहेत त्याचीही माहिती घेऊन ठेवली. अचानक उदभवलेली गाडीची दुरुस्ती आणि त्यात भर म्हणून वाटेत सुरु असलेली रस्त्याची दुरुस्ती ह्यामुळे संध्याकाळी सहा-साडेसहाला हेमलकसाला पोहोचणारे आम्ही प्रत्यक्षात तिथे पोहोचलो तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते.

सचिन आमची वाट बघत अजून जागाच होता. तो चटकन पुढे आला आणि आमच्या मुक्कामाच्या खोल्या दाखवत, फ्रेश होऊन लगेच जेवायला बसा असं म्हणाला. तोवर किचन सांभाळणाऱ्या विजूने मेस उघडून आमचं जेवण गरम करायला ठेवलं.

आम्ही जेवायला मेसमध्ये पोहोचलो तेव्हा वाफाळती कढी आणि भात आमच्या स्वागताला तयार होते. सगळंच वेळापत्रक बिघडल्यामुळे रात्रीच्या जेवणाची कुठे नि कशी सोय होईल ह्याची काही खात्री नसताना, हेमलकसाच्या त्या दुर्गम जंगलात आम्ही रात्री साडेबारा वाजता गरमागरम कढी-भाताचा आस्वाद घेत होतो. जोडीला पोळी, विजूने पुन्हा मुद्दाम गरम केलेली भाजी आणि ताजी कोशिंबीरही होतीच.

हेमलकसाला सगळ्या कार्यकर्त्यांचा दिवस पहाटे लवकरच सुरु होतो. त्यामुळे त्या दोघांनाही दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठायचं होतं. त्यांच्या झोपेचं आम्ही खोबरं केलं होतं. आमच्यामुळे त्या दोघांना रात्री उशिरापर्यंत जगावं लागलं होतं. तरीही न कंटाळता विजू आणि सचिन आलेल्या पाहुण्यांना काय हवं नको ते अगत्याने पहात होते.

ते दोघं रात्री बारा वाजताही प्रेमाने करत असलेल्या आमच्या ह्या आदरातिथ्यामुळे आम्हालाच ओशाळायला होत होतं. काहीश्या अपराधीपणाच्या भावनेतून मी दोघांना म्हटलं.. "अरे, तुम्ही दोघं कशाला जागलात एवढा वेळ आणि एवढ्या रात्री कशाला जेवण गरम करत बसलात? आमचं आम्ही घेतलं असतं ना जेवण वाढून. "

"आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांना यायला उशीर झाला म्हणून कोणी गार झालेलं जेवण वाढतं का?" विजू अगदी सहजपणे बोलून गेला. तसं पाहिलं तर आम्ही कोण, कुठले? पण किती आपुलकी भरली होती त्याच्या ह्या एकाच वाक्यात! मला पुढे बोलायला काही शब्दच सुचेनात. अशा ह्या प्रकल्पाशी, आमटे कुटुंबीय आणि इथल्या कार्यकर्त्यांशी माझे ऋणानुबंध जुळले हे माझं भाग्य. कुणालाही आपण केलेल्या कामाचा गर्व नाही, मिळालेल्या मान-सन्मानाचा अहंकार नाही. प्रचंड मोठं काम करूनही साधेपणाने कसं रहायचं आणि आपले पाय जमिनीवर कसे घट्ट ठेवायचे हे शिकण्यासाठीच हेमलकसाला जावं.

असा हा हेमलकसाचा लोकबिरादरी प्रकल्प 2023 मध्ये सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करतो आहे.
त्या निमित्ताने गेली ५० वर्ष ह्या प्रकल्पासाठी योगदान दिलेल्या सर्वांचंच मनापासून अभिनंदन आणि पुढल्या वाटचालीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा!!

वैभव प्रभुदेसाई
नायगाव, पालघर, महाराष्ट्र
9967534396
9773510513
Vaibhavprabhudesai@gmail.com

"Joy is more infectious than leprosy."
-Baba Amte

मनस्वी नाटककार- बाबा डिके

मानसी नाटकाचा पडदा पडला आणि रविन्द्र नाट्यगृहात बसलेल्या शेकड़ो नाट्यवेडया इंदुरकरांनी टाळयांच्या कडकडात बाबाने लिहुन दिग्दर्शित केलेल्या मानसी नाटकाला उत्स्फुर्त दाद दिली. हळु हळु ते बाहेर पडु लागले मी पण उठुन त्यांच्या बरोबर चालु लागलो. नाटकाने दिलेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर, आपापसातल्या गप्पांतुन मी ऐकत होतो, पाहात होतो. मला मनस्वी आनंद झाला. मी परतलो, रिकाम्या प्रेक्षागृहाकडे बाघितलं व रंगमंचावर आपल्या मित्रांशी, सहकाऱ्यांशी गप्पात दंग बाबाला भरभरून सलाम केला. फक्त नाटक चांगले झाले म्हणुन नाही प्रेक्षकांना आवडलं म्हणुन ही नाही कारण बाबाच्या कर्तव्याची जाण असलेले व बाबावर प्रेम करणारे प्रेक्षकच तर इथे हजर होते. मी सलाम केला बाबाच्या जिद्दीला, सलाम बाबाच्या जाहीर संकल्पनांना व त्या नेटाने साकार करणाऱ्या पंचाहत्तर वर्षाच्या या तरूणाला सलाम सलाम..... पण थांब माझ्या मना थोड़ा थांब अजुन बरेच कुर्निसात करायचे आहेत त्याला, थोडा थांब...... मागे वळुन बघ.......

07 जून, 1919 साली नीमचला महादेव आणि पार्वती यांचे अपत्य म्हणुन आपल्या नानाजी (हरिनांफडे) या रेल्वेत काम करणाऱ्याच्या घरी बाबाचा जन्म झाला. वयाने बाबा माझ्या पेक्षा 21 वर्षांनी मोठा (मी, बाळ व बाबी भावडं) आमच्या लहानपणीच वडिलांना पोरके झालेला बाबा स्वभावाने, वृत्तीने माझा मित्र, फिलॉसाफर गाईड व वेळावेळी आम्हा सर्वांना धीर देणारा आमचा आधारस्तंभ. बाबाचं बालपण इंदुरला गेलं. वडिल को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टर. बाबाला

लहानपणी किर्लोस्कर, गडकरी, कोल्हटकर यांची नाटके वडिलांच्या माडीवर बसुन बघायची सवय होती. बालगंधर्व बाबाचे दैवत होते. वयाच्या 12व्या वर्षी बाबाने अकांडतांडव प्रहसन लिहिले. मित्रांची आवड म्हणुन वयाच्या तेराव्या वर्षी बालसवंगड्यांना घेवुन बाबाने 'महत्वाकांक्षी बालोद्धार मंडळ' या संस्थेची स्थापना केली. नाटक, हस्तलिखित मासिक व मैदानी खेळ खोखो, हुतुतु, आट्यापाट्या हे मंडळाचं ध्येय होते. खेळ वगैरे बाबाचा जिवलग मित्र शरद ढवळे करवून घ्यायचा. बाबा नाटके लिहुन, गणेशोत्सवात इंदुरच्या मोहल्या-मोहल्यात प्रयोग करायचा. विजयी तोरण, संत संताजी, नेताजी पालकर, बंदा बहादुर, अभिमन्यु, शालीवाहन प्रतिज्ञा, बलिदान, वाल्मिकी, पन्नादाई सारखी कैक प्रहसने बाबाने लिहिली आणि मंचित केली.

1938 साली मॅट्रिक होवुन बाबा रेडिओ कोर्स करायला मुंबईला गेला. मुंबईला कुस्ती, लेखन, वाचन तसेच गांधी, नेहरू, सुभाष, सावरकर, साने गुरूजी यांची भाषणे ऐकणं पण सुरु होत. बाबा नाटकं लिहुन इंदुरला पाठवायचा व बालोदार मंडळाचे त्याचे सहकारी गणेशोत्सवात त्याची प्रहसने करायचे. इंदुरला किशोर वयातील बाबा आपल्या सहकाऱ्यांबरोबर सायकलीवर धार, मांडव, ओंकारेश्वर यात्रा करायचा. पौर्णिमेच्या रात्री नर्मदा पोहुन पार करून ईश्वराचे दर्शन करायचे. मुंबईला गेल्यावर पण बाबाचे हे उपद्व्याप चालु होते, इथे नर्मदा नव्हती पण मालाडचा मार्वे बीच होता. पुण्याला आपल्या काकांकड़े गेल्यावर महाराष्ट्र सैनिकीकरण मंडळाचे शिवा दामले बरोबर कुस्त्या, विहिरीत सूर मारणं चालु होतं. शिवाच्या सांगण्यावरून भर पावसात दुथडी भरून वाहत असलेल्या मुठा-मुळा नदीमधे बाबाने उडी पण घेतली होती. मुंबईला वाय.एस.सी.सी.ने आयोजित कुस्ती स्पर्धेत बाबाने 22 मार्च 1940 रोजी ढाल पण पटकावली होती. साम्यवादी नेते लालजी पेंडेसे यांचे भाऊ दादा पेंडसे बाबाचे गुरू, वक्तृत्व स्पर्धेत एकदा गोविंद स्वामी आफळे यांच्या खालोखाल बक्षिस पण बाबाने पटकावल होत. रेडिओ कोर्स सोडुन बाबा काणे यांच्या बरोबर सार्सापरीला औषधांचा विक्रेता पण झाला.

1947 साली बाबाचे सनावदला लग्न झाले. सनावद, इंदुर आणि खांडव्याच्या मधलं गावं. आमचे वडिल यांनी तिथे सनावद   को-ऑपरेटिव्ह बँक काढली होती. वर्षभरात ती भरभराटीला आणली म्हणुन होळकर शासनाची त्यांना राय-रतन पदवी (पद्मश्री सारखी) मिळाली होती. जळगावच्या करकरे याची मुलगी उषा हिच्या बरोबर बाबाने मुंबईला आपल्या मावस बहिणीकडे (वैद्य लक्ष्मीबाई बोरवणकर) संसार पण थाटला होता. पण वर्षभरातच उषा वहिनींना क्षय रोगाने (टी.बी.) ग्रासले व बाबा पुढील उपचारासाठी वहिनींना जळगावला सोडुन इंदुरला परतला.

मॅट्रिकचं शिक्षण होत म्हणुन बाबाला इंदुरला सी.आय.डी. विभागात कारकुनाची नोकरी मिळाली त्याच बरोबर सार्सापरिला कंपनींने बाबाला औषधाचं दुकान थाटुन दिल. जवाहर मार्गवर बाबाने जी.एस. डिके आणि कंपनी नावाने दुकान टाकलं व त्यात त्याला नुकसान पण सोसाव लागलं. इकडे कारकुनी व महत्वाकांक्षी बालोद्धार मंडळाची नाटके तसेच शरद ढवळे यांचे मैदानी खेळ चालु होते. 1950 साली उषा वहिनी जळगावला वारल्या. 1951 साली बाबानी डिसेंबरमधे सुशिला तारे या शिक्षिकेशी लग्न केल. महाराष्ट्र साहित्य सभेत रामुभैय्या दाते (अरू व रविचे वडिल) अध्यक्ष होते. त्यांनी साहित्य सभेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सर्व सुत्र बाबाला दिली होती. बाबा व महत्वाकांक्षी बालोद्धार मंडळाने 1949 ते 1954 इंदुरला शारदोत्सव गाजवला होता. पन्नादाई, बेबंदशाही, उद्याचा संसार व लग्नाची बेडी (स्वतःच्या आयुष्यावर लिहिलेले) कारकुन, झुंझारराव सारखी नाटके सादर करून शारदोत्सवाचे प्रमुख अतिथी म्हणुन आलेल्या प्र.के. अत्रे, विद घाटे, कुसुमावतीबाई देशपांडे, पु.ल. देशपांडे यांची मने जिंकली.

याच सुमारास बाबाने इंदुरच्या नई दुनियाचे विद्वान संपादक राहुल बारपुते यांना आपल्या नाट्य मंडळात शामिल करून घेतले. त्यांच्या मागे चित्रकार हुसैनचे समकालीन चित्रकार विष्णु चिंचाळकर, गायिका सुमन दांडेकर, कुमार गंधर्व हे पण बाबाचे मित्र बनले.

मित्र व पत्नी पदवीधर म्हणुन की काय, बाबा ने 1953 साली वयाच्या 37व्या वर्षी बी.ए. पदवी मिळवली. 1954 साली बाबा व सुशिला वहिनींना अजय नावाचा गोड मुलगा झाला पण अवघ्या 6 वर्षात 1960 साली अल्पशा आजाराने तो वारला. बी.ए. झाल्यामुळे मध्य-भारत शासनाने प्रारंभ केलेल्या सूचना एवं प्रकाश विभागात ड्रामा ऑफिसर म्हणुन बाबाला अधिकारीपद मिळाले. कारकुनी सुटली घरात श्रीमंती आली. नवीन सायकल, रेडिओ, पंखा, गॅसची शेगडी आली. श्रीमंती आली पण श्रीमंतीची ऐट नाहीं आली. नोकर-चाकर नाहीं आले. साध्या जीवनाचे मूल्य नाहीं बदलले म्हणुन की काय 1964 साली बाबाने अधिकारीपदाचा वयाच्या अवघ्या 34व्या वर्षी राजीनामा दिला.

1954 साली शारदोत्सवात बाबाने संशयकल्लोळ या मराठी नाटकाचा हिंदी अवतार सादर केला. ग्वाल्हेरला मेळाव्यात ते सादर केलं गेले. ते बघायला मुख्य अतिथी केन्द्र सरकारच्या नभोवाणी खात्यातले गीत एवं नाट्य विभागाचे दिग्दर्शक कर्नल हेमचन्द्र गुप्ते हे आले होते. त्यांनी बाबाला सल्ला दिला कि भारत सरकारच्या विकास कार्यासाठी तुम्ही नाटके करत का करीत नाही. बाबाने यावर विचार केला व 15 ऑगस्ट 1955 साली बाबा, राहुल बारपुते, विष्णु चिंचाळकर व सुमन दांडेकर या चौघांनी नाट्य भारतीची स्थापना केली.

1955 ते 1990 पर्यंत आरोग्य, शिक्षण, ग्राम विकास सारख्या वेगवेगळया प्रश्नांवर शासनाने केलेल्या कार्याचा प्रचार नाट्य भारतीने भारताच्या सर्व हिंदी भाषी क्षेत्रात जवळपात तीन हजार नाट्य प्रयोग करून केला. 1950च्या आसपास ग्वाल्हेर-चंबल खोऱ्यात डाकु फार मोठया प्रमाणात होते. मध्यप्रदेश व राजस्थान सरकारला ती डोके दुखीच होती बाबानी युवावर्ग ग्रामरचनेचे कार्य करून हा प्रश्न सोडवु शकतो या धर्तीवर 'मंगू' नावाच्या डाकुवर आधारित नाटक लिहिलं होतं. दिल्लीला समर ड्रामा फेस्टीवल मधे मध्यप्रदेश शासनातर्फे ताल कटोरा गार्डनच्या विशाल खुल्या मंचावर हे नाटक सादर केलं गेलं. माम वरेरकर, कवि दिनकर सारखे कैक मान्यवर नाटकाला हजर होते. प्रेक्षकांनी या नाटकाला इतका चांगला प्रतिसाद दिला की शासनाने हे नाटक मंजूर केले. या नाटकाचे राजस्थान व मध्यप्रदेशच्या डाकुग्रस्त क्षेत्रात रात्र रात्र बस मधुन फिरत नाट्य भारतीने तीन-चारशे प्रयोग केले. एकदा तर राजस्थानच्या एका डाकुशी रस्त्यात रात्री बाचाबाची पण झाली पण बाबानी मध्यस्ती करत प्रकरण मिटवले. बाबा ने नाटकात दाखवले होतं की गावात काम करणारा एक सामाजिक कार्यकर्ता डाकुला शरणागतीसाठी तयार करतो. मध्यप्रदेश शासनाला हा शेवट मंजूर नव्हता. हजारो निरपराध लोकांना मारणाऱ्या डाकुला शरणागती न देता त्याला चकमकीत ठार करावं असा सल्ला बाबाला दिला गेला पण तीनच वर्षात 1960 साली चार-पाचशे डाकुंनी विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांच्या समोर बंदुका ठेवल्या व बाबाची दुरदर्शिता सिद्ध केली.

त्याच वर्षी म्हणजे 1960 साली बाबानी ओसाड पडत चाललेली गांव व शहराकडे धावणारा युवा वर्ग यांच्या आपसी संघर्षावर लिहिलेले नाटक 'खाई' (दरी) हे नाटक पण दिल्लीच्या समर ड्रामा फेस्टीवल मधे चांगले गाजलं व शासनाने ते नाटक पण मंजूर केले. त्याचे हजाराहून जास्त प्रयोग देशभर गाजले.



खाईचे मराठी भाषांतरित नाटक 'लोह परिसा लागेना' या नाटकाने महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत दुसरं स्थान मिळवले. या नाटकाने भारावलेले दिग्दर्शक गजानन जहागिरदार या नाटकावर सिनेमा काढणार होते पण ते राहुन गेल.

विषम परिस्थितीत नाईलाज म्हणुन इंदुरच्या सी.आय.डी. ऑफिसात बाबाला सात वर्षे कारकुनी करावी लागली. त्याचा उपयोग बाबानी कारकुन या नाटकात केला ते नाटक इंदुरला इतकं गाजले की, 10 दिवसाच्या गणेशोत्सवात त्याचे 21 प्रयोग झाले. या नाटकाने महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात 1964 साली तृतीय स्थान पटकावले. सर्व वर्तमानपत्रांनी नाटकाची, बाबाच्या व सुमन धर्माधिकारीच्या अभिनयाची इतकी तारीफ केली की पुढली 2 वर्षे महाराष्ट्राच्या कैक शिक्षण व सामाजिक संस्थानी कारकुन नाटकावर पैसे मिळवले.

प्रचारात्मक नाटकाव्यतिरिक्त इंदुरच्या प्रेक्षकांना हास्य विनोदी व सामाजिक नाटकं पहायला मिळावी म्हणुन नाट्य भारतीने 1957 ते 1964 लिटिल थिएटर ही चळवळ चालवली. निवडक प्रेक्षकांची संस्था उभी करून दरवर्षी तीन हिंदी व तीन मराठी अशी सहा नाटके, कालिदास, गडकरी, अत्रे, तेंडुलकर, पु.ल. देशपांडे, शंकर शेष इत्यादी सुप्रसिद्ध नाटककारांची तीही मराठी व हिंदी भाषांतरित नाटके सादर केली गेली. रविन्द्रनाथ टागोर, शरतचन्द्र यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांचे नाट्य रूपांतर, या व्यतिरिक्त बाबानी स्वतः लिहिलेल्या नाटकाचे प्रयोग नाट्य भारतीने सतत आठ वर्षे इंदुरच्या प्रेक्षकांसमोर सादर केले व वाहवा मिळवली.

गांधींसारखचं बाबा आमटे यांनी पण बाबा, राहुल बारपुते व चिंचाळकर गुरूजी यांना झपाटुन टाकलं होते. आनंदवन जणु या लोकांच घरच होते. बाबा तर नाट्य भारतीचे नाट्य प्रयोग दर वर्षी दसऱ्याला न चुकता आनंदवनात सादर करायचा. 1986 मधे बाबा आनंदवन सोडुन नर्मदाकाठी राहायला गेले. तरी सुद्धा बाबाचे नाट्य प्रयोग थांबले नाहीत.

1996 साली पण बाबाने आनंदवनला नाट्य प्रयोग सादर केला होता. त्याच्या महिनाभरात 15 नोव्हेंबर1996 रोजी बाबाने इंदुरला अल्पशा आजारात आपला देह ठेवला.आपल्या 'अडगळ' नाटकात बाबाने घरात अडगळ वाटणाऱ्या वृद्धांना संदेश दिला होता की आनंदवनात जावुन बाबांचे कार्य बघुन या व स्वतःला कार्यरत करा. बाबाने एकूण 31 नाटके लिहिली, 23 भाषांतरित केली व 22 रूपांतरित केली व जवळ जवळ सर्व मंचितपण केली. त्याशिवाय बाबाने 6 एकपात्री लिहिली व कैक रेडिओ श्रुतिका सादर केल्या. त्याची 2 नाटके कारकुन व मंगू प्रकाशित पण झाली. बाबाचं कारकुन, मंगू, खाई, मयूरी (शॉच्या पिगमेल्यिनवर आधारित बीवी एक दिन की) जिवा आणि शिवा, अडगळ, धूमकेतु, तस्वीर(संशयकल्लोळचे हिंदी रुपांतर) अत्यंत गाजले.

घरच्या सर्व जबाबदाऱ्या संभाळत, धाकटया भाऊ बहिणीचे शिक्षण, लग्न कार्य सर्व नीटनेटके करून पण अत्यंत विषम परिस्थितीत बाबाने शेवटच्या श्वासापर्यंत नाटकासाठी आपलं आयुष्य वेचले. कुमार गंधर्व, पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, वसंतराव देशपांडे, रामुभैय्या दाते, कर्नल हेमचन्द्र गुप्ते, बाबा आणि साधनाताई आमटे यांचा सहवास बाबाला लाभला. सकारात्मकता हा बाबाच्या आयुष्याचा गाभा होता.

आयुष्याच्या शेवटी बाबा, अण्णा हजारे यांच्या कार्याने प्रभावित झाला होता. गांधी प्रमाणे बाबाला वाटायचं की आमची खेडी म्हणजेच भारत आहे. या खेडयांना शहरांनी इतकं लुबाडलं आहे की अण्णांच्या नेतृत्वाखाली गावकऱ्यांनी गांधींनी 1942 साली इंग्रजांना जसं ठणकावले तसं गावकऱ्यांनी पण शहरांना सांगितले पाहीजे 'चले जाव' अस त्याला वाटायचं. 66 वर्षे जुनी नाट्य भारती आज ही जोमाने भारताच्या सर्व शहरात नाटके सादर करीत आहे. श्रीराम जोग या गुणी नटाच्या दिग्दर्शनाखाली नाट्य भारतीने महाराष्ट्र नाट्य स्पर्धेत कैक बक्षिसे पटकावली. 66 वर्षात नाट्य भारती मधे 300 कलाकार हजेरी लावुन गेले त्यात 110 स्त्रीकलाकार होत्या. अच्युत पोतदार, चंदू पारखी, स्वानंद किरकिरे, सुमन धर्माधिकारी, कुमुद चास्कर त्यातलेच.

अरुण डिके
arundike@gmail.com
मो. : 94250-64315

गोष्ट बोडंगे गावाची...

अलिकडेच बोडंगे गावाला भेट देण्याचा योग आला . निमित्त होते खावटी अनुदान कीट मंजूर झाल्याचा निरोप देणे. मी व गिसू पुसाली पंडित दुचाकीने निरोप देण्यासाठी निघालो. जुव्वी नाला, दर्भा पर्यंतचे अंतर पार करत बोडंगे गावच्या रस्त्याला लागलो. जंगलातील रस्ता, पायवाट, झाडे- झुडपे पार करत बोडंगे गावच्या टोल्यावर पोहोचलो. मग तिथून गावात पोहोचलो. गावात पोहोचल्यावर आम्हाला पहिले दर्शन झाले ते गावाच्या सामुहिक जीवन पध्द्तीचे गावातील व्यक्ती राजू पोरिया पुंगाटी यांच्या नवीन घराचे बांधकाम सुरू होते . कौल व बांबूच्या सहाय्याने. सर्व गावकरी सामुहिक श्रमदानातुन राजू पोरिया पुंगाटी यांच्या जुन्या घरावरची कौल नवीन घरावर लावत होते. कामाचे योग्य नियोजन दिसले. एक टीम कौल लावण्याचे काम करत होती तर दुसरी बांबूच्या पट्टया खिळयाच्या सहाय्याने लावत होती. याच श्रमदानाच्या टीम मधील एक जेष्ठ व्यक्ती- तुग्गे दोगा पुंगाटी यांची मुलाखत घेण्याचा योग आला. तुग्गे पुंगाटी यांनी 1974 - 75 सालची गावाची परिस्थिती सांगितली. त्यावेळी गावात फक्त 12 घरे होती. शेतीची सुरवात झाली नव्हती. हेमलकसा-भामरागड पासून गाव दुर होते. वनविभागाचे अधिकारी गावाला भेट देत असत. एखाद्या व्यक्तीने घर बांधले किंवा जमीन केली तर चौकशी करत असत. त्यांची मनधरणी करावी लागे. इरपा पुंगाटी हा त्यावेळी गावपाटील होता. तो चांगला व्यक्ती होता तो गावातील लोकांना मदत करत असे त्यांची आस्थेने विचारपुस करत असे.

आमच्या गावाच्या बाजुला भटपर व घोटपाडी ही गावे आहेत. गावाला छत्तीसगड राज्याची सीमा आहे. सुरवातीच्या काळात कंदभाज्या व कोसरी(नाचणी) हा आमचा आहार होता. आता परिस्थिती बदलली आहे. थोड्याफार सुधारणा होत आहेत.

बाबा आमटे यांची एक आठवण आहे. माझा भाऊ रामा दोगा पुंगाटी हा एकदा खूप आजारी पडला. पुजारी करून झाल्यावर आमचे पाय लोक बिरादरी प्रकल्पाच्या दवाखान्याकडे वळले. भावाला खाटेवर टाकुन आम्ही दवाखान्यात पोहोचलो. त्यावेळी वडाच्या झाडाजवळ झोपडी वजा दवाखाना होता. तिथे त्याला घेऊन आलो. त्यावेळी बाबा आमटे, डॉ. प्रकाश आमटे तिथे होते. त्यानी मलमपट्टी केली व माझा भाऊ थोड्या वेळाने खणखणीत बरा झाला. खाटेवरून उठून बसला. खाटेवरून आलेला माझा भाऊ आमच्यासोबत पायी चालत आला. दवाखान्यात वेळेत पोहचलो नसतो तर माझा भाऊ माझ्यासोबत नसता.

लोक बिरादरी आश्रमशाळेत आमच्या गावातील मुले शिकतात त्याच्या विचारात-वागण्यात खुप बदल झाला आहे. शिकारीचे प्रमाण कमी झाले आहे. लोक शेती करत आहे. गावात यायला चांगला डांबरी रस्ता नाही तो झाला पाहिजे. गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत पावसाळयात शिक्षक पोहोचू शकत नाहीत कारण गावाकडे येणाऱ्या रस्त्यावरच्या नाल्यावर चांगला उंच असा पूल नाही. तो पूल बांधला गेला पाहिजे. अशा सुधारणा व्हाव्या म्हणजे आमच्या मुलांचं-नातवंडांच आयुष्य सुखकर होईल असे वाटते.

मुलाखतकार आणि शब्दांकन
गिरीश कुलकर्णी
kulkarnigirish12345@gmail.com
+91 94236 18407

माझे 'वन' डे

वने व वन्यप्राणी याबद्दल सर्वांनाच फार आकर्षण असते. मी सुद्धा यास अपवाद नाही. पशुचिकित्सक ही पदवी घेतल्यानंतर माझ्या नोकरीची सुरवात चंद्रपूर जिल्ह्यातून झाली. माझे बालपण चांदयात गेल्यामुळे हा जिल्हा मला नविन नव्हता. लहानपणी खूपदा ताडोबात गेलो होतो व वन्यप्राणी पाहिले होते. चंद्रपूर पशुचिकित्सालय मध्ये काम करताना सुदैवाने वनविभागाच्या मृगविहारातील वन्य प्राण्यांवर उपचार करण्याची संधी मिळाली व वन विभागात पशुचिकित्सक म्हणून काम मिळाले तर खूपच चांगले होईल असा विचार मनात आला.
1972 मध्ये पाहिलेले वनविभागात काम करण्याचे स्वप्न, 1999 मध्ये साकार झाले. नागपूर येथील वनसंरक्षक वन्यजीव या कार्यालयात प्रतिनियुक्ती वर रुजू झालो. महाराष्ट्रात मी एकमेव वन्यजीव पशुचिकित्सक होतो. माझ्या नंतर डॉ. रणदिवे, बोरिवली येथे रुजू झाले. रुजू होण्यापूर्वी मनात खूपच धाकधूक होती. जेवढे जमेल तेवढे वाचन व माहिती रुजू होण्यापूर्वी गोळा केली. अखेर 24 ऑगस्ट 1999 रोजी वनविभागात रुजू झालो व खऱ्या अर्थाने माझे 'वन' डे म्हणजेच वन दिवसांना सुरवात झाली. अगदी नवे क्षेत्र होते. पण काम करण्याची हिंमत होती. रुजू झाल्यावर वनसंरक्षक मा. श्री. भगवान, IFS यांना भेटण्यास भितभीतच गेलो. मी नवीन वन्यजीव पशुचिकित्सक आहे, असे सांगितल्यावर त्यांना खूपच आनंद झाला. खूपच आस्थेने त्यांनी माझी विचारपूस करून आजपासूनच कामाला सुरवात करा असे सांगितले. आपण जे कराल ते मला मान्य असेल व काही अडचण आल्यास मला केंव्हाही भेटा असे सुचवले. त्यांनी दिलेल्या हिमतीमुळेच मी वनविभागात काम करू शकलो. लवकरच मी माझ्या कामामुळे त्यांचा खूप जवळचा झालो. माझे वन्यजीव या क्षेत्रातील ते माझे पहिले गुरु होते व आजही आहेत.

पाळीवप्राणी व वन्यप्राणी यावर उपचार पद्धती खूपच वेग-वेगळी आहे. याची माहिती घेणे खूपच आवश्यक होते. महाराजबाग येथील पशुचिकित्सक व नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. दक्षिणकर, डॉ. भोजने, डॉ. धूत, डॉ. उपाध्ये व डॉ. बावस्कर यांची भेट घेतली. त्यानी भरपूर सहकार्य व मार्गदर्शन केले. त्यांचे अनमोल सहकार्य मिळाले. त्यांच्याच सहकार्यामुळे पुढील वाटचाल सुरू केली. दरम्यान वनविभातील कर्मचाऱ्यांकरिता मार्गदर्शक माहितीपत्रक काढली. मा. श्री. भगवानसर माझ्या पाठीशी होतेच. सतत प्रोत्साहन देत होते. त्यामुळे मी लवकरच या विभागात रमलो, रूळलो. सर्वांच्या ओळखी झाल्या. बेशुद्धीकरण विधीची माहिती व बंदुकीची माहिती श्री. किशोर मिश्रिकोटकर यांचे कडून घेतली. त्यांनी भरपूर सहकार्य केले. सेमिनारी हिल, नागपूर येथे जाऊन नियमित सराव केला. याकामी श्री. गुणवंताने बरेच सहकार्य केले. आज तो नाही याचे वाईट वाटते.
श्री. नोटे, श्री. उमेश धोटेकर यांचे भरपूर सहकार्य लाभले. माझ्या कामावर सर्व वरिष्ट खुश होते. त्यातच एक दिवस महाराजबागेतील बिबट्या पिंजऱ्याबाहेर पडला. मा. श्री. भगवान साहेबांनी मला बिबट्यास पकडण्याचे आदेश दिले. डॉ. धूत, डॉ. भोजने व डॉ. उपाध्ये माझ्या सोबत होते. माझा हा पहिलाच अनुभव होता. डॉ. उपाध्ये गन घेऊन माझ्या बरोबर होते. प्रसंग खूपच बाका होता. अनुभवी

डॉ. उपाध्ये सोबत होते. आम्ही त्या बिबट्यास जेरबंद केले. यावेळी सुद्धा मा. श्री. भगवान साहेब माझ्या पाठीशी उभे होते.

याच कार्यालयातील श्री. अमोल लोलुसरे व श्री. चिंचोळकर यांनी सर्व कागदपत्रे मराठीत टाईप करून दिली. सेवानिवृत्त झाल्यावर सुद्धा आजपर्यंत वनविभागात काम करीत आहे. कातलाबोडी या गावात 30 फूट खोल विहिरीत एक वाघीण पडली होती. मा. श्री. रामबाबू सर, डॉ. भोजने, श्री. किशोर मिश्रिकोटकर , श्री. कुंदन हाते व श्री. गिरीश वशिष्ठ यांचे सोबत वाघिणीला बेशुद्ध करून सुखरूप बाहेर काढले. मा. श्री. भगवान साहेबांनी वन्यप्राणी या विषयावर एक तांत्रिक पुस्तिका लिहा असे सुचविले. लागलीच सर्व मित्रांना याची माहिती दिली व थोड्याच दिवसात पुस्तिका प्रकाशित झाली याचे सर्व श्रेय मा. श्री. भगवान साहेबाना जाते.

नागझिरा व नवेगाव या दोन्ही जंगलांमध्ये नियमितच जात होतो. नागझिरा सारखा सुंदर निसर्ग खरच पाहायलाच पाहिजे. तेथील वन्यप्राणी पहाताना खूपच आनंद होतो. तेथील व नवेगाव मधील मुख्य आकर्षक म्हणजे रानगवे. नवेगाव मधील जंगलातील गव्यांवर तोंडखुरी, पायखुरी सारख्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला व या गव्यांवर कसा उपचार करावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला. यावर ताबडतोब उपचार करणे आवश्यक होते अन्यथा अनर्थ ओढवला असता. मा. श्री. भगवान साहेबांनी ही जबाबदारी मला दिली व कसेही करून हा संसर्गजन्य रोग आटोक्यात आणण्यास सांगितले. त्यांचे पाठबळ मिळाल्यावर ताबडतोब नवेगाव येथे गेलो. संसर्गजन्य रोग आटोक्यात आणणे गरजेचे होते. नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयात असलेले माझे मित्र डॉ. सरोदे यांच्याशी विचारविनिमय करण्यात आला. त्यांनी कॉलेजची टीम ताबडतोब पाठविली. रोगाची लक्षणे पाहून निदान केले. एवढ्या सर्व गव्यांवर उपचार करणे हे फारच मोठे काम होते. श्री.बर्डेकर साहेब, IFS हे उपवनसंरक्षक,ते सुद्धा उपस्थित होते.

उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे जंगलात कृत्रिम पाणवठे तयार केलेले होते व न चुकता त्यात पाणी भरण्यात येत होते. याच पाणवठ्यांवर वन्यप्राणी पाणी पिण्यास येत होते. मा. श्री. भगवान साहेबांशी सतत संपर्क होताच. निधीची कमतरता पडणार नाही याची त्यांनी काळजी घेतली होती. प्रथम उपचार कसा करावा यास्तव एक मिटिंग घेतली. तेथील रेंजर श्री. निमजे हे खूपच तडफदार व अनुभवी होते. त्यांना विचारून एकंदर पाणवठे किती आहेत, सर्व पाणवठ्याना जाणाऱ्या मार्गांची माहिती घेतली व तसा नकाशा तयार केला. श्री. निमजे यांनी स्वतः लक्ष देऊन संपूर्ण स्टाफ आमच्या सोबत दिला. पाणवठ्यांवरच उपचार करण्याचे ठरविले. प्रश्न होता कोणते औषध वापरावे? याकरिता ऍलोपॅथी, आयुर्वेदिक व होमिओपॅथी औषधाची निवड करण्यात आली.

कृत्रिम पाणवठ्यांच्या भोवती 10 फूट जागा सडा टाकून ओली करण्यात आली, त्यावर हळद पसरविण्यात आली. पाण्यात अँटीबायोटीक औषध व खुरेन हे होमिओपॅथी औषध टाकण्यात आले. औषधांची मात्रा अंदाजे किती गवे पाणी पिण्यास येतात यावरून ठरवली. या रोगात वन्यप्राणी लंगडतो, चारा खात नाही. वन्यप्राणी तहान लागल्यावर लंगडत पाणी प्यायला यायचे. खुरांमध्ये जखम व फोड असल्यामुळे गव्यांना हळदी वरून जावे लागायचे. हळद आपोआप खुरांमध्ये लागायची. हळद ही जंतुनाशक आहे. पिण्याच्या पाण्यात सुद्धा औषधें टाकली होती. रोज सकाळ संध्याकाळी ही उपचार पद्धत सर्व पाणवठ्यांवर एक

आठवडा चालू होती. दुरून पाहिले असता सर्व पाणवठ्यांवर पिवळी रांगोळी घातली असे दिसत होते. समाधानाची बाब म्हणजे हळू हळू रोग कमी झाला व गवे नॉर्मल झाले. या मोहिमेत श्री. निमजे रेंजर सतत आमच्या सोबत होते व सर्व औषधी आणुन देत होते. अत्यंत कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची साथ आम्हाला मिळाली यात शंकाच नाही. त्यांचा पूर्ण स्टाफ सतत आमच्या सोबत होता.
हा एक नवीन अनुभव मात्र मिळाला. गवे बरे झाल्यावर सुद्धा त्यांच्यावर सारखे लक्ष ठेवण्यात आले. सर्वांच्या सहकार्यामुळेच हे साध्य झाले. विशेषतः श्रीपती वाहनचालक याने अपार मेहनत घेतली. श्री. कुलकर्णी सर, IFS, वनसंरक्षक सरांची भेट येथेच झाली. व आजही ओळख टिकून आहे. वन्यप्राण्यावर उपचार करणे हे वन्यजीव चिकित्सकचे आद्य कर्तव्य आहे पण कधीकधी पुस्तकात न वाचलेली उपचार पद्धत करावी लावते एवढे मात्र खरे.

मेळघाट व्याघ्रप्रकल्प येथे काम करण्याचा योग अचानकपणे आला. डॉ. स्वप्नील सोनोने यांनी माझी भेट घेतली, मेळघाट येथे Rapid Rescue Unit ची स्थापना करण्याचा मानस आहे व या करता आपण मदत करा अशी विनंती केली. मी माझ्या मित्रांना याची माहिती दिली व त्यांचा होकार येताच सेमाडोहला गेलो. व्यवसायांचे डॉक्टर असलेले डॉ. सोनोने यांनी ही टीम स्थापन करतांना बरीच मेहनत घेतली. अत्यंत शांत, शिस्तबद्ध व उत्साही असे त्याचे व्यक्तिमत्त्व. त्यांनी ही टीम कशी उपयुक्त ठरेल या बाबत आमचे मार्गदर्शन घेतले व पहाता पाहता एक उत्कृष्ट टीम तयार झाली. आज या रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे व डॉ. स्वप्नील आज त्याचे मुख्य आधारस्तंभ आहेत.
हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पात डॉ प्रकाश आमटे यांनी वन्यप्राणी पाळले होते. त्या प्रकल्पास भेट देऊन त्यांच्याकडे किती वन्यप्राणी आहेत व त्यांचे काय करावे यावर आपले मत व सविस्तर अहवाल सादर करा असे आदेश वरिष्ठ कार्यालयातून प्राप्त झाले. ही फारच मोठी जबाबदारी होती व जाणे तर भाग होते. हेमलकसा येथे गेलो.प्रकल्पास भेट देण्यास गेल्यावर मा. डॉ प्रकाश आमटेंना माझा परिचय दिला व येण्याचे प्रयोजन सांगितले. त्यांनी भरपूर सहकार्य केले. सर्व वन्यप्राण्यांची यादी तयार केली. सर्व बारीकसारीक माहिती घेतली. वन्यप्राणी वागणूक, त्यांचे हावभाव व मनुष्य जवळ आल्यावर त्याची वर्तवणूक अगदी डोळ्यात तेल टाकून पाहिली कारण प्रसंगच बाका होता. त्यावेळी त्यांना पद्मश्री. मिळाली नव्हती. नागपूरला आल्यावर सविस्तर वन्यप्राणी यादी व वन्यप्राण्यांबाबत माझे मत व अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केला.
सातपुडा फौंडेशनचे सर्वेसर्वा श्री. किशोर रिठे यांचा पन्ना येथे आमच्या बरोबर चला म्हणून फोन आला. निमित्त होते पन्ना व्याघ्रप्रकल्प येथे वाघांची शून्य झालेली संख्या. यास्तव तेथे मिटिंग होती. माझ्या परीने मी काही उपाय सुचवले. श्री. किशोर रिठे यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. तेथे मूर्ती सर, IFS यांची प्रथमच भेट झाली. त्यानंतर त्यांनी मला पुन्हा बोलावले. आज शून्य वरून वाघांची संख्या अंदाजे 40च्या वर आहे.
सेवानिवृत्त झाल्यावर TRACT, WWF, WTI बरोबर काम केले. आत्ता मात्र फक्त WCCB Govt. of India सोबत गेल्या 12 वर्षांपासून काम करत आहे. त्यांच्या कार्यशाळा भारतभर असतात. श्री. मोरणको, श्री. राकेश बर्मन, श्री. धोंडगे यांच्या सोबत काम करताना बरेच शिकायला मिळाले. या प्रवासात बऱ्याच

लोकांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. त्या सर्वांचा मी आभारी व शतशः ऋणी आहे. पण श्री. भगवान साहेबांच्या ऋणातून मीच मुक्त होणार नाही. माझी त्यांनी NTCA मध्ये सल्लागार म्हणून माझी नियुक्ती केली. माझे पुस्तक प्रकाशित केले व भारतभरात वन्यजीव विषयक कार्यशाळेत पाठवले. असा गुरू मला भेटला याचा मला अभिमान आहे. श्री. मुजुमदार सर, IFS, श्री. गिरीपुंजे सर यांनी सुद्धा मला भरपूर प्रोत्साहन दिले. आता वयाची 75 वर्ष पूर्ण झाली. पण जोपर्यंत जमेल तो पर्यंत वनविभागात काम करत राहीन येवढे मात्र खरे. RETIRED BUT NOT TIRED.

सरते शेवटी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. माझ्या गुरूचा असाच आशीर्वाद राहो हीच अपेक्षा ठेवतो. हा निसर्ग व वन्यप्राणी नष्ट होता कामा नये. हा भूगोलच नष्ट झाला तर आपण सुद्धा इतिहासजमा होऊ यात शंकाच नाही.

Save Nature Save Wildlife!

डॉ अ. द. खोलकुटे
सेवानिवृत्त पशुधन अधिकारी(वन्यजीव)
+91-9822718291
adkholkute@gmail.com

"खुशियों का अंत हो जाता है
जब इसे लोगो के बीच में साझा नही किया
जाय."
-बाबा आमटे

कोरोनाचा फायदा ...

दचकलांत नं हे शीर्षक वाचून! पण आमच्याबाबतीत मात्र ते खरं आहे. कसं ते सांगते.

मुंबईच्या हवेत दमटपणा, धूळ, धूर आणि नाना तऱ्हेची प्रदूषणं सदैव असतात आणि त्याचा त्रास सोसणारे माझ्यासारखे अनेक जण आहेत. कोरोनाची जागतिक चाहूल साधारण २०१९ अखेरीस लागली आणि त्याची व्याप्ती समजायला आपल्याकडे २०२० ची जानेवारी-फेब्रुवारी उजाडली.

मी एक वैद्यकीय तज्ञ (क्ष-किरण तज्ञ) आहे आणि माझा सर्दी-खोकला सांभाळून, मी २०२०च्या फेब्रुवारी पर्यंत मुलांच्या वाडिया इस्पितळातील काम करत होते.

आमच्याकडे वरकाम करणाऱ्या बाईंची आणखी एक वेगळी कथा थोडीशी आधीची. गावाकडे लग्न करून दिलेली मुलगी यामिनी आणि तिची दोन ९ आणि ७ वर्षं वयाची मुलं ज्योती आणि प्रकाश एके दिवशी आमच्याकडे आली. संसारात लक्ष न देणाऱ्या नवऱ्याच्या घरून, नवरा आणि सासरची मंडळी यांची नजर आणि पहारा चुकवून यामिनी मोठ्या धाडसाने आपल्या मुलांना घेऊन पळून मुंबईला स्वतःच्या आईच्या घरी आली. आधी तिचा नवरा मुंबईत कामानिमित्त होता आणि मुलं देखील धारावीच्या इंग्लिश माध्यमाच्या खासगी शाळेंत जात होती. परंतु त्यांचा संसार चालवायची जबाबदारी आमच्या वरकाम करणाऱ्या बाईंवर पडत होती. त्यामुळे सासू-जावयाच्या सवाल-जबाबामुळें यामिनीचा नवरा गावी निघून गेला होता आणि नंतर त्यांचा संसारदेखील. ह्या सर्व धामधुमींत मुलं वर्षभर शाळेला मुकली होती.

आमच्या घराजवळ मुंबई महानगरपालिकेची एक छान शाळा आहे. मधल्या मोकळया पटांगणाला वेढा घालून बसलेली सुंदर देखणी इमारत ह्या शाळेला लाभली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका बाई आणि इतर शिक्षकवर्ग चांगला वाटला. ह्या महानगरपालिकेच्या शाळेत मुलांना दोन गणवेश आणि खेळासाठी साठी वेगळे कपडे असे तीन कपड्यांचे जोड दिले जातात. त्याचबरोबर गणवेशाचे बूट, पावसाळी सँडल्स आणि खेळासाठी वेगळे बूट अशा पादत्राणांच्या तीन जोड्या पण मिळतात. शिवाय पुस्तकं , वह्या, खाऊसाठी, पाण्यासाठी प्लास्टिकचा डबा, बाटली आणि हे सर्व ठेवण्यासाठी स्कुलबॅग पण दिली जाते. शिवाय मधल्या सुटींत त्यानं गरम गरम वरणभात , खिचडी, किंवा तत्सम काही पौष्टिक अन्न देखील मिळतं. आमच्या सांगण्यानुसार बाईंची नातवंडं ह्या शाळेंत दाखल झाली. त्यांचा सर्व लवाजमा सकाळी साडेदहा-अकरा पर्यंत धारावीतून आमच्याकडे माहीमला येई. बाईंनी आमचं काम मुलीकडे सोपवलं. मुलं जेवून एक वाजताच्या शाळेला जात. यामिनी आमच्यासकट आजूबाजूची दोन-तीन कामं करून संध्याकाळीं

६ वाजता शाळेतल्या मुलांना घेऊन आमच्याकडे येई. तिची आईदेखील आसपासची कामं करून त्यांच्याबरोबर असे. मीही त्याच सुमारास हॉस्पिटलमधून घरी यायची. घरांतील छोटीमोठी कामं संपवून ती सर्वजणं साडेसात-आठ वाजेपर्यंत धारावीला घरी परतत.

कोरोनानें सारंच बदलून टाकलं. आम्हांला बसमधून जाणाऱ्या मुलांची काळजी वाटू लागली आणि त्यांतून धारावीचा जीवन-संघर्ष माहित असल्याने वाटणारी भीती. शेवटी माझ्या नवऱ्याने त्यांना सांगितलं कीं ही साथ असेपर्यंत तुम्ही आमच्याकडेच रहा. शाळाही जवळच आहे आणि उगीच जा-ये नको आणि कोणाच्या सर्दी-खोकल्याची लागण नको. तारीख होती २० मार्च २०२०. जेमतेम दोन दिवसांतच पंतप्रधानांची 'लॉक-डाऊन' ची घोषणा झाली.

बसेस बंद, रेल्वे बंद , बाजार बंद, दुकानं बंद, शैक्षणिक संस्था बंद, ऑफिसेस बंद , सारं काही बंद,बंद! सगळं काही ठप्प झालं. हॉस्पिटल्स फक्त भरून गेली. वॉट्स अपवर कुठच्या हॉस्पिटल्समध्ये किती जागा शिल्लक आहेत अशा विचारणा आणि कोविडचे देश-विदेशीचे अहवाल मिळायला लागले. कोरोनावर कुठची कुठची औषधं लागू पडतात त्याचं आभासी संशोधन, खऱ्या संशोधनापेक्षा अधिक प्रमाणांत होतं असं मला वाटतं. आमचा क्ष-किरण तज्ज्ञांचा गट सहसा औषधांपासून दूर असतो. तरीपण बाजारांत आणि आभासी जगांत काय चाललंय याची उत्सुकता सर्वांच्या मनांत असते नाही? त्यांत भर पडली ती आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, घरगुती वगैरेची!

बाहेरचं जीवन गपगार झाल्यानें घरांतल्या गृहलक्ष्मीच्या श्रमांना काहीं मर्यादाच उरल्या नाहीत. एक बरं झालं कीं ह्या लक्ष्मींच्या विष्णूंना देखील ह्या विषाणूंमुळे घरकामांत मदत करण्याची संधी गवसली. कोरोनाचा हा एक मोठा वैश्विक फायदा !

आमच्यापुरतं बोलायचं झालं तर आम्हांला यामिनी असल्यामुळे घरकामाचा वाढलेला बोजा उचलावा लागत नाही. म्हटलं तर हा एक फायदाच.

यामिनीची मुलं लहान पण समजू शकणाऱ्या वयाची. महेंद्र गणिताचे प्राध्यापक, चौफेर संचार असलेले आणि मी जरी वैद्यकीय क्षेत्रांतली आहे तरी माझी भाषांची विशेषतः मराठीची ओढ पूर्वीप्रमाणेच. मग काय ह्या दोन लहान मुलांना गणित, इंग्लिश आणि मराठी शिकवण्यांत आमचा वेळ मजेत जातो.

आजच्या जगरहाटीप्रमाणे इंग्लिश माध्यमाच्या शाळेंत जाणाऱ्या बहुतेक मुलांसारखं ह्या मुलांचं भाषाविषयक अज्ञान अफ़ाट होतं. शिक्षणाचा अर्थ आणि गंध जाणू न शकणाऱ्या अनेक पालकांसारखीच त्यांची अर्धशिक्षित आई, इंग्रजी माध्यमाच्या शाळेंत गेल्यावर मुलं चांगली शिकतील असं वाटणारी. घरांत कोणी शिकवणारं

नाही म्हणून ट्युशनला जाणारी मुलं हें इथलं वास्तव आणि यामिनीच्या मुलांना तर वर्षभर शाळा, पुस्तकं, वह्या यांचं दर्शन देखील नव्हतं.

मुलांना वाचतं करणं हें थोडं आव्हानात्मक काम होतं. इंग्लिश आणि मराठी मुळाक्षरं माहित असली तरी शब्दांचे अर्थ आणि वापर कसा करायचा तें लक्षपूर्वक सांगावं लागे.

सुदैवाने आमच्याकडे अवांतर वाचनासाठी लहान मोठी बरीच पुस्तकं असल्यानें त्यांना त्या पुस्तकांत लिहिलेलं समजावून देणं आणि त्यांना वाचत करणं त्या मानाने सोपं गेलं. त्यांचे इंग्लिश आणि मराठी पाढे म्हणून घेणं आणि लिहायला लावणं त्या मानाने अवघड नव्हतं पण मराठी वाचतांना त्यांची बाराखडीची भंबेरी उडे. (इयत्ता दुसरी आणि चौथी)

परंतु ह्या सर्व खटाटोपांत आम्हांला एक प्रकारची मजा आली. आमचा वेळ सार्थकी लागतो आहे ह्याचं एक समाधान लाभतंय. आयुष्याचा एक वेगळा सूर गवसल्यागत झालंय. कोविडच्या कोंडवाड्याचा जाच होत नाही.

आजूबाजूच्या मध्यमवर्गी कुटुंबांची ओढाताण आपल्या वाट्याला येत नाही याचं एक सुप्त समाधान कुठेतरी मनाला जाणवलं होतं. त्यामुळे ह्या मुलांच्या सर्वांगीण प्रगतीकडे लक्ष पुरवलं पाहिजे ही जाणीव मनात ठसली.

सुदैवानें आम्हांला एक मोठी छान मोकळी गच्ची लाभली आहे. संध्याकाळीं तिथें धावाधावी करणं, दोरीच्या उड्या मारणं हे क्रमप्राप्त झालंच पण त्याखेरीज प्रोफेसरांना बसून बॉल टाकण्याची आणि मुलांनी काठीची बॅट बनवून क्रिकेट खेळण्याची पण सोय केली आहे. सोसायटीतील मंडळी आपापल्या सोयीनुसार गच्चीवर फिरायला येतात त्यामुळे सोशल डिस्टंसिंगचा प्रश्न उद्भवत नाही.

गेल्या वर्षी दिवाळीच्या वेळी आमच्या ह्या पाहुण्यांच्या धारावी कनेक्शनमुळे मला घराबाहेर न पडता बऱ्याचशा मातीच्या पणत्या मिळवता आल्या. मग मुलांना त्या रंगवायला दिल्या. देखण्या पणत्या तयार झाल्या पण त्यांचं करायचं काय? आमच्या सोसायटीच्या सर्व बिऱ्हाडी दोन दोन पणत्या दिवाळी भेट म्हणून नेऊन द्यायला त्या मुलांना त्यांच्या आईबरोबर पाठवलं - आमची दिवाळी गिफ्ट्स!

गोव्यात माहेर असलेली एक तरुण सून आमच्या सोसायटीत आहे. तिने तिच्या छोट्या मुलीसाठी गोव्यातील प्रथेप्रमाणे नरकचतुर्दशीच्या आदल्या दिवशी बनवायचा नरकासूर बनवण्याची कामगिरी त्यांच्याकडे असलेल्या घरकामगाराला दिली. हा नरकासूर आमच्या गच्चीत बनला आणि आमच्या मुलांनी त्याचा मनापासून आनंद घेतला. नाहीतरी दिवाळी हा सण मुलांसाठीच असतो नाही! दिवाळीची आतिषबाजी, फटाके वगैरे नसूनसुद्धा मुलांनी दिवाळीचा आनंद घरगुती लाडू-चिवडा आणि गच्चीतले खेळ यांनी साजरा केला. भाऊबीजेची ओवाळणी पण छान पार पडली.

दोन्ही मुलांचे वाढदिवस काही गोड पदार्थ करून बनवून आणि घरगुती बनावटीचा, अनावश्यक क्रीम नसलेला गाजराचा केक कापून साजरा झाला. ख्रिसमसला मुलांनी स्वतःच जुन्या वहीच्या पुठ्ठ्याची झोपडी बनवून त्यांत येशूबाळाला झोपवलं. झोपडीला नारळाच्या वरच्या किशांनी शाकारलं. माझ्याकडे अनेक वर्षं निगुतीने जपलेली एक छोटी ख्रिसमस ट्री आहे. ती आम्ही माझी मुलगी लहान असताना कॅनडात विकत घेतली होती. झोपडीच्या सानिध्यात आम्ही ही ख्रिसमस ट्री ठेवली. त्यांची आई केक बनवायला शिकली आहे. सण मजेंत साजरा झाला.

आता ह्या वर्षी मुलांची ऑन लाईन शाळा सुरु झाली आहे. त्यांची लिहिण्यावाचण्याची प्रगती झाली आहे. त्यांच्या पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त विंदा करंदीकरांच्या बालकविता त्यांना पाठ झाल्या आहेत. सुदैवाने आमच्या लहानपणीच्या कविता 'खबरदार जर टांच मारुनी' किंवा केशवसुतांची 'सतारीचे बोल' मला स्मार्ट फोनमुळे सहज मिळाल्या आणि त्यानीं त्या कवितांना चांगला प्रतिसाद दिला. त्यांच्या पाठयपुस्तकातल्या इंग्लिश, मराठी आणि हिंदी कविता ती छान म्हणून दाखवतात.

आमच्या मुलीने त्यांच्यासाठी मॅजिक पॉट आणि चंपक ही लहान मुलांची नियतकालिकं चालू केली आहेत. मोबाईलमध्ये बघून अनेक प्रकारची हस्तकला ह्या मुलांनी हस्तगत केली आहे. सदैव नवीन कल्पना विशेषतः प्रकाशच्या डोक्यांत असतात. रिकामा खोका किंवा पुठ्ठा दिसला की कात्री चालवायची सुरवात. मोटारी, एटीएम मशीन अशा अनेक कल्पना त्याच्यापाशी असतात. ज्योतीला आतां वाचनाची आवड निर्माण होत आहे असं वाटतं.

तरी पण अजून बरंच काहीं करायचं राहिलं आहे. सुरवातीला दोन-तीन महिन्यांसाठी स्वीकारलेली ही तडजोड दीड वर्षाहून अधिक लांबली आहे. या तडजोडीमुळें आमचा फायदा किती आणि त्यांचा फायदा किती हा हिशोब मांडावासा वाटत नाही. पण म्हणावसं वाटतं, ‘थँक्स कॉरोना.’

डॉ. मालिनी नाडकर्णी.

माहीम, मुंबई

doctornmalini@yahoo.co.in

+91-9869202986

लोकबिरादरी आश्रमशाळेतील माझे अनुभव

नमस्कार,

मी योगेश मंजू पवार. माझा जन्म हा अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खं, तालुक्यातील शिवरा या छोट्या ग्रामीण खेड्यात झाला. जो समाज शिकार करणे, भीक मागणे, प्लास्टिक विक्री करणे, इ. व्यवसाय करतो, तो समाज म्हणजे फासे पारधी समाज होय. मी लहानपणी वडिलांबरोबर शिकारीला जायचो, तितर, बाटी, ससे, इ. पक्ष्यांची शिकार करायचो. सापडली तर विकायचो, नाहीतर उपाशी राहावं लागत असे. कधी-कधी बाबांसोबत व्यसन(गुटखा, दारू)करायचो. असे आम्ही उदरनिर्वाह करायचो. माझं प्राथमिक शिक्षण गावातच झालं(4थी पर्यंत). नंतर मतीन सरांनी मला खामगाव येथील भैय्युजी महाराज यांच्या आश्रमशाळेत टाकले. मतीन भोसले सरांच्या मदतीमुळे मला व्यसन सोडण्यास मदत झाली. त्यांनी विचारले की, जर आपणच व्यसनाच्या आहारी असलो तर आपला समाज सुधारेल काय? अशा प्रश्नामुळे मी व्यसन बंद केले. तेथे 8वी पर्यंत शिकलो व नंतर प्रश्नचिन्ह आश्रमशाळेत शिकलो. ज्या समाजात शिक्षणाचा गंधही नाही, अशा समाजात नेमकं शिक्षण म्हणजे काय? हे मलाही माहित नव्हतं. तेव्हा माझ्या समाजातील एका तरुणाने फासे पारधी समाजाला सुशिक्षित करण्यासाठी आश्रमशाळेची उभारणी केली. ते तरुण म्हणजे श्री. मतीन भोसले सर होय. त्यांनी प्रश्नचिन्ह आश्रमशाळेचे नाव ठेवले आणि त्यांच्या शाळेत मला घेऊन गेले. तेथे मला माझ्या जीवनाचा टर्निंग पॉईंट(Turning point)मिळाला तो म्हणजे असा की, एक वेळेस मी शाळेतून बाजारात जात असताना, एक दारुड्या माणूस जात होता आणि तो मला कोठे चालला रे पारधळया? असा म्हणाला होता. तेव्हाच मी ठरविलं की मला समाजात वेगळा बदल होण्यासाठी काहीतरी बनणे महत्वाचे आहे. तेव्हा मी अभ्यासाला लागलो. प्रश्नचिन्हच्या शिक्षकांकडून मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. हार्मोनियम वाजविणे, व्हॉलीबाल खेळणे इ. अशा प्रकारे 10वी पर्यंत तिथे शिकलो. याचा फायदा मला पुढे संस्कृतिक कार्यक्रमात झाला. पुढचं शिक्षण घेण्यासाठी मतीन सरांनी डॉ. प्रकाशकाका आमटे यांच्या लोक बिरादरी आश्रमशाळेत, हेमलकसा येथे टाकलं.

हेमलकसा हे माझ्या जीवनातील पहिले स्वर्गनंदन होते, कारण मी कोणत्याच आश्रमशाळेत इतका सुंदर परिसर, इमारत व संयुक्त कुटुंब पद्धतीने राहणारे सदस्य बघितले नव्हते. हे खरंच आहे की डॉ. प्रकाशकाका आमटे, समीक्षाताई, अनिकेत आमटे सर यांचा परिवार समाजातील वंचित घटकांसाठी निरक्षरापासून

साक्षर करण्याचे काम करतात. इतक्या घनदाट जंगलात येऊन ते आदिवासी समाजाला पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत. ते आमच्यासाठी माणसाच्या रूपाने देव आले आहेत. अशा आश्रमशाळेत मला प्रवेश मिळणं, हे माझं भाग्यचं!

शाळेतील पहिला दिवस हा तेथील दिनचर्या समजण्यातच गेला. नंतर तेथील शिक्षकांचा परिचय करून घेतला. त्यांच्याशी जवळीक साधली. मित्रही(विक्रम भोसले,विजय तोप्पा, संजय नरोटी इ.)बनविले. मी पहिल्यांदाच असे शिक्षक बघितले की जे सोप्या पद्धतीने समजून सांगणारे होते. आम्हाला एक प्रकरण सोपवून त्याचे सादरीकरण करण्यासाठी सांगायचे. प्रकरण शिकाविण्याआधी स्वतः त्याविषयी माहिती काढावी लागत असे. मला बऱ्याच विषयांच्या कॅन्सेप्ट समजल्यामुळे मला काही अडचण होत नव्हती. बाकीच्या मित्रांना मात्र येत होत्या. मी वर्गामध्ये जाऊन शिक्षकांसमोर मित्रांच्या अडचणी दूर करायचो. माझा मित्र विक्रम व मी आठवड्याच्या शेवटी सर्व विषयांच्या प्रकरणावर प्रश्न तयार करून प्रश्नमंजुषा खेळायचो. त्यात एका वाक्याच्या प्रश्नांचा अभ्यास होण्यात मदत झाली. त्यासाठी पवार सरांनी पॉकेट डायरी तयार करण्यासाठी सांगितले होते. महत्वाचे मुद्दे त्यात लिहून पाठांतर करायला सांगितले. त्यांच्या सांगण्यामुळे मला अभ्यास करण्यात रस निर्माण झाला. शिक्षक जी. कुलकर्णी (English, राज्यशास्त्र), के. पवार (अर्थाशास्त्र, समाजशास्त्र), चंद्रिकापूरे सर (इतिहास, मराठी) या शिक्षकांच्या मार्गदर्शनाने मी प्रदर्शनामध्ये सहभागी व्हायचो व त्या विषयाची संपूर्ण माहिती मिळवून पाहूण्यांना द्यायचो. आज मी याच शिक्षकांच्या शिकविण्याच्या पद्धतीमूळे 12वी मध्ये 85% गुण मिळवून ST विभागात art stream मध्ये महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळविला आणि शाळेचे नाव लौकिक केले. त्याचबरोबर मी सांस्कृतिक कार्यक्रमात हार्मोनियम वाजवायचो. वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम क्रमांक मिळवायचो. यात मला अधीक्षक श्री अशोक चापले सर यांची सुद्धा मदत झाली. अभ्यासामध्ये काही अडचण असली की मी त्यांना सुद्धा विचारायचो. अशा प्रकारे नंतर पुणे येथील श्यामची आई फॉउंडेशन (SAF) यांच्या करिअर कौन्सिलच्या माध्यमातून मला ध्येय निवडण्यासाठी मदत झाली. नंतर ठरवलं की आपण IAS व्हावं. कारण माझ्या समाजातील लोकांची समजूत आहे की शिक्षण म्हणजे पैसा आणि वेळ वाया घालवणे होय. ही समजूत दूर करायची आहे मला. आता मी याच वाटेने समीक्षाताईंच्या मार्गदर्शनात दीपस्तंभ फाउंडेशन, जळगाव येथे श्री. यजुवेंद्र महाजन सर यांच्या येथे, BA(3rd इयर) + MPSC ची तयारी करत आहे. यात यश मिळाल्यावर मी माझ्या ध्येयाकडे वाटचाल करणार आणि ज्या संस्थेमुळे मी यश गाठणार त्या लोकबिरादरी आश्रमशाळेत जाऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणार. त्यांना कोणत्याही गोष्टीसाठी सहाय्य करणार. त्यासाठी असाच आशीर्वाद आमटे परिवाराचा असो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

आपलाच विद्यार्थी

योगेश पवार
शिवरा, अमरावती
Mo. 9422659308
ympawar871@gmail.com

हरिश्चंद्रगडाकडे जाणारी माणुसकीची वाट

हल्ली ट्रेकिंग म्हंटलं की फक्त सेल्फीसाठी, धिंगाणा घालण्यासाठीच असतात असा समज झालाय पण सुदैवाने माझ्या ट्रेकिंगची सुरुवात आयुष्यात काहीतरी शिकण्यासाठी झाली. खरं तर आयुष्य कसं जगायचं हे मला ह्या ट्रेकने शिकवलं. ह्यातला प्रत्येक अनुभव मी जगलोय आणि तेही आयुष्य जगण्याच्या शिकवणी बरोबरच. तसा आमचा ट्रेकिंग ग्रुप हा इकडून तिकडून ओळखीतूनच झाला. मग त्यातले आम्ही काही लोक एकत्र येऊन ट्रेक करायचो आणि ठरलं हरिश्चंद्रगडला जायचं. मग प्लॅनिंग सुरू झालं त्यानुसार एकाच्या घरी भेटून इंटरनेटवर माहिती गोळा करायला जमलो. हरिश्चंद्रगडावर जायला २ राजमार्ग आहेत त्यातला एक माळशेज घाट संपल्यावर खिरेश्वर गावातून जातो आणि दुसरा इगतपुरीजवळ पाचनई गावातून जातो. पण आम्हाला नवीन मार्गाची माहिती मिळाली. ती म्हणजे नळीची वाट. आता ही गोष्ट आहे साधारण २००५ सालची त्यामुळे तशा इंटरनेटवर अत्यल्प माहितीच्या आधारे आम्ही ठरवलं की जायचं पण नळीच्या वाटेनेच. तयारी सुरू झाली आणि आमच्यातल्या एकाचे वडील ज्यांना ट्रेकिंगचा अनुभव होता त्यांनी त्यांच्या मुलाला नकार दिला. त्याचं ऐकून अजून एक जण नाही म्हणाला. मग त्यांना आम्ही उरलेल्यानी राजमार्गाने गडावर येण्यास राजी केलं. अखेर निघायचा दिवस आला. सगळेच खूप उत्साही होतो कारण हा ट्रेक कठीण आहे हे माहीत होतं आणि आम्ही सगळे अननुभवी होतो पण उडी तर मोठी मारायची ठरवली होती.

दुपारी ३.०० वाजता अहमदनगरला जाणारी बस पकडली. माळशेज घाट सुरू होण्याआधी टोकावडे गावात संध्याकाळी ६.४५ ला उतरलो. बसला उशीर झाला होता त्यामुळे अंधार झाला होता. जवळच्या बॅटऱ्या चालू करून निघणार तेवढ्यात गावातील एका माणसाने विचारलं कुठे जायचंय? आम्ही म्हंटलं की वलहीवरे गावात जायचंय. तो म्हणाला नीट जा रात्रीची वेळ आहे. झालं आमच्यातल्या एकाला आधीच भीती वाटू लागली. मुळात तो काळजी पोटी बोलला कारण अंधारात पायाखालचं दिसत नाही आणि हा रस्ता रोजचा नाही म्हणून तो असं म्हणाला. पण इथे पहिला अनुभव आला की कोण कशासाठी आणि का बोललं ते. काळजीपोटी की मुद्दामहून घाबरवायला हेही आयुष्यात कळायला हवं. मग आम्ही त्याला धन्यवाद काका आम्ही काळजी घेऊ इतकं म्हणून वाट शोधायला लागलो. अर्धा तास चालल्यावर एका झोपडीपाशी आलो. त्या झोपडीत एक म्हातारा मनुष्य काही तरुण मंडळी आणि त्यांची मुलं दिसली. अंगावर फाटके कपडे, घरात कंदील, घरही गवताच्या काड्यांचं असं अठरा विश्व दारिद्र्य तरीही आम्ही आल्यावर आमची विचारपूस करण्याइतकी माणुसकी आणि वाटेत काळजी घ्या असं म्हणणारी माया त्यांच्यात दिसली. ते बघून वाटलं की अर्ध्यातासापूर्वी एक चांगला रस्ता, बस तसंच तिथे लाईट होते, राजकीय पक्षाचे बोर्ड होते पण ह्या इथे इतके दारिद्र्य की जिथे स्वतंत्र्याच्या ६० वर्षांनंतर सुद्धा साधे लाईट, पक्के घर, कपडे आणि अन्न सुद्धा नाही. त्या गरीबीतसुद्धा त्या माणसांनी आम्हाला मार्ग दाखवला पण कसलीही अपेक्षा ठेवली नाही. ना पैशांची ना अन्नाची...... तिथे माणुसकीची श्रीमंती कळली आणि कशी जगायची ती ही कळली. कारण माणुसकी ही पैशात आणि श्रीमंतीत असते असे नाही तर दिलासा देणाऱ्या आणि वाट दाखवणाऱ्या दोन शब्दात असते हे त्यादिवशी मी शिकलो. त्या कुटुंबाला धन्यवाद देऊन

पुढच्या प्रवासाला निघालो. रात्रीची वेळ, आजूबाजूला दाट झाडी, किर्रर्र येणारा रात किड्यांचा आवाज अशा वातावरणात बॅटरीच्या उजेडात आम्ही ६ जण वाट तुडवत चालत होतो. दोन टेकड्या ओलांडल्यावर आमच्यातला पुढे असलेला एकजण म्हणाला अरे तो बघा साप पाण्यावर. आम्ही बाकीचे सावध झालो आणि समोर बघितलं तर संथ वाहणाऱ्या एका छोट्या झऱ्याच्या उथळ पाण्यात दोन फूट लांबी असलेला साप दिसला. लगेच त्याचे डिजिटल कॅमेऱ्यातून आमच्यातील एकाने फोटो काढले. जवळजवळ त्याला बघण्यात अर्धा तास घालवला आणि निघालो पुढच्या प्रवासाला. बरं रात्री वलहीवरे गावातील एका शाळेत वस्ती करायची ठरली होती आणि सोबत व्हेज फ्राईड राईसची पॅकेट्स घेतली होती. तिसरी टेकडी ओलांडल्यावर एका शेताच्या बांधावर पोचलो तेवढ्यात एका झाडावर कोणीतरी बोलत असल्याचं ऐकू आलं. झाडाखाली गेल्यावर बघितलं तर एक वृद्ध जोडपं दिसलं झाडावरच वस्तीला होतं स्वतःच्या शेताची राखण करायला. शेतकऱ्यांचं जीवन खरंच खडतर असतं हे फार जवळून पाहिलं. त्यांचाही निरोप घेऊन पुढे निघालो आणि वलहीवरे गावात पोचलो. थोडं पुढे आल्यावर एक एसटी दिसली. जी वस्तीला होती तिथे. आजूबाजूला चौकशी केल्यावर कळलं की उद्या सकाळी ही एसटी परतीच्या प्रवासाला निघणार. त्या बसजवळ जाऊन पाहिलं तर ज्या कल्याण एसटी स्टँडवर आम्ही अहमदनगर एसटी पकडली त्याच स्टँडवरून ही एसटी थेट ह्या गावात आली होती. म्हणजे आमची ३.३० तासाची जी पायपीट झाली, ती झाली नसती जर आम्ही नीट चौकशी केली असती तर...... एकमेकांकडे आपण कसे मूर्ख बनलो ह्या नजरेने पाहत हसत शाळेजवळ आलो. गावातील मुलं आमच्या आजूबाजूला गंमत बघायला जमा झाली. कारण ते ज्या शाळेत शिकायला यायचे त्या शाळेच्या व्हरांड्यात आमची वस्ती होती.

३.३० तास चालल्यावर मस्त भूक लागली होती मग काय काढली बाहेर राईसची पॅकेट आणि केली सुरुवात. पहिला घास घेताच कळलं की राईस पूर्णपणे आंबलेला आहे. दुपारी बारा वाजता तयार केलेला राईस उकड्यात बाहेर कसा टिकेल पण हे कोणाच्याच लक्षात आले नाही आणि बरोबर घेतलेली २ डझन केळी ज्यांची अवस्था आमच्यासारखी ३.३० तास चालल्यासारखीच झाली होती तीच पोटाचा आधार. पण कोणाकडेच पर्याय नव्हता गावात तशी सोय नव्हती. पण ६ पैकी एकानेही तोंड वाकडं न करता निमूटपणे सगळं स्वीकारलं. आता काय अर्धपोटी झोपण्याची तयारी. सतरंज्या आणि अंगावर घ्यायला चादरी बस्स...... त्या शाळेच्या व्हरांड्यातच झोपी गेलो कारण सकाळी लवकर उठून सगळ्यात अवघड वाट सर

करायची होती. पडल्या पडल्या घोरण्याचे आवाज सुरू झाले पण जास्ती दमल्यामुळे मला झोप येत नव्हती. खरंच ती रात्र वेगळीच भासत होती कारण घरातून निघालो आणि बस मधून उतरल्यापासून घडलेले सगळे प्रसंग डोळयासमोर आले आणि विश्वास बसत नव्हता की आपल्यात नकळत इतका बदल कसा झालाय. सहनशीलता, सर्वांना सांभाळून घेण्याची वृत्ती, त्या घरातील गरीब माणसं ज्यांच्यात हालाकीच्या परिस्थितीसुद्धा असलेली माणुसकी. रस्त्यात पाहिलेला साप पण तो दिसल्यावर त्या सापाला न मारण्याची नकळत आलेली भूतदया आणि माझ्या सवंगड्यांना काही इजा होऊ नये म्हणून असलेली जबाबदारी. खरंच वेगळाच 'मी' अनुभवला होता मी आणि ह्याच विचारात शांत झोप लागली आणि हो तीही मऊ गादी, पंखा, एसी, उशी काहीही नसताना ह्यातच सगळं आलं.

सकाळी लवकर ५ वाजताच उठलो. जाग आली ती गावातल्या कोंबडा अरवण्याने. खरंच असं वातावरण लाखो रुपये मोजून किंवा रात्री लागलेली झोप फाईव्ह स्टार हॉटेलच्या मऊ गादीवर पण मिळणार नाही. हळूहळू उजेडायला लागलं आणि आम्ही मिल्क पावडर, पाण्यात मिसळून मस्त मोठ्या पातेल्यात दूध तयार केलं आणि छान पोहे भिजवून त्यात घातले आणि काय भरपेट असा लहानपणीचा पोषक नाश्ता ‘दुधपोहे’ तयार.

मस्त पोट भरलं आणि निघालो अवघड वाट सर करायला. गावात एक वाटाड्या भेटला त्याला घेतला बरोबर. त्याचं नाव होतं ‘रावण’, हा एक तोंडाचाच होता आणि हो वाट चुकवणारा राक्षस नाही तर माणुसकी जपणारा अतिशय साधा माणूस होता. आम्हाला नळीच्या वाटेच्या तोंडापाशी घेऊन जायचे १०० रुपये ठरले. मग काय वाट चालायला सुरुवात. आधी एका भातशेतीच्या बांधावरून चालू लागलो आणि एका भल्यामोठ्या सुकलेल्या ओढ्यापाशी येऊन थांबलो.

हा रावण आमचा वाटाड्या एक ठिगळं लावलेला आणि धुळीने माखलेल्या शर्ट, लुंगीवर आणि हातात काठी घेऊन आमच्यासोबत चालत होता. पायात चपला नाहीत आणि आम्ही मोठे ट्रेकिंगचे शूज घालून आम्हाला स्वतःला धन्य समजत होतो. पण त्याला अनवाणी पाहून सगळा माजच उतरला. असं वाटलं की खरंच मनुष्याला जगायला नक्की काय लागतं. आपण जगतो ते ऐशो आरामच जीवन आपल्या सर्व आजारांना आणि चिंतेला कारणीभूत आहे हे मला त्यादिवशी प्रकर्षाने जाणवलं. त्या मनुष्याचं आयुष्य जरी खडतर असलं तरी त्याला अतिशय उत्तम आरोग्य त्यामुळे लाभलं होतं.

जंगलात काट्याकुट्याची वाट तुडवत आणि उत्तुंग असा दर्शन देणारा प्रसिद्ध कोकणकडा खुणावत होता आणि तिथे पोचण्यासाठीची उत्सुकता ताणली जात होती.

रावणाने आम्हाला शेवटच्या टप्प्यावर आणून सोडले. आमच्याबरोबर असलेल्या संत्र्यामोसमब्यांचा आस्वाद घेत आणि गप्पा मारून त्याने आम्हाला नळीपाशी म्हणजे दोन डोंगरांमध्ये असणाऱ्या घळीपाशी सोडून तो परतला आणि दिसेनासा झाला. ही नळीची वाट म्हणजे खरी घळच आहे.

तसा हरिश्चंद्रगड माळशेज घाटातील डोंगररांगेत, अहमदनगर, ठाणे आणि पुणे ह्या जिल्ह्यांच्या सीमारेषेवर आहे. माळशेजच्या डोंगरातील खडक अत्यंत ठिसूळ आहे त्यामुळे जशा घाटात दरडी कोसळतात तशाच ह्या घळीतही कोसळतात. त्यामुळे ह्याची रचना सतत बदलत असते. दगड तुटलेल्या अवस्थेत असतात आणि कधी दरड कुठे, किती आकाराची कोसळेल सांगू शकत नाही. एखादा माणसाचा मोठा आवाज सुद्धा दरड डोक्यात पडायला कारणीभूत ठरू शकतो इतक्या धोकादायक वाटेतून आमचा प्रवास सुरु झाला. त्यात आमच्या वाटाड्याने आम्हाला तिथे मोठी माकडे आहेत पण त्यांच्या नादी लागू नका असे सांगितले कारण ते दगडफेक करू शकतात आणि अशा दगडफेकीत एकाचा मृत्य झालेला होता असेही त्याने सांगितले त्यामुळे मोठी आवाहनं असणाऱ्या ह्या वाटेतून आम्ही मार्ग काढत होतो.

वाटेत एक ९० अंशातला आणि २५ फूट उंच असा रॉक पॅच लागला आणि रोपच्या साहाय्याने आम्ही तो सर केला. रोप लावण्यासाठी मी आणि माझा एक सहकारी ज्यांना अशा चढाईचा अनुभव होता आम्ही आधी वर चढलो आणि मी आणखीन वर जाऊन रोप एका झाडाला बांधला जेणेकरून बाकीचे लोक वर येऊ शकतील. पण त्या झाडाला रोप बांधताना वर लक्ष गेलं तर बघून अंगावर काटा आला. एका टेम्पोएवढा मोठा दगड निखळून पडला होता आणि तो फक्त एका नारळाएवढ्या लहान दगडावर थांबलेला होता म्हणजे घळीत उतार असल्याने जर हा लहान दगड बाजूला झाला तर हा मोठ्या दगडाच्या वाटेत जे येईल त्याचा चेंदामेंदा करून हा दरीत जाणार. ही कल्पना करून माझे हात थरथरत होते. मी ही गोष्ट बाकीच्यांना सांगितली आणि इथून पटापट निघण्याचा सल्ला दिला. अजिबात आवाज न करता पटापट आम्ही ह्या दगडाच्या बाजूने वर निघून गेलो.

ह्या परिस्थितीत आम्ही सगळेच तणाव अनुभवत होतो म्हणून मधेच मी बोललो की आपल्यात पूरणपोळया कोणाच्या बॅगेत आहेत.

एक म्हणाला माझ्या आहेत. म्हंटलं अरे ह्याला सांभाळा रे कारण वर पोचल्यावर पोळया हव्यात भले हा आला नाही तरी चालेल पण पोळया आल्याच पाहिजेत. हे म्हणताच हशा पिकला आणि जरा तणाव कमी झाला. पण तेव्हा खरंच प्रत्येक जण माझा होता आणि स्वतःपेक्षा त्यांची जास्त काळजी आणि जबाबदारी माझ्यावर आहे हे स्वतःहून मन सांगत होतं. हा विनोद करण्याची बुद्धी कशी झाली आणि हे सुचलं कसं काय माहीत. खरंच फार मोठा बदल होता स्वतःमध्ये. नाहीतर इतरवेळी फक्त स्वतःचा येणारा विचार आज बरोबर असणाऱ्या प्रत्येकाचा होता. ह्या सगळया तणावाचा परिणाम असा होता की तहान खूप लागत होती आणि त्यामुळे बरोबर असलेले पाणी जास्त प्यायले जात होते. पण उद्दिष्ट डोळयासमोर होतं की ही वाट पार करून यशस्वी चढाई करायचीच.

मन निश्चय करायचं प्रत्येकाचं आणि जरा बळ यायचं शरीरात कारण आतून प्रत्येक जण हा विचार करत होता की कधी एकदा संपते ही घळ आणि एकदाचे पोचतोय माथ्यावर. पुढे पाय टाकत शेवटी ही घळ संपली पण अजून एक २० फूट खडी चढाई समोर आली आणि काळजात धस्स झालं. ही चढाई किंवा पॅच आधीपेक्षा कठीण होता कारण इथे भुसभुशीत माती होती आणि कोणाचाही पाय टिकत नव्हता.

आधी प्रमाणेच मी आणि माझा साथीदार आधी चढणार होतो. आधी मी प्रयत्न करायला लागलो पण घसरत होतो. माझ्या साथीदाराने प्रयत्न केले तरीही नाही जमले. ह्यात खूप वेळ, मेहनत वाया गेली आणि जवळचे पाणीही संपले. शेवटी माझ्या हातांवर जोर देऊन कसाबसा साथीदाराला वर चढवलं आणि मग मी ही तसाच हात आणि पाय मातीत घसपटत चढलो आणि रोप लावून बाकीच्या लोकांना वर घेतलं. झालं सुटलो असं वाटलं तोच आणखीन वर चढाई आहे असं कळलं कारण माथा दिसतच नव्हता. एक क्षण धीर सुटला आणि असं वाटलं की नक्की हाच रस्ता आहे ना! का चुकलो? एकाने तर सरळ उपदेश दिला चला परत असेच खाली जाऊ. पण ते ही शक्य नव्हतं कारण ५.३० झाले होते संध्याकाळचे म्हणजे अर्ध्या तासात अंधार होणार होता आणि आमच्याकडे जेवण होतं जे रात्रीसाठी घेतलं होतं तेच वर गडावर राजमार्गाने पोचलेल्या दोघांसाठी होतं आणि ते ही टेन्शन मध्ये वाट बघत बसले होते. पण सगळेच हतबल होते कारण तिथे मोबाईलला रेंज देखील येत नाही. त्यामुळे धड ना वर धड ना खाली अशा स्थितीत होतो. एक वेळ अशी आली की मन म्हणालं कर अजून शहाणपणा ट्रेकिंगचा. पण घटकेत मनात आलं आता जे होईल ते होईल पण वर पोचायचच. निघालो तसेच ती निसरडी माती आणि ठिसूळ दगड मागे टाकत चढलो. जवळजवळ आम्हाला हा टप्पा पार करण्यात एक तास गेला. वर पोचल्यावर एक पठार लागलं आम्हाला माहीत असल्याप्रमाणे ही वाट कोकणकड्यावर जाते, तिथून पुढे मंदिरात आणि गुहेत जायचा मार्ग आम्हाला सगळ्यांना पाठ होता. पण ह्या पठारावर आलो आणि कोकणकडा दिसलाच नाही. अक्षरशः अवसान गळलं आमचं. समोर सूर्य अस्ताला गेलेला आणि पाणी संपलेलं त्यात मी लघवी केली तर तिचा रंग लाल होता आणि हे सांगितल्यावर प्रत्येक जण टेन्शन मध्ये आला की मला काही होत तर नाहीये ना? पण मी धीर दिला आणि म्हंटलं ठीक आहे घाबरायचं नाही आपण इतके ट्रेक केलेत ह्या अशा गोष्टी होतंच असतात. हे आपण गृहीत धरायलाच हवं. एक काम करा प्रत्येक दिशेला एक एक जण जाऊयात आणि पाहूया की कुठे खूण आहे किंवा काही रस्ता सापडतोय का ते. त्यात सगळ्यांनी एक काम करा पाणीही शोधा कारण जर इथेच रात्र काढायची वेळ आली तर आपल्याला पाणी हवंच. असे म्हणून आम्ही सुटलो. थोडं पुढे गेल्यावर संधी प्रकाशात चमकणारा कोकणकड्याच्या काळा कातळ मला दिसला. मी जोरजोरात ओरडायला लागलो, उड्या मारायला लागलो. आशेचा किरण दिसला. तेवढ्यात अजून एक आवाज आला अरे पाणी सापडलं बघ इथे. स्वच्छ झरा आहे पाण्याचा. आमचं असं झालं होतं की दिवाळी आणि वर्षाअखेरचा बोनस एकाचवेळी मिळाला होता. सगळे धावत पाण्यापाशी गेलो आणि एकमेकांना मिठ्या मारल्या. पाण्याच्या बाटल्या भरून वेड्यासारखं पाणी प्यायलं आणि डोक्यावरून पाणी ओतून आधी शांत झालो. खूप मोठं यश मिळालं होतं आम्हाला. मग कोकणकड्यावर जायची वाट शोधायला लागलो आणि समोर मोठा डोंगर पहिला झालं पुन्हा निराशेचे ढग दाटून आले. अरे हा ओलांडायचा कसा आता? सगळेच बोललो एकमेकांना. तरी म्हंटलं बघू तर वाट सापडते का? मग काट्याकुट्याची वाट तुडवत २५ फूट कसेबसे चढलो बॅटरीच्या प्रकाशात आणि शेवटी १५ फुटांचा सुकलेला धबधबा लागला. उभा काळा कातळ ज्यावरून चढणार कसे? पुन्हा तेच केले हातावर पाय ठेवून एकाला चढवलं वर. कसाबसा तो वर गेला आणि वेड्यासारखा ओरडायला लागला. कारण त्याच्या समोर कोकणकडा होता. त्याचा आनंद पाहून आम्हीही काहीही न बघता कसेबसे वर चढलो आणि कोकणकडा बघून अक्षरशः वेड्यासारखे नाचलो. शिवाजी महाराजांचा विजय असो...... जय भवानी जय शिवाजी........ चा जयघोष केला आणि कोकणकड्यावर १० मिनिटं शांत बसून, एकमेकांना मिठ्या मारत, टाळ्या वाजवत, शिट्या मारत आनंद साजरा केला. पुढचा गुहेच्या दिशेने जाणारा रस्ता माहीत असल्याने मी पुढे आणि माझा सहकारी

सगळ्यात मागे असे ६ जण किल्ला सर करून पोहोचत होतो. तेवढ्यात आधीपासूनच पोहोचलेल्या माझ्या सहकार्याने माझा आवाज लांबून ऐकला आणि वेड्यासारखा ओरडत माझ्याकडे आला आणि मला गच्च मिठी मारली. अरे कुठे होतात तुम्ही, तुम्हाला कसं गाठायचं, तुम्हाला काही झालं असतं तर? इतके प्रश्न विचारून भंडावून सोडलं. त्याची चिंता साहजिक होती कारण त्यांच्याकडेही जेवण नव्हतं आणि आमची चिंता परत अख्ख्या गडावर ते दोघेच होते त्यात आम्ही पोचलो नसतो तर दोघेच उपाशी गडावर असते. रात्र अशा ठिकाणी काढणं अतिशय कठीण असतं. पण आम्ही जिंकलो होतो. घेतलेली जबाबदारी पेलली होती आणि सुखरूप सर्वजण पोचलो होतो. अवघड नळीची वाट सर केली होती. जग जिंकल्याचा आनंद झाला होता. आजही त्या प्रसंगातील प्रत्येक क्षण मी अनुभवतो. ह्या वाटेने मला माणुसकीची वाट दाखवली हे मात्र नक्की...................

गौरव पाटील
डोंबिवली, ठाणे
gauravpatil2000@gmail.com
+91-9619537136

“आपल्या समर्थकांनाही नेतृत्वकला शिकवतो तोच खरा नेता.”

-डॉ.प्रकाश आमटे

लोकबिरादरी प्रकल्पामुळे मिळाले नवजीवन

नाव-: झोला डोलू मिच्चा
वय-:58 वर्ष
गाव-: कुक्कामेटा, व्यवसाय-: शेती

प्र.१- तुमच्या लहानपणी भामरागड तालुक्याची किंवा तुमच्या गावाची स्थिती कशी होती?

झोला-: आमच्या लहानपणी फक्त माडीया व गोंडी बोलायचे. तेव्हा आतासारखे रस्ते नव्हते. वाहनं आजच्यासारखी नव्हती. केवळ बांबूचे ट्रक तेवढे दिसायचे. या भागातील बांबू बल्लारपूर पेपरमिलसाठी ट्रकने जायचा. आम्ही कधी आलापल्लीला याच बांबू ट्रकने जायचे. पाऊस पडला की, शेतात धान्य फेकायचे (पेरायचे) फक्त कधी-कधी शेणखताचा वापर करायचा. आजच्यासारखे रासायनिक खते त्याकाळी वापरलो नाही, त्यामुळे उत्पादन कमी असायचे. जेवढे उगवेल तेवढ्यावरच खुष होतो. त्यावेळी वीजसुद्धा नव्हती. रात्रीच्या वेळी शेकोटी (लाकडे पेटवून केलेली आहुटी) हीच अंधार दूर करण्याचा आधार होती. घनदाट जंगल होते. जंगलात विविध प्रकारचे प्राणी होते.

प्र.२-: तेव्हाच्या स्थितीत व आता काय बदल जाणवतो?

झोला-: आता तर खुपच बदल झालेला आहे. माडीयासोबत मराठी बोलता येते. बरेच लोक हिंदीत बोलतात. लाहेरीपर्यंत डांबरी रस्ते झाले. मोटारगाड्या वाढल्या. एस.टी.च्या बसेस सुरू झाल्या. एका दिवसात गडचिरोली या जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन काम करुन परत येणे होते. दुचाकी वाहने तर आज घराघरांत झालेली आहेत. भामरागडला तालुक्याच्या ठिकाणी गर्दी वाढली. अनेक मालांची दुकाने झाली. आज शेती बरेच जण आधुनिक पद्धतीने करतात. शेताची नांगरणी करून रोवणी करण्याची पद्धत रुढ झाली. गावागावात ट्रॅक्टर आहेत. ट्रॅक्टरने शेती केली जात आहे.युरिया, सल्फेट सारखी खते वापरतो. त्यामुळे उत्पादन वाढले आहे. वीजही आली. मात्र जंगल व जंगली प्राणी झपाट्याने कमी होऊ लागले आहेत, याचे वाईट वाटते.

प्र.३.तुमच्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग कोणता? सविस्तर सांगा.

झोला-: मी २०/२२ वर्षांचा असेन. माझे लग्न होऊन एखादा वर्ष झाल असेल. मला राहण्यासाठी झोपडी बनवायची होती, त्यामुळे गावच्या जंगलात शेताजवळ वासे (झोपडी बांधकामांचे लाकडे) तोडण्यासाठी गेलो ह़ोतो. वासे तोडत असताना अचानक अस्वलाने माझ्यावर हल्ला केला. मी खाली पडलो. अस्वल मला नखांनी ओरबाडू लागलं व चावा घेऊ लागलं. मी सुटण्यासाठी धडपडू लागलो. जोरजोरात ओरडू लागलो. अस्वलपण जोरात ओरडल. माझा उजवा डोळा व चेहरा नख व दातांनी अस्वलाने फोडून काढला. माझ्या डोक्याची पुर्ण कवटीच काढणार, मी संपणार, या विचारात असतानाच आजूबाजूचे लोक माझे व अस्वलाचे ओरडणे ऐकून धावून आले. त्यामुळे अस्वल पळाले. मी रक्तबंबाळ अवस्थेत पडून होतो. लगेच गावकऱ्यांनी मला खाटेवर टाकून लोकबिरादरी प्रकल्पाच्या दवाखान्यात उपचारांसाठी दाखल केले.

प्र.४-: लोकबिरादरी प्रकल्पाबद्दल आपल्याला काय वाटते?

झोला-: लोकबिरादरी प्रकल्पाचा दवाखाना होता म्हणून मी वाचलो. मला नवजीवन मिळाले. कारण त्यावेळी प्रकल्पाच्या दवाखान्याव्यतिरिक्त दुसरे दवाखाने नव्हते. मी प्रकल्पाच्या दवाखान्यात जवळपास महिनाभर होतो. प्रकाशभाऊंनी मला वाचविले. अस्वलाच्या हल्ल्यात एक डोळा निकामी झाला; पण दवाखान्यामुळे माझा जीव वाचला. त्यावेळी प्रकाशभाऊ स्वतः माझा रक्ताळलेला चेहरा साफ करुन पट्टी बांधायचे. औषध-गोळया वेळेवर व नियमित द्यायचे. माझी आस्थेने विचारपूस करायचे. पुर्ण जखमा भरेपर्यंत मी तिथे होतो. यामुळे लोकबिरादरी प्रकल्प आणि प्रकाशभाऊंबद्दल माझ्या मनात प्रचंड आदर आहे.

प्र.५-: लोकबिरादरी प्रकल्प सुरुवातीस कसा सुरु झाला? सुविधा कशा होत्या? आठवून सांगा.

झोला-: प्रकल्प कसा सुरु झाला याबद्दल आठवत नाही; मात्र सुरुवातीला आजच्यासारख्या इमारती नव्हत्या. सुरुवातीला दवाखान्यासाठी एक लहान झोपडीसारखे घर वडाच्या झाडाजवळ होते. मला वाटते प्रकाशभाऊ व मंदावहिनी तिथे राहायचे. बाहेर वडाच्या झाडाखाली रुग्णांना तपासून औषध-गोळ्या द्यायचे. झाडापलीकडे काही कुडाच्या झोपड्या होत्या.नंतर एक-एक घर बनत गेले.त्या नंतर अनेक खोल्यांचे रुग्णालय बनविले.आता तर खुप मोठी इमारत उभी आहे.

प्र.६-: भविष्यात लोकबिरादरी प्रकल्पाकडून काय अपेक्षा आहेत?

झोला-: लोकबिरादरी प्रकल्पाचे सेवाकार्य महान आहे. दवाखाना, शाळा, शेतीबद्दल मार्गदर्शन, गावागावात तलाव निर्मिती, हातपंप दुरुस्ती, लोकांच्या भांडणाचे न्यायनिवाडे, आदीवासी शेतकऱ्यांसाठी सहलीचे आयोजन, जंगल वाचविण्याची धडपड इत्यादी कार्य आम्ही पाहत आहोत. हे सर्व कार्य अविरत सुरू राहावेत अशी अपेक्षा आहे.

प्र.७-: प्रकल्पातील विविध सेवांचा लाभ तुम्हाला व कुटुंबियांना काय व कसा झाला?

झोला-: मी अगोदर सांगितल्याप्रमाणे अस्वलाच्या हल्ल्यानंतर मला नवजीवन या प्रकल्पामुळेच मिळाले. आजसुद्धा मी अथवा कुटुंबातील सदस्य आजारी झाल्यास आम्ही प्रकल्पाच्या दवाखान्याकडेच धाव घेतो. गावातील अनेक मुली-मुले प्रकल्पातील आश्रम शाळेत शिकत आहेत.

प्र.८-: डॉ.प्रकाशभाऊ व मंदावहिनी यांचेशी तुम्ही हल्ली कधी बोललात काय? कोणत्या विषयांवर बोलणे झाले?

झोला-: प्रकाशभाऊ कधी दिसल्यास मी नमस्कार करतो. ते तब्बेतीची विचारपूस करतात. शेतीबद्दल विचारतात. कधी अस्वलाचा विषय निघतो. मंदावहिनींशी बोलणे होत नाही.

प्र.९-: डॉ.प्रकाशभाऊ व मंदावहिनींबद्दल तुम्हाला काय वाटते?

झोला-: त्यांच्याबद्दल मनात फार आदर आहे. त्यांचे आरोग्य उत्तम राहावे, ते दिर्घायुषी राहोत हीच मनात भावना आहे.

प्र.१०-: ४०/५० वर्षांपूर्वी प्राण्यांची शिकार कशी केली जायची? आता शिकार करता का?

झोला-: पूर्वी आम्ही गावातील सर्वजण मिळून शिकार करायचे. दोन-चार जाळे घेऊन जंगलात एका बाजूस लावायचे. दुसऱ्या बाजूने गोंगाट करीत प्राण्यांना हाकलायचे. प्राणी भितीने पळत सुटायचा व जाळ्यात जाऊन फसायचा. त्यानंतर भाले, काठ्यांनी आम्ही सगळे त्याला मारायचो.अशी शिकार करुन कापून त्याच्या मांसाच्या तुकड्यांचे हिस्से करून प्रत्येक सहभागी सदस्याला द्यायचे. आता मात्र आम्ही शिकार करीत नाही. प्राणीही कमी झालेत.

प्र.११-: जंगल व जंगली प्राण्यांबद्दल आज तुम्हाला काय वाटते?

झोला-: खरंच जंगल वाचवायला पाहिजे. जंगलामुळे पाऊस पडतो हे आम्हाला कळायला लागले आहे.पूर्वी स्वयंपाकाच्या सरपणासाठी व शेतीसाठी झाडांची कत्तल केली जायची. आता घरोघरी गॅस आल्याने व पेसा कायद्यामुळे जंगलतोड पूर्वीसारखी होत नाही ही जमेची बाजू आहे. शिक्षण व जागृतीमुळे आजची पिढी जंगली प्राण्यांची शिकार करीत नाही, हे फार महत्त्वाचे व चांगले आहे.जंगल व जंगली प्राणी वाचले पाहिजे असे मला मनापासून वाटते.

प्र.१२-: तुमच्या गावातील पाण्याचे स्त्रोत कोणते आहेत?

झोला-: आमच्या गावात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सौरऊर्जेवरील नळयोजना आहे.काही हातपंप (कूपनलिका) आहेत. येथील पाणी पिण्यासाठी व इतर कामांसाठी वापरतो. जवळच पामुलगौतमी नदी आहे. येथील पाणी गायी-गुरांना पिण्यासाठी उपयोगी आहे.

प्र.१३-: ' पाणी अडवा, पाणी जिरवा ' हा उपक्रम कधी केलाय का?

झोला-:नाही, मात्र गावात काही मोजक्या लोकांकडे शेततळे, बोड्या (छोटे तलाव) आहेत तेथील पाण्याचा वापर थोड्याफार प्रमाणात त्यांच्या शेतीला होते.मात्र सिंचनासाठी अजुन मोठ्या तलावांची गरज आहे.

मुलाखतकार आणि शब्दांकन
लीलाधर कसारे
liladharmohan@gmail.com
+91- 9421729386

“Happiness is a continuous
Creative activity of imaginatively
Comparing your experiences
To things that aren't as good and thereby
feeling happy and grateful.”
-Baba Amte

काव्यसुमन



"सुखेच माझी मला बोचती
साहसास मम सीमा नसते
नवीन क्षितिजे सदा खुणावती
दूर दाट निबिडात मांडला
पुन्हा मी नवा डाव."

- बाबा आमटे, ज्वाला आणि फुले

जिद्द

अनमोल लखलखता तारा भू-वरी अवतरला
लाखो पिडीतांचे भविष्य सुसह्य करून गेला ॥१॥

महारोग्यांची सेवा करूनी आनंदवन उभारले
बहु कष्टाने स्वर्गीय नंदनवन हेमलकसी फुलवले ॥२॥

अनेक कष्टकरी वंचीतांची रिकामी झोळी भरूनी
जगण्याची नवी नवी दालने दिली साध्य करूनी ॥३॥

दाही दिशेला श्रमीकांना, श्रमदानाचा हात देऊनी
घेतले कवेत एकेकाला वात्सल्याने सामावुनी ॥४॥

स्वबळावरी विविध कलांचे प्रशिक्षण शिकवुनी
बाहु मधल्या दिव्यत्वाची दिली जाणीव करूनी ॥५॥

शाळा, दवाखाने प्राण्यांचे अनाथालय काढुनी
गरजूंना रोजगार देऊनी, केले सक्षम जीवनी ॥६॥

साधनेच्या साथीने अनमोल कार्य हाती घेऊनी
जीवाभावाचे लाडके रक्षणकर्ते झाले, बाबा होऊनी ॥७॥

साधना करत, ध्येय्यापासून कधी न दूर पळाले
उतू-मातू न देता,घेतला वसा नेटाने नेत राहीले ॥ ८॥

घेतले आशिष सकलांचे ओंजळ भर भरूनी
कृतकृत्य होऊन, अनंतात विलीन झाले तृप्तीने ॥९॥

पुण्यात्माचे स्मरण कोरले काळाच्या पाटीवरी
विश्वासाची थाप, अजूनही साऱ्यांच्या पाठीवरी ॥१०॥

नीला पाटणकर
शिकागो , अमेरिका
patankarneela@gmail.com

जोहार

लेखन प्रकार- काव्य (गज़ल)

आजन्म वाटले मी, सुख हे कुणाकुणाशी..
आयुष्य मोजतो मी, आता कणांप्रमाणे....!

मी साद घातली जी, जाणे कुठेच विरली..
प्रतिसाद हाय नाही, आता मनाप्रमाणे....!

मी काय चूक केली? क्षण एक स्तब्ध नाही..
मन मारुनिच जगलो, अवघ्या जनांप्रमाणे....!

मी दंश सोसलेले, सारेच बाद झाले..
आधार विष वाटे, ते कालच्याप्रमाणे....!

आता नकोच काही, काहीच हाव नाही..
'जोहार' आज झाला, अंधारल्याप्रमाणे....!

प्रणव. ज. तडवळकर
पुणे
pranav7387813677@gmail.com
+91-7387813677.

कोरोना योद्धा....

(कोरोना मरीजोका इलाज करते हुये शहीद हुये डॉक्टरकी कहानी)

रोती-सिसकती बिवी को
घर अकेला छोड आया हूँ।
कोरोना योद्धा बनकर अपना
फर्ज निभाने आया हूँ ।

कहती रही मेरी बुढी माँ
मत जा मेरे बेटे तू,
सिरहाने बैठकर प्यार से
उसे समजाकर आया हूँ।

वो नन्हीसी गुड़ियाँ मेरी
आकर झटसे लिपट गई,
खिलोने, मिठाई, चुडियो का,
उसे वादा करके आया हूँ।

कोरोनासे बाधित मरिजो का
दर्द मैं कैसे बयाँ करू,
हौसला खोये मरिजो को
जीवनदान देणे आया हूँ।

महामारिके इस संकटमे
है कसोटी मेरे ज्ञानकी,
हमे भगवान समझने वालोका
भरोसा जितने आया हूँ।

लगा रहा रात-दिन सेवामें
और स्वस्थ किया कितनों को मैंने,
पर ना जाने कब और कैसे
कोरोंनासे हारकर आया हूँ।

लडते लडते कोरोनासे
मैने अंतीम साँस भलेही ली,
बनकर कोरोना योद्धा फिर भी
देशसेवा करके आया हूँ।

डॉ.संतोष संभाजी डाखरे
राजे विश्वेश्वरराव कला वाणिज्य महा.भामरागड
santoshdakhare15@gmail.com
मोबा. 8275291596

राहून गेलं?

जगण्यात तर गुंतून राहिलो
गुंता सोडवणं तेवढं राहून गेलं!
श्वास घेतांना लांब श्वास घेतो
देणाऱ्या निसर्गाला जपणं राहून गेलं!
पाणी आद्य अन् शेवटही
मातीत मुरवणं तेवढं राहून गेलं!
किती रे गोंगाट तो नात्याचा
मुकाट साथ देणं राहून गेलं!
देव जपतांना जिवापार जपला
माणूस म्हणून जगणं राहून गेलं!
दिलं तेवढं गिळून घेतलं
परत करणं तेवढं राहून गेलं!
ही वेळ कशी तरी निघूनच जाईल
शिकणं नाही का अजून राहून गेलं?

प्रशांत आशा केळकर
+91- 9673883633
prashantkelkar21@gmail.com

प्रकाशपुष्प

असो समानता ।। जपु मानवता।।
राहो नैतिकता।। ह्रदयात।। १।।

असे आचरण।। आहे तुम्हा अंगी।।
तोची झाले जगी।। नाव दाता।। २।।

हे हेमलकसा।। आदिवासीयांचे।।
उद्धार तयाचे।। केले तुम्ही।। ३।।

टाकण्या प्रकाश।। संगे मंदाताई।।
पोरक्यांची।। अनाथांची आई।। ४।।

वाहिले आयुष्य।। केली रुग्णसेवा।।
नाही लोभ देवा।। आपणास।। ५।।

खरे वैद्य तुम्ही।। आता झाला धंदा।।
होतील शर्मिंदा।। बाकी वैद्य।। ६।।

प्राणी मात्रा सारे।। खेळवी अंगावर।।
तुम्हा जनावर।। सोयरेच।। ७।।

शोधीतो माणूस।। भेटला तुम्हांत।।
देव माणसात।। देखीयेला।। ८।।

आशीर्वाद पाठी।। नेहमी बाबांचा।।
निर्धार तयांचा।। पुरा केला।। ९।।

द्यावी येथे भेट।। होते चित्त शांत।।
येतो माणसात।। दानवही।। १०।।

लिहिण्यास पडे।। आभाळही कमी।।
काय वर्णु मी।। ते शब्दांत।। ११।।

घ्यावे गोड तुम्ही।। काव्य माझे देवा ।।
शब्द हिच सेवा।। अमीत ची।। १२।

अमित भांडे,
अंजनगाव सुर्जी
mr.amitbhande@gmail.com
+91-9764710742

स्त्रीवाद

सौंदर्याचे प्रतीक तू
ममतेचा सागर तू ,
सहनशक्तीची देवी तू
अपार कष्ट करणारी तू ||
समाजाचा अविभाज्य घटक तू .

तू पुरुषाला जन्म दिला
पुरुषाने तुझा बाजार केला ,
काहींच्या देव्हाऱ्यात स्थान तुला
काहींच्या वाईट नजरेने घेरले तुला ||
समाजाचा अविभाज्य घटक तू .

स्त्रीच्या विषम स्थानाविरुद्ध जे झटले
ते स्वामी विवेकानंद आणि महात्मा फुले ,
या थोरपुरुषांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवू
आणि स्त्रीला प्रेमाने आदराने वागवू ||
समाजाचा अविभाज्य घटक तू .

मयुर हणमंत माने,
बोरिवली (मुंबई)
+91-9969458505
mayur.mane203@gmail.com

दे मला......

(या महाकार्याला आणी हेमलकसा येथील सेवेला द्यायला माझी खारीची ओंजळ. दंडवत, वंदन म्हणून. माणसे हिमालयासारखी जगणं सांगून जातात)

दे मला त्या कामनेची
जळती मशाल दे
हृदयातूनी वाहो करुणा
अंबरा तुझे बाहू विशाल दे

पीडेची तमा दे
भयमुक्त क्षमा दे
मानव्य पांघरुनी
दृष्टी अपार दे



जन्मता अबोध होतो
मृत्यूला जाणीव दे
एक ज्योत आलो येथे
प्रकाशाचे तेज दे

दे मला अगाध माया
माणसाची किनार दे
जन्मास वंदतो मी
सेवेची मज आच दे

अनंत चक्षु अक्षय दे
लक्ष चांदण्यांचा संभार दे
दे मला त्या कामनेची
जळती मशाल दे

हृदयातूनी वाहो करुणा
अंबरा तुझे बाहू विशाल दे

संगीता शेंबेकर
मुंबई
sangeetashembekar@gmail.com

वात्सल्य झरा

अखंड वाहतो झरा वात्सल्याचा
आई सोबत असताना
भर उन्हातही छाया असते
तूझ्या पदराखाली बसताना..

सारखी शोधते नजर तुलाच
तू समोर नसताना
आठवणीने जळते मन
तू जवळ नसताना..

आशीर्वाद तर असतो तुझा
मार्ग मजला दाखवताना
स्वर्गच अनुभवला मी
तुझा वात्सल्याचा झरा वाहताना...

कर्तव्याला जपणार मी
तुझी आधार काठी होताना
हे भाग्य मजला लाभू दे
शेवटी जग सोडून जाताना..

अश्लेष माडे (प्रीत)
जी. गोंदिया, महाराष्ट्र
+91-9552290409
ashleshmade04@gmail.com

समाजसेवक...

थोर समाजसेवक बाबा आमटे
यांच्या पुण्याईने हेमलकसा प्रबळ आणि प्रसन्न आहे||

जे होते कुष्ठरोगाने पिडीत त्यांना दिली आपुलकी आणि माया
कुष्ठरोग पिडीतांना समाजाने दिला धुत्कार पण बाबांनी केले त्यांचे रक्षण||

बाबा आमटेंच्या अंगणात पेटले दोन नवे दीपक, विकास आणि प्रकाश
ह्या दोन नव्या ज्योती विकासाच्या मार्गावर प्रकाशित होवून निघाल्या
ह्या ज्योतींना मिळाली जीवन साथीची जोड, केले स्वतःला समाजार्पण||

या दुर्गम भागातील लोकांना दाखविले काय असतो जगण्याचा मार्ग
दिला त्यांच्या भविष्याला वेग, उजळवले त्यांचे जीवन||

हेमलकसाच्या द्वारावर एक नवी पाहाट उगवली
गावातल्या गावातल्या घरांवर एक प्रसन्नतेचा सुगंध पसरवला||

प्रकाश मंदाकिनी यांनी झिजवल स्वतःला या समाजाच्या सेवेत
आणल इथल्या लोकांना मूळ प्रवाहात||

हातात शस्त्र नव्हत कि डोळयात राग नव्हता
पण केली जंगली प्राण्यांची प्रेमळ सवारी||

आम्हा विद्यार्थ्यांना मिळाला शिक्षणाचा प्रेमळ वसा त्यांच्या कार्याच्या जिद्दीने
ज्ञानाच्या प्रकाशाने समाजाला प्रकाशित करण्याचा मिळाला आम्हाला वारसा||

मोनिका बापु बदकू (वय 17 वर्षे)
दामरंचा , गडचिरोली, महाराष्ट्र
+91-94236 18407

Department wise Annual Report.



Health Care

- ✓ **Village Meetings:** Because of lockdown, it was not possible to go to every village, so meetings were held with people in certain villages, especially in gram panchayats, every health problem faced by the people was discussed and remedies were suggested. Proper precautions were taken at the time of the meeting and social distancing rules were properly followed.
  In the meetings reasons for the spread of diseases like malaria, the cleanliness of the village, and misconceptions of the people about corona were discussed.

- ✓ **Awareness about Vaccination** Since last year, we all have been going through a period of the global pandemic, covid-19. From the beginning, Lok Biradari Project Hospital has stood firm against this pandemic. Last year Lok Biradari Project Hospital had raised awareness about the disease Covid-19 and this year, the information about the vaccination campaign launched by the Government of India was given to every village in Bhamragad taluka. Information about the vaccine was given and misconceptions were dispelled. The program was implemented in the total of 28 villages in Bhamragad area.

- **Awareness Programme:** Due to the lockdown, young boys and girls who went in the cities or other states for work and education have returned to the village. To create awareness about the growing risk of teenage pregnancy, we created videos and audios on these topics and briefed teenagers by showing them on big screens in public places during public processions and festivals in villages. It also provided information on family planning and sexually transmitted diseases for men and women. Condoms and contraceptive vaginal tablets were made available to them.

- **SHAPE (School Health Awareness Programme):** We have been running SHAPE for the last Six years to create awareness amongst students about hygiene, adolescent health and de-addiction control. In the beginning of 2021, the schools were started for a limited period of time, during that time we implemented the program with the permission of all higher authorities. The program was implemented in a total no. of 16 schools included oral examination and eye examination of the students. The attendance of children was lower than every year.

Awareness about teenage pregnancy, STD and use of contraception

Oral examination, information about oral hygine and addiction.

✓ **Immunization Awareness Camp** – There was a growing misunderstanding and fear about the Corona disease and also about vaccination against Covid amongst people in remote areas. Government's vaccination campaign was launched, but people did not respond due to increasing prevalence and growing misconceptions. We made informative videos, audios and forwarded it wherever possible to dispel the rumors about vaccinations.

Our team went from village to village in the Bhamragad area to make people aware of vaccination by playing audio in vehicle. People responded more positively to vaccination as a result. Due to Bhamragad's remote location, it was difficult for people to come for vaccinations and many other things contributed to this, such as the misunderstanding about vaccination drive. The community hospital started vaccinating people using the trust they've established. The taluka health system made it easier to do so.

Education

- Dr. Sanjiv Kumar, Div. Commissioner, Nagpur visited on 3rd, January 2021. He discussed progress of tribal students and suggested some measures.

- Republic day flag hoisting was done by Mrs. Manjiri Paranjape, Social worker, writer, Pune, Maharashtra.

- On the occasion of 13th death anniversary of Baba Amte on 9th February 2021, an essay and drawing competition was organized for the students on the topic-life of Baba Amte.

- मराठी भाषा दिवस and National science day was celebrated on 27-28th February 2021. Posters were made on the life and works of well-known scientists. Students recited poems of well-known Marathi poets.

- Due to Geographical location, Melghat and Gadchiroli region has always experienced acute shortage of trained, professional medical staff. Instead of relying on others, local community children should come forward and serve their own people. With this vision director of Lok Biradari Ashram school, Samiksha tai started free coaching of NEET exam along with free lodging and boarding. Students were selected on the basis of their backward socio-economic conditions and academics.

- Due to pandemic, SSC and HSC results were declared on the basis of internal assessment. Both results were 100%.

- To promote local, highly nutritious super foods like Horse gram(कुळीथ), leafy forest vegetables(पावसाळी रानभाज्या), Ragi(नाचणी) and seasonal fruit mango, food festival 'Biradari's Nutri Treat' was organised on 23rd July 2021 being Guru Purnima. Innovative dishes like Kulith Biryani, Leafy forest vegetable pakodas(रानभाज्या भजी), Mango modak, Ragi cake, Mango Kharvas, Christ's thorn pickle (करवंद लोणचे) were prepared which was enjoyed by all residents of LBP.

- Top 3 meritorious students of HSC and SSC were felicitated by late smt. Laxmibai Devidas Amte charitable trust and Lok Biradari Project by giving cash prize of Rs.12000, Rs. 10000 and Rs. 8000 respectively.

- International Day of the World's Indigenous People was observed on 9th, August 2021 by carrying out tree plantation and drawing competition on the topic of My Culture My Proud.

- Independence day flag hoisting was done by Ms. Oormi Kapadia , Architect.

- Newly posted Project officer Mr. Shubham Gupta, Bhamragad visited Lok biradari Prakalp on the Independence Day. He appreciated school and facilities provided.

- National sport day was celebrated by playing friendly Volleyball match.

- On the occasion of Pola festival special dinner of puran poli was prepared which was enjoyed by students, teachers and their families.

- To spread awareness, The Search Foundation, Gadchiroli run by Dr. Abhay Bang and Dr.Rani Bang conducted online session 'Tarunyabhan' – the session on 'Love and Attraction' for the students (9th to 12th standard).

- Under the able guidance of Mr. Suresh Guttewar (Teacher), middle school students participated in 'Learn with Fun' program organized by SCERT, Pune, Maharashtra. They performed 'Rela' local folk dance and song

- With the aim of developing more meaningful education in school, Earthian, Wipro's Sustainability Education Program has organized national level competition. The objective was to provide exposure to multiple perspectives, develop an interconnected understanding of different disciplines in education and life.
  High school students participated in this two months long competition with the two themes namely 'Sustainability and Bio diversity' and 'Sustainability and Waste.'

Social and Rural Development

Background

Can you imagine, even after 75 years of independence, there is still struggle to get clean water to drink and there are very little means of livelihood? This is the truth of many villages situated in Bhamragad tehsil of Gadchiroli district.

Concept

We at Lok Biradari Prakalp are focusing on outreaching activities such as construction, deepening and beautification of lakes, well, borewell as well as construction of elevated water tanks, supplying water through pipelines. Basically, we are planning to develop sustainable water resources which will enable them to take second crop after monsoon and solve drinking water problem. Also they can do some ancillary activity like fishery business.

How to achieve?

We have also introduced some unique terms and conditions:

1) Villagers have to contribute 10% of the total cost of construction work so that each of them will have sense of ownership of lake and of course everyone will then take care of it.
2) None of them should drink alcohol in the village.
3) None of them should eat tobacco.
4) Every child should go to school.
5) Everyone should be united for a good cause.
6) Save trees and plant more trees

The Gram Sabha chairperson has to call a meeting before starting village development programme in the particular village. If at least 70% of the villagers agree to abide by the above rules, development programme is started.

We have completed the village development work in several villages from 2017 and still counting.

Extension Activities carried out in the year 2021

Water Reservoir Construction of size 50 meter(length) x 50 meter (width) x 3 meter (depth) done in the following villages :

Sipanpalli
Mokela
Gurja
Vedampalli
Fish Seed of approximately 30 kg is distributed in the following villages:
Koyanguda
Hemalkasa
Medpalli
Vedampalli
Sipanpalli

A well with Solar Panel:

Gotul (Community Hall):

Water Tank

Pipeline



चित्रकार : संतोष डवरी
santoshdavari@gmail.com
+91-7738654059

लोक बिरादरी कुटुंबातील नवे सदस्य

व्यायामशाळा (Gym)

कला वर्ग (Art Room)

23 डिसेंबर 2021 रोजी वरील दोन्ही इमारतींचे उद्घाटन झाले.